अध्यात्म

विनोद

॥ श्री ॥

# तत्वविवेक.

हा ग्रंथ

श्रीमद्गंगाधरेन्द्रस्वामी यांनीं रचिला

तो

बाबाजी अनंत प्रभु तेण्डुलकर.

यांनीं आपल्या

"श्रीहरिवरदा" छा० छा०

मुंबई.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

शके १८१५. ... चरित प्रस्तुत ... तें आह्मीं आरंभीं च दिलें ... रचण्याचा उद्देश वाचकांस सहज समज... ग्रंथकाराच्या कोणी अनुयायानें रचिलें असाव्या ग्रंथासंबंधी ...

... हा विषय गुरुमुखावगम्य असल्यामुळें वर लिहिलेल्या व्यवस्थेनें तो व्हावा तसा सुबोध होणार नाहीं हें सांगावयास नको. तथापि दुर्बोध स्थळां बद्दल वाचकां-

॥ श्री ॥

# सूचना.

१ मूलहस्तलिखित प्रती वरून शुद्ध करून प्रस्तुत पुस्तक छापिलें आहे. मराठी गद्यांत लिहिलेला ब्रह्मविद्येचा हा पहिला च ग्रंथ ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

२ अर्थावबोध होण्या करितां, व्याकरणरीत्या पदच्छेद केला आहे. एकंदर पुस्तकाचे तीन भाग केले आहेत. व निरनिराळे विषयांस नांवें देऊन प्रभाग ही केले आहेत. क्वचित्स्थळीं टिपा दिल्या आहेत.

३ अन्तःकरणचतुष्टय, भूतपंचक, पंचीकरण इत्यादि विषयांचीं कोष्टकें शेवटीं दिलीं आहेत.

४ श्रीमती बाइजाबाई शिंदे यांचें संक्षिप्त चरित प्रस्तुत ग्रंथांत अगदीं शेवटीं दिलें होतें. तें आह्मीं आरंभीं च दिलें आहे. तेणें करून ग्रंथ रचण्याचा उद्देश वाचकांस सहज समजेल. हें चरित ग्रंथकाराच्या कोणी अनुयायानें रचिलें असावें.

५ ब्रह्मविद्या हा विषय गुरुमुखावगम्य असल्यामुळें वर लिहिलेल्या व्यवस्थेनें तो व्हावा तसा सुबोध होणार नाहीं हें सांगावयास नको. तथापि दुर्बोध स्थळां बद्दल वाचकां-

नीं विचार करून आह्मांस सूचना केल्या असतां तीं स्थळें सुबोध करण्या विषयीं आह्मी दुसऱ्या आवृत्तीचे वेळीं अवश्य यत्न करूं.

६ श्रीरामविजय, हरिविजय, पाण्डवप्रताप इत्यादि प्राकृत ग्रंथ वाचण्यास या पासून चांगली मदत होईल. अशी आमची पूर्ण खात्री आहे. पण हा ग्रंथ सावकाश विचार-पूर्वक व वारंवार वाचिला पाहिजे. व होईल तितकी या-ची चांगली चर्चा केली पाहिजे. तर च हा चांगला फल-द्रूप होईल. अन्यथा होणार नाहीं.

७ क्वचित्स्थळीं अशुद्धें राहिलीं. त्यांचें शुद्धिपत्रक शेवटीं जोडिलें आहे.

राजश्री नारायण प्रभाकर विनोद बडोदा राज्यांतील एक गृहस्थ यांनीं या ग्रंथाची प्रत करून आह्मांस हक्का सुद्धां दिली. सबब त्यांचे आह्मी फार आभार मानितों.

बाबाजी अनन्त प्रभु तेण्डुलकर.

श्री

# अनुक्रमाणिका.

## भाग पहिला.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| परिभाषा. .... .... .... | १ |
| मोक्षास आत्मज्ञान च कारण. .... | १४ |
| मोक्षस्वरूपोपन्यास .... .... .... | १७ |
| प्रलयचतुष्टय. .... .... .... | १९ |
| मीमांसकांचें ईश्वरस्वरूपा विषयीं मत. .... | २९ |
| उपासना.... .... .... .... | ३८ |
| योग. .... .... .... .... | ४२ |
| सांख्यमत. .... .... .... | ५५ |
| काशीवास. .... .... .... | ५७ |
| तीर्थयात्रा इत्यादि. .... .... .... | ६० |

# भाग दुसरा.

## तत्त्वमसि या महावाक्याचा अर्थ.


| | |
|---|---|
| त्वंपदार्थशोधन. .... .... .... | ६६ |
| इंद्रियात्मवादी. .... .... .... | ६७ |
| विरोचनाची गोष्ट .... .... .... | ७१ |
| प्राणात्मवादी. .... .... .... | ७५ |
| इन्द्राचा प्रतर्दनास उपदेश. .... .... | ,, |
| इन्द्रियात्मवादखंडन. .... .... | ७८ |
| मनात्मवादी. .... .... .... | ८१ |
| दृप्तबालाकीची गोष्ट. .... .... | ८३ |
| विज्ञानात्मवादी. .... .... .... | ८८ |
| त्रिविधजीव. .... .... .... | ९० |
| आनंदमयात्मवादी. .... .... .... | ९२ |
| चतुर्विध अभाव. .... .... .... | ९४ |
| प्रधानवादी. .... .... .... | ९५ |
| सांख्य-आत्म्याचें स्वरूप. .... .... | ९८ |
| आत्म्याची कालत्रयीं विद्यमानता. .... | ९९ |
| आत्मप्रतिबिम्ब जीव. .... .... | १०५ |
| अध्यासाचें स्वरूप. .... .... .... | १०७ |
| अणुपरिमाणवादी. .... .... .... | ११४ |
| मध्यमपरिमाणवादी .... .... .... | ११४ |

सांख्यवादी. .... .... .... ११५
अनेकजीवात्मवादी .... .... .... ११६
एकजीवात्मवादी. .... .... .... ११७
तत्पदार्थशोधनाची आवश्यकता. .... १२१
वादींचीं तत्पदार्थविषयक मतें .... .... १२२
ईश्वराच्या यथार्थस्वरूपा विषयीं विचार. .... १२४
तार्किकप्रक्रिया. .... .... .... १२५
कालवादी व स्वभाववादी. .... .... १२७
तार्किकमताचें खंडन. .... .... १२७
कालवादिमताचें खंडन. .... .... १३०
स्वभाववादिमताचें खंडन. .... .... १३०
असिपदशोधन. .... .... ... १३१
माया व अविद्या यांचें स्वरूप .... .... १३१
वाच्यार्थ व लक्ष्यार्थ .... .... .... १३२
त्रिविध लक्षणा. .... .... .... १३४
ब्रह्मज्ञान .... .... .... .... १३८

---

## भाग तिसरा.

### उपसंहार.

त्रिविधभ्रम. .... .... .... १३९
प्रारब्धाची मर्यादा .... .... .... १४१

| | |
|---|---|
| ज्ञानी मनुष्याचे व्यावहारिक वर्तनाचा प्रकार. | १४४ |
| ब्रह्म स्वगतादिभेदत्रयरहित आहे. .... | १५० |
| जगत्कारण व मायास्वरूप. .... .... | १५४ |
| दिग्देशकालें करून ब्रह्म अपरिच्छिन्न आहे. | १५७ |
| स्वप्ना मध्यें भासमान जगत्स्वरूप. .... | १६० |
| जाग्रतींत दृश्यमान जगत्स्वरूप. .... | १६१ |
| भ्रम कोणास होतो ? .... .... | १६१ |
| भ्रमनिरसन. .... .... .... | १६२ |
| सद्गुरूची प्रार्थना. .... .... .... | १६७ |
| सद्गुरूचें प्रतिवचन.... .... .... | १६९ |
| ब्रह्मविद्येचा प्रभाव.... .... .... | १६९ |
| ब्रह्मनिष्ठपुरुषांच्या कथा संप्रदाय वगैरे. .... | १७१ |
| याज्ञवल्क्याची कथा. .... .... | १७१ |
| उद्दालक व श्वेतकेतु यांची कथा. .... | १८३ |
| वरुणाचा पुत्र भृगु याची कथा.... .... | १८५ |
| नारदाचा इसिहास.... .... .... | १८६ |
| दध्यङ्ङथर्व्याचा इतिहास. .... .... | १८७ |

# शुद्धिपत्रक.[1]

| पृष्ठ. | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ३ | १० | पाप | पुण्यपाप |
| ४ | १६ | अवस्थेंत | वस्थेंत |
| ७ | १ | रिभाषा | परिभाषा |
| ७ | ७ | आहे. | आहे, |
| ९ | ८ | देवता व | देवता |
| १० | १२ | शरीरात | शरीरांत |
| १० | १८ | तरसांगतों | तर सांगतों |
| १३ | १४ | कारण देह | कारणदेह |
| १४ | ९ | हातात | होतात |
| १६ | १७ | सद्गुरु | सद्गुरु |
| १८ | ६ | मोक्षावीं | मोक्षाचीं |
| २४ | ४ | मुत्ता | मुक्ता |
| २६ | ८ | उपयोगी | उपयोगी. |
| २६ | ९ | उपयोगी. | उपयोगी |
| ३० | २४ | वस्था | व्यवस्था |
| ३२ | १३ | वरून | करून |
| ३३ | १० | पुंरदर | पुरंदर |
| ३३ | १३ | मत्र | मंत्र |
| ३३ | १४ | होतां | होत। च |
| ३३ | १८ | समह | समूह |
| ३६ | ६ | करावा | करावी |

१ पंक्ति मोजितांना हेडिंगाची सुद्धां पंक्ति धरावी।

| | | | |
|---|---|---|---|
| ३८ | १३ | अ ाणि | आणि |
| ३९ | १९ | षण्नासा | षण्मासा |
| ४० | ७ | प्रा प्ति | प्राप्ति |
| ,, | २१ | इत्यदि | इत्यादि |
| ४१ | ६ | जाता | जातो |
| ४२ | १६ | स्वरूप | स्वरूप. |
| ,, | १९ | प्रणायाम | प्राणायाम |
| ४७ | १६ | होय | होय. |
| ५१ | १७ | पुर्डं | पुर्डीं |
| ,, | १८ | चाळवा | चाळवावा |
| ५२ | ९ | सूक्ष्य | सूक्ष्म |
| ५३ | १० | क्रिया मौलि | क्रियामौलि |
| ,, | १६ | लोह कार | लोहकार |
| ५८ | ४ | क र्म | कर्म |
| ५९ | २१ | असता | असतां |
| ६० | १३ | काम्य | काम्य, |
| ६६ | १३ | कारण | करण |
| ,, | १५ | ,, | ,, |
| ६७ | ३ | ,, | ,, |
| ६९ | ३ | स्थेंत | वस्थेंत |
| ७० | ३ | हातील | होतील |
| ७३ | ७ | तुझ | तुझे |
| ७६ | १८ | सागितला | सांगितला |

| | | | |
|---|---|---|---|
| ७७ | १० | नाहीं | नाहीं. |
| ७९ | १४ | इ द्रिया | इंद्रियां |
| ८४ | ३ | होता | होता. |
| ८५ | ५ | केली | केली. |
| ८६ | १० | करीन | करीन ? |
| ८७ | २० | सांग | सांग. |
| ९० | २० | सांगतों | सांगतों. |
| ९१ | १२ | नसताना | नसताना |
| ,, | १३ | तसें | तसा. |
| ९२ | २१ | दिसेल | दिसेल ? |
| ९६ | १५ | कर्मा चे | कर्माचे |
| १०४ | १० | सर्पा दि | सर्पादि |
| १०४ | २२ | शब ानें | शब्दानें |
| १०४ | २२ | ि वृत्ति | निवृत्ति |
| १०६ | ७ | असत्य | असत्ये |
| ,, | १३ | काहीं | कांहीं |
| १०७ | ९ | अरोपित | आरोपित |
| ,, | १० | अनोत्में | अनात्मे |
| ११८ | ८ | आल्या | आपल्या |
| ,, | १७ | दुर्लभ | दुर्बल |
| ११९ | १६ | कायन | कायम |
| ,, | ,, | सामाधिकार. | सामानाधिकर |
| १२० | ८ | सामाधि | [illegible] |

| | | | |
|---|---|---|---|
| ,, | १३ | पारिभषा | परिभाषा. |
| १३३ | ७ | तत्त्र | तत्त्वं |
| १३५ | २१ | वाक्यार्थं | वाच्यार्थ |
| १४० | २२ | त्याचे | त्यांचे |
| १४३ | १० | नाश्यक | नाशक. |
| १४५ | ७ | प्रत्यगात्म | प्रत्यगात्म- |
| ,, | १६ | त्यास | त्यांस |
| ,, | १८ | दार्ष्टान्ता | दार्ष्टान्तिका |
| १५१ | १८ | नाही | नाहीं. |
| १५५ | ,, | कांहीं. | कांहीं |
| ,, | २१ | नाहीं. | नाहीं |
| १५७ | ९ | दश्य | दृश्य. |
| १५८ | २४ | भा | भा- |
| १६३ | १९ | हे य | होय |
| १६४ | ७ | जाणतों | जाणतों. |
| १६५ | १० | विकर | विकार |
| १६८ | ४ | दीनानाथ | दीननाथ |
| १८६ | ६ | होत | होय |
| १८२ | १२ | मुळें | मुळां |
| १९१ | ४ | प्रिथ्यात्व | मिथ्यात्व |
| १९१ | २१ | अ हे | आहे |
| १९४ | ९ | सांगू | सांगूं |

श्री

# प्रस्तावना

ह्या जगांत मनुष्यास सुख होण्यास स्वधर्माचरण हें कारण आहे. ह्मणजे मनुष्य स्वधर्मा प्रमाणें वागला असतां, त्यास इहलोकीं व परलोकीं सुख होईल. स्वधर्म दोन प्रकारचा आहे. एक व्यावहारिक व दुसरा पारमार्थिक. क्षुधा, तृषा, भय, इत्यादि अनेक विकार मनुष्याच्या आंगीं आहेत. त्यांच्या निवारणा करितां अनेक प्रकारचे व्यवसाय करावे लागतात. तसें च परमेश्वरानें आपणास जन्म दिलें आहे. व अनेक संकटां पासून तो आपलें रक्षण करितो. त्या परमेश्वरास आपल्या कृतीनें संतुष्ट केलें पाहिजे. वरील दोन्ही प्रकारचे व्यवसाय ज्या पद्धतीनें करावयाचे त्या पद्धतीस धर्म ह्मणतात. स्वधर्मा प्रमाणें आचरण ठेवण्याची चांगली सवई होई पर्यंत मनुष्यानें स्वधर्माच्या उपपत्तीचा विचार मनांत आणूं नये. लहान मुलां कडून सक्तीनें विद्याभ्यास करवितों, त्यांची आवडनिवड कांहीं पहात नाहीं. त्या प्रमाणें च स्वधर्माचरणाचे कामीं कांहीं एक आवड निवड मनांत न आणितां सक्तीनें च स्वधर्माचरण केलें पाहिजे व करविलें पाहिजे. लहानपणीं केलेल्या विद्ये पासून थोरपणीं फायदा होतो, तसा च लहानपणा पासून स्वधर्माचरण केलें असतां, फायदा होईल.

स्वधर्माचरणाचा अभ्यास दृढ झाल्या वर पुढें त्याच्या उपपत्तीचा विचार पद्धती प्रमाणें च केला पाहिजे. स्वधर्माच्या उपपत्तीचा विचार ज्या विद्ये मध्यें सांगीतला आहे त्या विद्येला ब्रह्मविद्या किंवा वेदान्त ह्मणतात. मनुष्यास व्यवहारांत फार परिश्रम करावे लागतात. त्यांत त्याच्या आशा कधीं पूर्ण होत नाहींत, व कधीं शरीरास विकार उत्पन्न होनात येणें करून दुःख उत्पन्न होतें, कधीं कधीं चोरव्याघ्रादिकां पासून दुःख होतें व कधीं कधीं ईश्वरी क्षोभानें ग्रहादिकां पासून दुःख होतें. या प्रमाणें त्रिविध दुःख भोगावें लागतें. तेणें करून मनुष्य अत्यंत उद्विग्न होतो. अशा प्रसंगीं काय करावें हें त्यास सुचत नाहीं. या सर्व दुःखांचा परिहार होण्यास ब्रह्मविद्या हें च रामबाण औषध आहे. ब्रह्मविद्येचें ज्ञान झाल्या वर तत्काळ मनाची अस्थिरता नाहींशी होते. मन स्थिर व सुप्रसन्न होतें. आणि मनुष्य आपल्या कर्तव्यास पुनः आनंदानें प्रवृत्त होतो.

व्यावहारिक स्वधर्माचें ज्ञान कुलपरंपरेनें सर्वांस होण्या सारखें असतें पण पारमार्थिक स्वधर्माचें ज्ञान होण्यास सुलभ साधन उपलब्ध नाहीं. तें ज्ञान सद्गुरूच्या कृपे वांचून प्राप्त होणें नाहीं. बहुतकालपर्यंत सद्गुरूची सेवा करून सद्गुरु प्रसन्न झाला असतां तें प्राप्त व्हावयाचें. व ह्या च ज्ञानाची योग्यता फार मोठी आहे. अशा प्रकारचें ज्ञान ह्या च जन्मांत होईल असा नियम नाहीं. त्यास अनेक जन्म ही घालवावे लागतील.

ब्रह्मज्ञान या प्रमाणें दीर्घकालानें प्राप्त होणारें आहे. ह्मणून त्याची उपेक्षा करितां कामा नये. त्याचा अभ्यास ठेविला पाहिजे. त्या ज्ञानाचें नुसतें दिग्दर्शन झालें तरी देखील त्या पासून बहुत लाभ आहे.

ब्रह्मविद्येंत ज्यांचा थोडाबहुत प्रवेश झाला त्यांस पाहण्यास योग्य असे ग्रंथ मराठींत ज्ञानेश्वरी, निगमसार, योगवासिष्ठसार, एकनाथी भागवत वगैरे बरे च ग्रंथ आहेत. पण जे त्या विद्येंत नवीन च प्रवेश करूं इच्छिणारे त्यांच्या सोईचा ग्रंथ नाहीं. पण ईश्वरकृपेनें श्रीमद्गंगाधरेंद्रविरचित तत्वविवेक हा ग्रंथ आह्मांस सांपडला. हा ग्रंथ दोन्ही प्रकारच्या लोकांस पण विशेषें करून बुभुत्सु जनांस फार उपयुक्त होईल, ह्या उद्देशानें तो छापून त्यांच्या सेवेस हजर केला आहे. ह्याच्या अभ्यासानें वरील उद्देश बरा च सिद्धीस जाईल असें वाटतें. चराचरसूत्रधारी परमात्मा हा आमचा उद्देश सिद्धीस नेवो.

# श्रीमती बाइजाबाई यांचा इतिहास.

## ओव्या.

गालवक्षेत्र गालेर ॥ तेथील प्रभु महाथोर ॥
राज्य करिताहे योगेश्वर ॥ दौलतराव नांव त्याचें ॥ १ ॥
शिंदे ज्याचें उपनांव ॥ अलीजाबाहादूरह्मणती सर्व ॥
ज्याच्या ऐश्वर्याचा प्रभाव ॥ प्रसिद्ध भूमंडळीं ॥ २ ॥
त्याची जी कां धर्मपत्नी ॥ बाइजाबाई प्रसिद्ध भुवनीं ॥
जीच्या वृत्तींतें पाहूनी ॥ विद्वज्जन संतोषतां ॥ ३ ॥
पिता जिचा सर्जेराव ॥ घाटगे ज्याचें उपनांव ॥
क्षात्रधर्माचा प्रभाव ॥ सर्वत्र ज्याचा प्रसिद्ध ॥ ४ ॥
सुंदराबाई जियेची माता ॥ महासती पतिव्रता ॥
जिच्या बंधूची विख्यातता ॥ हिंदुराव या नांवें ॥ ५ ॥
बुद्धिमत्तेसीं सरस्वती ॥ औदार्यासीं लक्ष्मी च प्रती ॥
जिच्या दयाळुतेची स्थिती ॥ पाहतां चि माता वाटतसे ६
श्रीकृष्णचरणीं प्रेमभक्ती ॥ सच्छास्त्रश्रवणीं परम प्रीती
साधुजनाची संगती ॥ अत्यंत जियेसी आवडे ॥ ७ ॥
राज्य करण्याची हातोटी ॥ पाहतां च आश्चर्य वाटे पोटीं ॥
पाकशास्त्रीं कुशळ मोठी ॥ उपमा द्यावी नळाची ॥ ८ ॥
ऐसी बाई अवंतिकापुरीं वास करूनि राज्य करी ॥
उत्सव महोत्सव नाना परी ॥ महाकाळाचे करितसे ॥ ९ ॥
नित्य करी ब्राह्मणभोजन ॥ श्रीकृष्णपूजा हरिकीर्तन ॥

भागवतादिपुराणश्रवण ॥ नित्य नेमें करितसे ॥ १० ॥
ऐसें असतां अवचिती ॥ अकस्मात् अवंतिके प्रती ॥
कोणी एक आले यती ॥ गंगाधरेंद्र या नांवें ॥ ११ ॥
काशीक्षेत्रीं वास ज्यांचा ॥ अभ्यास ज्यांसी ब्रह्मविद्येचा ॥
रात्रंदिवस ब्रह्मचर्चा ॥ वार्ता च दुसरी नावडे ॥ १२ ॥
ऐशा यतींसी पाहूनी ॥ प्रसन्न जाहली बाई मनीं ॥
मग समित्पाणि होऊनी ॥ प्रार्थना केली तयांची ॥१३॥
स्वामिन् मजला कृपें करून ॥ आपण चि करावें पावन ॥
उपदेशूनी महावाक्यार्थानें ॥ मुक्त करावें मज लागीं १४॥
मग तिहीं दयार्द्रभावें करून ॥ सर्वशास्त्रार्थातें अवलोकून ॥
बाईच्या उद्देशें ब्रह्मज्ञान ॥ व्हावया ग्रंथ रचियेला ॥१५॥
निमित्तभूतकुंतीसुता ॥ श्रीकृष्णें कथिली भगवद्गीता ॥
तैशी च ही प्राकृत कविता ॥ बाई निमित्त पैं केली॥१६॥
हें जाणून प्राकृत कवन ॥ जे कां न करिती अवलोकन ॥
ते जाणावे भाग्यहीन ॥ उलूक जैसे सूर्यासी ॥ १७ ॥
हा ग्रंथ अवंतिकापुरीं ॥ रुधिरोद्गारीनामसंवत्सरीं ॥
माघशुक्लपक्षवारीं ॥ पंचमी तिथी समाप्त ॥ १८ ॥
हें जें का प्राकृत कवन ॥ तें श्रीकृष्णचरणीं केलें अर्पण ॥
तेणें होऊन श्रीकृष्ण प्रसन्न ॥ भक्तजना सांभाळो ॥१९॥

# तत्वविवेक.

## भाग १ ला.

### परिभाषा व मोक्षाचें कारण आत्मज्ञान.

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुचरणारविन्दाभ्यां नमः ॥ श्रीमत्परमहंसास्वादितचरणकमलचिन्मकरन्दाय भक्तजनमानसनिवासाय श्रीरामचन्द्राय नमः ॥

साधनचतुष्टयसंपन्न, अधिकारी जे पुरुष त्यांस, मोक्षास साधनभूत तत्त्वविवेकप्रकार ह्मणजे आत्मा कोण अनात्मा कोण, हा विचार, या प्रकारातें सांगतों.

प्र०—साधनचतुष्टय कोणतें?

उ०—नित्यानित्यवस्तुविवेक १ वैराग्य २ शमादि षट्कसंपत्ति ३ आणि मुमुक्षुत्व ४.

प्र०—नित्यानित्यवस्तुविवेक तो कोणता?

उ०—नित्यवस्तु एक ब्रह्म. त्या हून भिन्न जें दृश्य तें मिथ्या जाणणें हा च नित्यानित्यवस्तुविवेक जाणावा.

प्र०—वैराग्य तें कोणतें?

उ०—या लोकांतील आणि स्वर्गांतील भोगांची इच्छा न करणें हें च वैराग्य जाणावें.

प्र०—शमादि षट्कसंपत्ति कोणती?

उ०—शम, दम, तप, तितिक्षा, समाधान, आणि श्रद्धा.

प्र०—शम तो कोणता?

उ०—तर विषयां पासून मनाचा निग्रह करणें.

प्र०—दम तो काय?

उ०—विषयां पासून चक्षुरादि बाह्येंद्रियांचा निग्रह करणें.

प्र०—तप तें कोणतें?

उ०—ईश्वरप्रीत्यर्थ स्वधर्मानुष्ठान करणें.

प्र०—तितिक्षा कोणती?

उ०—शीतोष्णसुखदुःखादि प्रारब्धानें प्राप्त झाल्यास सहन करणें.

प्र०—श्रद्धा ती कशी?

उ०—गुरुवेदान्तवाक्याच्या ठायीं विश्वास ठेवणें.

प्र०—समाधान तें काय?

उ०—चित्ताची एकाग्रता करणें.

प्र०—मुमुक्षुत्व तें काय?

उ०—मजला मोक्ष प्राप्त व्हावा अशी इच्छा.

हीं चारी साधनें ज्यांस प्राप्त जालीं ते तत्त्वविवेकाचे अधिकारी होताहेत.

प्र०—तत्वविवेक तो कोणता?

उ०—एक आत्मा मात्र सत्य, त्या हून अन्य दृश्य अवघें

मिथ्या असा निश्चय असतो तो.

प्र०—आत्मा कोणता ?

उ०—जो स्थूल, सूक्ष्म, व कारण या शरीरत्रया हून वेगळा, पंचकोशां हून वेगळा, अवस्थात्रयाचा साक्षी आणि सत्यस्वरूप, ज्ञानस्वरूप, आनंदस्वरूप होत्साता जो राहतो तो च आत्मा जाणावा.

प्र०—स्थूल शरीर तें कोणतें ?

उ०—उपादानकारणभूत पंचीकृत पंचमहाभूतें आणि निमित्तकारणभूत पापरूपी कर्म जें या दोघां पासून उत्पन्न होत्सातें जें सुखदुःखादिभोगांचें स्थान आणि अस्तीत्यादिषड्भावविकार ज्यास प्राप्त होतात तें स्थूलशरीर जाणावें.

प्र०—षड्भावविकार कोणते ?

उ०— १ अस्ति ह्मणजे गर्भांत येऊन राहणें. २ जायते ह्मणजे उत्पन्न होणें. ३ वर्धते ह्मणजे वृद्धीतें पावणें. ४ परिणमते ह्मणजे परिणामातें पावणें. ५ अपक्षीयते ह्मणजे क्षीण होणें. आणि ६ म्रियते ह्मणजे मरणें हे षड्भावविकार जाणावे.

प्र०—सूक्ष्म शरीर तें कोणतें ?

उ०—अपंचीकृत पंचमहाभूतें आणि कर्म या दोघां पासून उत्पन्न होत्सातें जें सुखदुःखादि भोगांचें साधन आणि ज्ञानेंद्रियादि सतरा कलांनीं युक्त तें सूक्ष्म शरीर होय.

प्र०—सतरा कला कोणत्या ?

उ०—पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें, पांच प्राण, मन व बुद्धि ह्या सतरा कला होत.

प्र०—कारणशरीर तें कोणतें ?

उ०—सत्य किंवा मिथ्या ह्मणण्या विषयीं अयोग्य आणि उत्पत्तिरहित अशी जी अविद्या तद्रूप, आणि शरीरद्वयाचें कारण असें जें स्वस्वरूपाचें अज्ञान, आणि निर्विकल्परूप सुषुप्तींत प्राणिमात्रास अनुभूयमान जें तें च कारणशरीर जाणावें.

प्र०—अवस्था तीन कोणत्या ?

उ०—जागृति, स्वप्न, आणि सुषुप्ति.

प्र०—जाग्रत्यवस्था ती कोणती ?

उ०—श्रोत्रादि ज्ञानेंद्रियें करून शब्दादि विषयांतें लोक ज्या अवस्थे प्रत जाणतात ती जाग्रत्यवस्था जाणावी. जाग्रत्यवस्था आणि स्थूल शरीर या दोघांचे अभिमानें करून आत्मा विश्व या नामातें प्राप्त होतो.

प्र०—स्वप्नावस्था ती कोणती ?

उ०—जाग्रत्यअवस्थेंत जें पाहिलें किंवा ऐकिलें त्याच्या संस्कारानें निद्रेंत जो वासनामय प्रपंचभास होतो ती स्वप्नावस्था जाणावी. स्वप्नावस्था आणि सूक्ष्मशरीर या दोघांच्या अभिमानें करून आत्मा तैजस या नामातें प्राप्त होतो.

प्र०—सुषुप्त्यवस्था ती कोणती?

उ०—मी कांहीं एक जाणत नसतां सुखानें निद्रेचा अनुभव घेत होतों. असा अनुभव ज्या अवस्थेंत, आणि आपणातें व दुसऱ्यातें ही ज्या अवस्थेंत जाणत नाहीं ती सुषुप्त्यवस्था जाणावी. सुषुप्त्यवस्था आणि कारणशरीर या दोघांच्या

अभिमानें करून आत्मा प्राज्ञ या नामातें प्राप्त होतो.

प्र०—पंच कोश ते कोणते ?

उ०—१ अन्नमय. २ प्राणमय. ३ मनोमय. ४ विज्ञानमय ५ आणि आनंदमय.

प्र०—अन्नमय कोश तो कोणता ?

उ०—अन्नरसानें उत्पन्न होऊन, अन्नरसानें च वृद्धीतें पावून अन्नरूप पृथ्वीच्या ठायीं लीन होतो असा जो स्थूल-देह तो अन्नमय कोश जाणावा.

प्र०—प्राणमय कोश तो कोणता ?

उ०—प्राणादि पंचवायु आणि वागादि पांच कर्मेंद्रियें अशीं दाहा मिळून प्राणमय कोश होय.

प्र०—मनोमय कोश कोणता ?

उ०—ज्ञानेंद्रियें पांच आणि एक मन असे सहा मिळून मनोमय कोश होय.

प्र०—विज्ञानमय कोश तो कोणता ?

उ०—ज्ञानेंद्रियपंचक आणि बुद्धि एक असे सहा मिळून विज्ञानमय कोश होय.

प्र०—आनंदमय कोश कोणता ?

उ०—अज्ञान च आनंदमय कोश होय.

हें कोशपंचक जें यातें माझें शरीर, माझे प्राण, माझें मन, माझी बुद्धि माझें अज्ञान या प्रकारें माझें माझें ह्मणून आपण च जाणतो, माझें माझें ह्मणून जाणतो जें कटक-

कुंडलगृहादिक, तें जसें आपलें स्वरूप नव्हे, आपल्या हून भिन्न आहे, तसेंच माझें माझें ह्मणून जाणतों जें पंचकोशादिक हें आपलें स्वरूप ह्म० आत्मा नव्हे. आत्म्या हून भिन्न जाणावें. हे पंचकोश आपणास घटाचे परी दृश्य आहेत. आपण त्यांचा द्रष्टा जाणावा. हे पंचकोश आत्मा नव्हेत.

प्र०—तर आत्मा तो कोण ?

उ०—आत्मा सत्यस्वरूप ज्ञानस्वरूप आनंदस्वरूप आहे.

प्र०—सत्यस्वरूप कां ?

उ०—कालत्रयाचे ठायीं नाशातें पावत नाहीं, आणि जाग्रत्यादि तीन्ही अवस्थेंत साक्षिस्वरूपें करून असतो ह्मणून सत्यस्वरूप ह्मणावा.

प्र०—ज्ञानस्वरूप कां ?

उ०—तीन्ही अवस्थांतें आणि देहत्रयातें जाणतो ह्मणून ज्ञानस्वरूप ह्मणावा.

प्र०—आनंदस्वरूप कां ?

उ०—पुत्रदारवित्तादिकां पेक्षां आपल्या आत्म्याच्या ठायीं प्राणिमात्राची उत्कट प्रीति आहे, सुखाचे ठायीं लोकांची प्रीति असते, देहदुःखांचे ठायीं प्रीति नसते. हें आत्मा सुखरूप नसता तर प्राणां पेक्षां ही उत्कट प्रीति कां राहती ? आत्मा सर्वां पेक्षां उत्कट प्रिय आहे. या कारणा स्तव आनंदरूप जाणावा. निद्रेंत कांहीं एक विषयाचा संबंध नसतांना आपण आनंदरूप असतों. हा सर्वांस अनुभव प्रसिद्ध आहे. या स्तव आत्मा आनंदस्वरूप जाणावा.

या प्रकारें सच्चिदानंदस्वरूप ऐसा आत्मा आपण च ऐसें जाणावें.

---

## चोव्वीस तत्वें.

पंचमहाभूतें—अथ या नंतर चोव्वीस तत्वांची उत्पत्ति सांगतों. जें कांहीं जगत्कारण ब्रह्म त्याची अनादि अनिर्वचनीय त्रिगुणात्मक जी मायाशक्ति आहे. त्या माये पासून प्रथम अवकाशस्वरूपी १ आकाश उत्पन्न झाला. आकाशाचे ठायीं शब्द हा एक गुण जाणावा. आकाशा पासून २ वायु झाला. वायूचे ठायीं शब्द आणि स्पर्श हे दोन गुण जाणावे. वायू पासून ३ तेज उत्पन्न झालें. तेजाचे ठायीं शब्द स्पर्श आणि रूप हे तीन गुण जाणावे. तेजा पासून ४ उदक उत्पन्न झालें. उदकाचे शब्द, स्पर्श, रूप आणि रस हे चार गुण जाणावे. उदका पासून ५ पृथ्वी उत्पन्न झाली. पृथ्वीचे शब्द, स्पर्श, रूप रस, आणि गंध हे पांच गुण जाणावे. ( कोष्टक १ लें पहा ). हीं पंचमहाभूतें त्रिगुणात्मक जाणावीं.

ज्ञानेंद्रियपंचक—ह्या पंचमहाभूतां मध्यें आकाशाच्या सात्विकांशा पासून ६ श्रोत्रेंद्रिय उत्पन्न झालें. त्या श्रोत्रेंद्रियाचें स्थान कर्णगोलक. विषय शब्द व देवता दिशा जाणावी. वायूच्या सात्विकांशा पासून ७ त्वगिंद्रिय उत्पन्न झालें. त्या त्वगिंद्रियाचें स्थान सर्व शरीर. विषय स्पर्श. आणि देवता वायु

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

जाणावी. अग्नीच्या सात्विकांशा पासून ८ चक्षुरिंद्रिय उत्पन्न झालें. त्या चक्षूचें स्थान नेत्रगोलक, विषय रूप, व देवता सूर्य जाणावी. उदकाच्या सात्विकांशा पासून ९ रसनेंद्रिय उत्पन्न जाहलें. त्या रसनेंद्रियाचें स्थान जिव्हा. विषय रस व देवता वरुण जाणावी. पृथ्वीच्या सात्विकांशा पासून १० घ्राणेंद्रिय जाहलें. त्या घ्राणेंद्रियाचें स्थान नासिकाग्र. विषय गंध व देवता अश्विनीकुमार जाणावी. या प्रकारें ज्ञानेंद्रियांची उत्पत्ति, त्यांचें स्थान, विषय व देवता हीं सांगितलीं. (कोष्टक २ पहा).

अंतःकरणचतुष्टय—आतां अंतःकरणचतुष्टयाची उत्पत्ति, त्याचें स्थान, विषय आणि देवता सांगतों. या पंचमहाभूतांचे पांची सात्विकांश एकत्र मिळून ११ मन १२ बुद्धि १३ चित्त व १४ अहंकार हें अंतःकरणचतुष्टय उत्पन्न जाहलें. संकल्पविकल्पात्मक वृत्ति हें मनाचें स्वरूप. संकल्पविकल्प करणें हा मनाचा विषय. मनाची देवता चंद्र. व स्थान हृदयकमल. निश्चयात्मक वृत्ति हें बुद्धीचें स्वरूप. विषय, निश्चय करणें. देवता बृहस्पति व स्थान हृदयकमल. अनुसंधानात्मक वृत्ति हें चित्ताचें स्वरूप. विषय चिंतन करणें. देवता विष्णु व स्थान हृदयकमल. गर्वात्मक वृत्ति अहंकाराचें स्वरूप. विषय गर्व करणें, देवता रुद्र व स्थान हृदयकमल. (कोष्टक ३ पहा.)

कर्मेंद्रियपंचक—आतां कर्मेंद्रियांची उत्पत्ति स्थान व्यापार व देवता हीं सांगतों. या पंचमहाभूतां मध्यें आकाशाच्या राजसांशा पासून १५ वागिंद्रिय उत्पन्न जाहलें, त्याचें स्थान

जिव्हा. व्यापार भाषण करणें व देवता अग्नि. वायूच्या राजसांशा पासून १६ हस्तेंद्रिय उत्पन्न जाहलें. त्याचें स्थान दोनी हस्त. व्यापार दानप्रतिग्रहादिक, व देवता इंद्र. अग्नीच्या राजसांशा पासून १७ पादेंद्रिय उत्पन्न जाहलें. पादेंद्रियाचें स्थान पाद, व्यापार गमनागमन करणें व देवता विष्णु. उदकाच्या राजसांशा पासून १८ उपस्थेंद्रिय उत्पन्न जाहलें. त्याचें स्थान उपस्थ, व्यापार आनंद व देवता व प्रजापति. पृथिवीच्या राजसांशा पासून १९ गुदेंद्रिय उत्पन्न जाहलें. त्याचें स्थान गुद, व्यापार मलविसर्जन करणें व देवता यम. ( कोष्टक ४ पहा ).

प्राणपंचक—आतां प्राणपंचकाची उत्पत्ति, स्थान आणि व्यापार सांगतों. या पंचमहाभूतांचे पांची रजोंश एकत्र मिळून २० प्राण २१ अपान २२ व्यान २३ उदान आणि २४ समान असे पंच प्राण उत्पन्न जाहले. प्राणवायूचें स्थान हृदय व नासिकेचें अग्र. आणि व्यापार ऊर्ध्वगमन करणें. अपानाचें स्थान गुद, व व्यापार अधोगमन करणें. व्यानवायूचें स्थान सर्व शरीर व व्यापार हृदयकमळांतून निघून सर्व शरीरास व्यापून राहिलेल्या अशा बाहत्तर कोटि दहा हजार शंभर आणि एक ज्या नाडी त्यांत गमन करून शरीरास बळ देणें. उदानवायूचें स्थान कंठप्रदेश व व्यापार ऊर्ध्व उत्क्रमण करणें. समानवायूचें स्थान नाभि व व्यापार प्राण्यानें भक्षण केलेलें आणि पान केलेलें अन्न उदकादिक त्यांचे रसांतें सर्व

शरीरांत समान प्राप्त करणें. ( कोष्टक ५ पहा. )

उपप्राणपंचक—आणि पंच उपप्राण ही कोणी एकाच्या मतांत आहेत ते ही सांगतों. नाग, कूर्म, कृकल, देवदत्त धनंजय. हे उपप्राण जाणावे. ढेंकर येणें हा नागवायूचा व्यापार. शिंक येणें हा कृकलवायूचा व्यापार. नेत्र उघडणें हा कूर्म वायूचा व्यापार. जांभई येणें हा देवदत्ताचा व्यापार. आणि शरीरास पोषण करणें हा धनंजयवायूचा व्यापार. धनंजयवायु सर्व शरीरास व्यापून, मेल्या नंतर ही किंचित्काल असतो. ह्मणून अज्ञान्याच्या देहांत बाह्यवायूचा प्रवेश होत नाहीं. ह्मणून हा देहास पोषण करणारा वायु जाणावा. हे दहा ही मिळून सर्व शरीरात व्यापक वायु एक च. परंतु स्थानभेद व क्रियाभेद येणें करून पृथक् पृथक् नामातें प्राप्त जाहला.

आतां पंचीकरण आणि पिंड ब्रह्मांड यांची उत्पत्ति सांगतों. या पंच महाभूतांच्या तामसांशा पासून पंचीकरणें करून युक्त पंचमहाभूतें होतात.

पंचीकरण—पंचीकरण तें कसें ह्मणशील तरसांगतों. या पंचमहाभूतां पैकीं तामसांशरूप एकएक भूताचे दोन दोन भाग करून त्यांतील एक एक भाग एकीकडे ठेवून जो दुसरा भाग तो घेऊन त्याचे पुनः चार भाग करून जो आपला प्रथम अर्धा भाग तो सोडून दुसऱ्याच्या अर्ध्या अर्ध्या भागांत आपल्या चार तुकड्यांतील एक एक तुकडा

मिळवावा. ह्मणजे एक आपला अर्धा भाग व चवघांचे चोर तुकडे असें एक एक भूत पांच पांच प्रकारचें होतें. हें पंचीकरण जाणावें. ( कोष्टक ६ वें पहा ).

पिण्डब्रह्माण्ड—तदनंतर पंचीकृत पंचमहाभूतां पासून ब्रह्मांड झालें. ब्रह्मांडांत चतुर्दश भुवनें जाहलीं. चतुर्दश भुवनांत नानाप्रकारचे षट्कोशात्मक देह उत्पन्न जाहले. आणि पानादि भोग्य पदार्थ हीं उत्पन्न झाले.

देहाचे ठायीं षट्कोश ते कोणते तें सांगतों. शिरा, अस्थि व मज्जा हे तीन पित्रंशा पासून उत्पन्न होतात. त्वग्, मांस व शोणित हे तीन मात्रंशा पासून उत्पन्न होतात. हे जे सहा यांस षट्कोश ह्मणावें. तद्रूप च हा स्थूलदेह षट्कोशात्मक जाणावा.

आणि देहाचे ठायीं पंचमहाभूतांचीं कार्यें दिसतात तीं ही सांगतों. अस्थि १ नाडी २ त्वचा ३ मांस ४ रोम ५ हे पृथ्वी पासून उत्पन्न जाहले. लाळ १ मूत्र २ स्वेद ३ शुक्र ४ शोणित ५ हे उदका पासून जाहले. क्षुधा १ तृषा २ निद्रा ३ आलस्य ४ मैथुन ५ हे तेजा पासून झाले. धावन १ चलन २ आकुंचन ३ विहून ह्मणजे उड्डान करणें ४ प्रसारण ५ हे वायूपासून जाहले. काम १ क्रोध २ शोक ३ मोह ४ भय

---

१ अतळ, वितल, सुतल, महातल, रसातळ, तलातळ, पाताळ. भूः, भुवः, स्वः, महः, जनः, तपः, सत्य.

५ हे आकाशा पासून उत्पन्न जाहले. (कोष्टक ६ पहा).

आणि हे देह अंडजादि भेदें करून चार प्रकारचे आहेत. तो ही प्रकार सांगतों. अंड्या पासून उत्पन्न जाहले ते अंडज पक्ष्यादि. गर्भाशया पासून झाले जे नृगवादि ते जरायुज जाणावे. पृथिवीतें ऊर्ध्व भेदून जे जाहले वृक्षादिक ते उद्भिज्ज जाणावे घर्मा पासून जे जाहले मत्कुणादि ते स्वेदज जाणावे. हे चार प्रकारचे देह पंचीकृतपंचमहाभूतां पासून उत्पन्न जाहले. या प्रकारें पिंडब्रह्मांडाची उत्पत्ति सांगीतली.

समष्टिव्यष्टिरूप भेद—हें देहत्रय समष्टिव्यष्टिभेदें करून दोन प्रकारचें जाणावें. एकासि ह्मणावें व्यष्टि आणि समुदायासि ह्मणावें समष्टि. यासि दृष्टान्त. एका घोड्यास ह्मणावें घोडा व घोड्यांच्या समुदायासि ह्मणावें पागा. व्यष्टिस्थूलदेह, व्यष्टिलिंगदेह व व्यष्टिकारणदेह यांच्या तादात्म्याभिमानें करून आत्मा विश्व, तैजस व प्राज्ञ या नामांतें प्राप्त होतो हें पूर्वी च सांगीतलें आहे. आतां समष्टिदेहत्रयाच्या अभिमानें करून प्रत्यगात्मरूप ब्रह्म यास जें नाम प्राप्त जाहलें तें सांगतों.

ब्रह्मांडास च समष्टिस्थूलदेह ह्मणावें. त्या ब्रह्मांडाच्या तादात्म्याभिमानें करून ब्रह्म च विराट् आणि वैश्वानर या नामांतें प्राप्त होताहे. समष्टिस्थूलदेहात्मकब्रह्माण्डाच्या योगानें ब्रह्म विशेष शोभूं लागलें. ह्मणून विराट् नाम प्राप्त झालें. आणि सर्वव्यष्टिस्थूलदेहाभिमानी विश्वनामक जीवांचे ठायीं तादात्म्याभिमान करिताहे या मुळें वैश्वानर हें नाम प्राप्त जाहलें.

आणि ब्रह्माण्डांत जितके लिंगदेह आहेत त्यांच्या समुदायास समष्टिलिंगदेह ह्मणावें. त्याच्या तादात्म्याभिमानानें ब्रह्म च हिरण्यगर्भ आणि सूत्रात्मा या नामांतें प्राप्त होताहे. हिरण्यगर्भमयब्रह्माण्ड त्याच्या गर्भांत आहे ह्मणून हिरण्यगर्भ हें नाम प्राप्त झालें आणि जसें मण्यांत सूत्र वोवलें गेलें त्या प्रमाणें संपूर्ण ब्रह्माण्डांतील स्थूलदेहांत लिंगदेहरूपें करून आत्मा वोवला गेला ह्मणून त्याला सूत्रात्मा हें नाम प्राप्त जाहलें

आणि अज्ञानरूप व्यष्टिकारणदेहांच्या समुदायास समष्टिकारणदेह ह्मणावें. जसा एका खोलींतील अंधार हा व्यष्टि आणि पृथिवींतील अंधार हा समष्टि. तसें एक एक लिंगदेह आणि स्थूलदेह या देहद्वयास कारण जें अज्ञान त्यासि व्यष्टिकारण देह ह्मणावें. व ब्रह्माण्डांतील संपूर्ण लिंगदेहांस आणि स्थूलदेहांस कारणभूत जें अज्ञान त्यास समष्टिकारणदेह ह्मणावें. या समष्टिकारणदेहाच्या तादात्म्याभिमानें करून ब्रह्म च ईश्वर, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् व अंतर्यामी या नामांतें प्राप्त होताहे. आणि हा च त्रिगुणात्मक मायोपाधिक अंतर्यामी ईश्वर जो तो मायारूप लीलाविग्रहातें धारण करितो. सत्वगुणोपाधिकविष्णुरूपें करून जगताचें पालन करिताहे; रजोगुणोपाधिक ब्रह्मदेवरूपें करून जगताची उत्पत्ति करिताहे. आणि तमोगुणोपाधिक शिवरूपें करून संपूर्ण जगताचा संहार करिताहे. तस्मात् ब्रह्मविष्णुमहेश्वर हे तिघे ही ईश्वराचे लीलाविग्रह जाणावे.

---

## मोक्षास आत्मज्ञान च कारण.

ब्रह्मा, विष्णु आणि महेश, या तिघांस सोडून विश्व, तैजस आदि करून इन्द्र, चंद्र, हिरण्यगर्भपर्यंत हे संपूर्ण जीवकोटींत जाणावे. विराट आणि हिरण्यगर्भ हे मात्र अवश्य ज्ञानी असतात. या स्तव यांस पुनः जन्ममरणादिक प्राप्त होत नाहींत. इंद्रादिक जे ते अनेकजन्मार्जित अशुक्लकृष्णकर्म जें, तेणें करून अंतःकरणशुद्धिद्वारा वेदान्तश्रवणमननिदिध्यासनपूर्वक ज्यांस स्वस्वरूपाचें यथार्थ ज्ञान प्राप्त जाहलें ते मुक्त होतात. ज्यांस स्वस्वरूपाचें ज्ञान नाहीं ते पुनः पुण्य क्षीण होतां च संचितकर्मानुसार उत्तम, मध्यम व नीच योनींतें प्राप्त होतात. तस्मात् स्वस्वरूपाचें यथार्थ ज्ञान जाहल्या वांचून देव, ऋषि अथवा मनुष्य कोणी हीं मुक्त होत नाहींत. हा सर्व शास्त्रांचा सिद्धान्त आहे. तस्मात् स्वस्वरूपज्ञानसंपादन करून जन्ममरणात्मक संसारा पासून मुक्त होण्या विषयीं यत्न करावा. यत्न कसा तो ही सांगतों.

शुक्लादि चतुर्विध कर्म—शुक्ल, कृष्ण, मिश्र आणि अशुक्लकृष्ण अशीं चार प्रकारचीं कर्मे आहेत. स्वर्गलोकादिकांच्या प्राप्त्यर्थ जें ज्योतिष्टोमादि कर्म करणें हें शुक्ल कर्म होय. जें कांहीं ब्रह्महत्यादि नरकप्रापक कर्म तें कृष्णकर्म होय. मनुष्यदेहप्रापक हें मिश्र होय. व स्वर्गादिकांची इच्छा न करून मी हें पुण्य केलें अशा अभिमानातें टाकून निषिद्ध

कर्म न करितां केवल परमेश्वरप्रीत्यर्थ निष्काम अग्निहोत्रसंध्यावंदनदानधर्मादि नित्यनैमित्तिककर्मानुष्ठान करणें हें अशुक्लकृष्णकर्म होय.

ज्यास संसारा पासून मुक्त व्हावें अशी इच्छा असेल त्यानें स्वर्गलोकादिप्रापक शुक्लनामक काम्यकर्म, नरकादिप्रापक कृष्णनामक निषिद्धकर्म, आणि मिश्रकर्म हीं तीन्ही टाकून केवल परमेश्वरप्रीत्यर्थ निष्काम स्नानसन्ध्यापूजादानधर्मादि अशुक्लकृष्णनामक कर्म नित्यनैमित्तिकरूप स्वधर्मानुष्ठान करावें. तेणें करून परमेश्वरानुग्रह होतां च नित्यानित्यवस्तुविवेकादि साधनचतुष्टयसंपत्ति प्राप्त होऊन सद्गुरूसि शरण जाऊन मी कोण या प्रकारें करून आपल्या स्वरूपातें जाणावें अशी शुभेच्छा उत्पन्न होतीहे. तदनंतर वेदशास्त्रसम्पन्न असून केवल ब्रह्मरूपीं च ज्याची स्थिति असा गुरु पाहून त्या गुरूसी शरण जावें.

ब्रह्मनिष्ठगुरूचें लक्षण—त्या ब्रह्मनिष्ठाचें कांहीं एक लक्षण सांगतों. मानापमानरहितता, शत्रुमित्रभावरहितता, अंतरीं उदासीनता, सर्वत्र समदर्शिता, निराग्रहता, कोणी एका कर्माच्या ठायीं आग्रहपूर्वक कर्तव्यरहितता, वेदान्तैकनिष्ठता, सर्वकाळ आनंदरूपता, असें सद्गुरूचें लक्षण शास्त्रांत सांगीतलें आहे.

गुरूपसदन—त्याज वरून ब्रह्मनिष्ठ गुरु वोळखून जेथें आपली भक्ति असेल त्या समीप समित्पाणि ह्मणजे हात

जोडून हस्तांच्या ठायीं सद्गुरूस उपयोगी जे पदार्थ असतील ते घेऊन त्या गुरूसि शरण जावें. राजा, देवता व गुरु यांज कडे रिक्तहस्त गमन करूं नये. ह्मणून शास्त्र ही सांगताहे. मग त्या गुरूची सेवा करून गुरूस प्रसन्न करून प्रश्न करावा.

हे सद्गुरो, आध्यात्मिकताप ह्मणजे या शरीराचे ठायीं ज्वर, खोकला इत्यादि उपद्रव होऊन पीडा होणें, आधिभौतिकताप ह्मणजे चोरव्याघ्रादि भूतां पासून पीडा होणें व आधिदैविक ह्मणजे अतिवृष्टिअनावृष्टिद्वारा देवा पासून पीडा होणें, अशा तापत्रयें करून तप्त होत्साता जन्ममरणात्मकसंसारचक्रांत घटीयंत्रा प्रमाणें रात्रंदिवस भ्रमण करितोंहें. क्षणमात्र ही चैन पडत नाहीं. आशा, तृष्णा, काम, क्रोधादिक हे दुष्ट माझ्या ठायीं प्रवेश करून पिशाचवत् अनेक प्रकारें दुःख देतात. तें दुःख कोठवर वर्णन करावें. मी केवळ दुःखसमुद्रांत बुडालों आहें. या दुःखा पासून मुक्त करण्यास सद्गुरु च समर्थ आहेत. इतरांचें सामर्थ्य नाहीं, अशी शास्त्रांत प्रसिद्धि ऐकून आणि लोकांत जे सद्गुरूसि शरण गेले ते च जीवन्मुक्त ह्मणवितात, ऐशी लोकप्रसिद्धि ही पाहून आपल्या चरणकमळाचे ठायीं शरण प्राप्त जाहलों. आपण दयाळु आहां. या जन्ममरणात्मक दुःखा पासून मजला आपण मुक्त करावें. आपल्या वांचून या ब्रह्माण्डांत आह्मां अनाथांचा दुसरा त्राता नाहीं. अशी प्रार्थना करून मग बळकट चरण धरावे.

तदनंतर सद्गुरु दुःखा पासून मुक्त होण्याचा उपाय सांगतील.

अरे हे शिष्या, तुला या जन्ममरणात्मक संसारा पासून मुक्त व्हावें अशी इच्छा असल्यास ' मी कोण ' हा विचार करून आत्मज्ञानसंपादन कर. आत्मज्ञाना वांचून कदापि मोक्ष प्राप्त होत नाहीं. यासी दृष्टान्त. कोणा एका पुरुषास मंद अन्धारीं रज्जु पाहून त्या रज्जू वर अधिष्ठाना मुळें सर्पभ्रम होताहे. त्या सर्पभ्रमानें कंपमूर्च्छापलायनादि विकार पुरुषाचे ठायीं प्राप्त होतात. तो विकार, हा सर्प नव्हे, रज्जु आहे असें निश्चयात्मक ज्ञान प्राप्त जाहल्या वांचून दूर होत नाहीं. या प्रकारें आत्मज्ञान जाहल्या वांचून हा दुःखात्मक संसार निवृत्त होणार नाहीं. या स्तव आत्मज्ञानसंपादन कर.

---

## मोक्षस्वरूपोपन्यास.

प्रश्न—हे गुरो, आत्मज्ञानाचें काय प्रयोजन ? आत्मज्ञाना वांचून कर्मानुष्ठानें करून जन्ममरणात्मकसंसारनिवृत्तिरूपमोक्ष कर्मकाण्डी मीमांसक जैमिन्यादिक मानितात. उपासक जे ते वनस्पतिरसयोगें जशी लोहास सुवर्णरूपतेची प्राप्ति तद्वत् अहंग्रहादिक उपासनायोगें करून च जीवास ब्रह्मप्राप्तिरूप-मोक्ष मानितात. देवहूतिपुत्र कपिल या हून अन्यकपिला-दिक सांख्य जे ते प्रकृतिपुरुषविवेकें करून मोक्ष मानितात.

पतंजलिप्रभृति योगी जे ते चित्तवृत्तिनिरोधरूप योगें करून च मोक्ष मानितात. काशीवासिजन जे ते "काश्यां मरणान्मुक्तिः" या वाक्यप्रमाणें करून काशीमरणें करून मोक्ष मानितात. आणि कित्येक भक्त तीर्थयात्रा, ईश्वरनामस्मरणादिकें करून मोक्ष मानितात. अशीं अनेक मोक्षाचीं साधनें असतांना ब्रह्मज्ञाना वांचून मोक्ष प्राप्त होत च नाहीं, अशी प्रतिज्ञा आपण कां करितां.

उ०—हे शिष्य, मोक्ष कांहीं स्वर्गकैलासवैकुंठसत्यलोकादिलोकान्तरप्राप्तिरूप नव्हे. लोकान्तरप्राप्तिरूपें मोक्ष मानिल्यास प्रळयकाळीं सर्वलोकांचा नाश होतो. मोक्षाचा च नाश जाहला. तेव्हां मोक्षास अनित्यत्व प्राप्त होईल. मोक्ष तरी शास्त्रांत नित्य ऐकिला आहे. या कारणा स्तव लोकान्तराची प्राप्ति कांहीं मोक्ष नव्हे. तसें च ब्रह्मा, विष्णु, महेश्वर, इंद्र, चंद्र, सूर्यादि देवताप्राप्ति ही मोक्ष नव्हे. मोक्ष तरी नित्य आहे. हे अवघे अनित्य. प्राकृतप्रलयीं हे कोणी ही राहत नाहींत. पंचमहाभूतां सह वर्तमान मायेचा सुद्धां ब्रह्मरूपीं लय होतो. त्या काळीं केवळ अद्वितीय ब्रह्म सुषुप्तींत जसा साक्षिस्वरूपी आत्मा निराकुल असता हे, तसें निराकुल राहताहे. तस्मात् देवत्वप्राप्ति ही मोक्ष नव्हे.

# प्रलयचतुष्टय.

प्र०—हे गुरो, प्राकृतप्रलय तो कोणता ?

उ०—चार प्रकारचे प्रलय आहेत. नित्यप्रलय, दैनंदिनप्रलय, प्राकृतप्रलय आणि आत्यंतिकप्रलय.

सुषुप्तींत सर्व इंद्रियादिस्थूलसूक्ष्मांचा नित्यशः लय होतो या स्तव सुषुप्ति हा नित्यप्रलय होय.

हिरण्यगर्भाचा एक दिवस चार प्रहर मानाचा होऊन त्या हिरण्यगर्भाची रात्रि प्राप्त होतां च हिरण्यगर्भ ब्रह्मा निद्रित होतो. त्या काळीं शेषमुखाच्या ज्वाळें करून आणि सूर्याचे द्वादशकलांच्या तापें करून अतल, वितल, सुतल, महातल, रसातल, तलातल, पाताल आणि भूर्लोक, भुवर्लोक, स्वर्लोक, हे तीन लोक असे दहा लोक भस्म होतात. महर्लोकपर्यंत ज्वाला जातीहे. या कारणा स्तव महर्लोकवासी जन जे ते जनलोक, तपोलोक व सत्यलोक या लोकत्रयाच्या ठायीं जाऊन वास करिताहेत. त्या काळीं जनलोकीं, तपोलोकीं व सत्यलोकीं अशा तीन लोकीं मात्र वसति असतीहे. या प्रकारें भस्म झाल्या नंतर हस्तिशुंडादंडा प्रमाणें वृष्टि होऊन पाताला पासून स्वर्गलोका पर्यंत जलमय होऊन जाताहे. त्या जला वर अक्षयवटवृक्षाचीं पत्रें तरंगताहेत. त्या पत्रां वर भगवान् महाविष्णु बालमुकुंदरूपें करून शयन करीत असतात.

तदनंतर त्या हिरण्यगर्भाची रात्रि समाप्त होऊन दुसरा दिवस आरब्ध होतां च पुनः पूर्ववत् पातालादिलोकांची रचना होतीहे. हा दैनंदिनप्रलय होय.

प्राकृतप्रलय सांगतों. कृत, त्रेता, द्वापर, व कलि हे चार युग हजार वेळां गेले असतां हिरण्यगर्भ जो ब्रह्मा याचा चतुष्प्रहरात्मक एक दिवस होतो. इतके च युग गेले असतां चतुष्प्रहरात्मक एक रात्रि होते. या प्रमाणें तीनशें साठ दिवस जाहले असतां ब्रह्मदेवाचा एक संवत्सर होतो. असे संवत्सर शंभर होतां च पितामह जो ब्रह्मदेव यास मरण प्राप्त होताहे. त्या काळीं सर्व जगताचा लय त्रिगुणात्मक मायारूप प्रकृतींत होताहे. हा प्राकृतप्रलय होय. सर्व जगताचा प्रकृतींत लय कसा होतो तो प्रकार सांगतों. त्या महाप्रलयकाळीं शिवाच्या नेत्रांतून प्रलयाग्नि प्रकट होऊन संपूर्ण ब्रह्माण्ड भस्म होताहे. त्या काळीं सर्वांचा लय पृथिवींत, पृथिवीचा गंधतन्मात्रेंत, गंधाचा लय उदकांत, उदकाचा लय रसतन्मात्रेंत, रसाचा लय तेजांत, तेजाचा लय रूपतन्मात्रेंत, रूपाचा लय वायूंत, वायूचा लय स्पर्शतन्मात्रेंत, स्पर्शाचा लय आकाशांत, आकाशाचा लय शब्दतन्मात्रेंत, शब्दाचा लय अहंकारांत, अहंकाराचा लय महत्तत्त्वांत, महत्तत्त्वाचा लय त्रिगुणात्मक मायारूप प्रकृतींत, आणि ती प्रकृति ब्रह्मस्वरूपांत लीन होतीहे. त्या काळीं केवळ अद्वितीय ब्रह्म असताहे. या प्रकारें जसा ब्रह्मदे-

वाचीं शंभर वर्षं सृष्टिकाल तसा शंभर वर्षं प्रलयकाल जाणा वा. त्या मायेंत आपल्या कर्मा सहित संपूर्ण जीव लीन होते. त्या जीवांस सुखदुःखादि भोग देण्या विषयीं त्या त्या जीवांचें कर्म ज्या कालीं उन्मुख होतें त्या कालीं ब्रह्मस्वरूपीं लीन होती जी माया ती प्रकट होतीहे. जशी देहांत मध्यान्हकाळीं लीन जाहलेली छाया प्रकट होतीहे. या माये पासून महत्तत्त्व, महत्तत्त्वा पासून अहंकार, अहंकारा पासून पंचतन्मात्रा व तन्मात्रां पासून आकाशादिक; हा उत्पत्तिक्रम पूर्वीं च सांगीतला आहे, या प्रकारें प्राकृतप्रलय सांगीतला.

आतां आत्यंतिकप्रलय सांगतों. मंद अंधकारीं कोणा एका पुरुषास रज्जू वर सर्पभ्रम होतो. त्या भ्रमानें भीति होऊन कंपमूर्च्छादिक प्राप्त होतात. पुनः दीपप्रकाशातें कोणी दाखवून 'अरे, हा सर्प नव्हे रज्जु आहे, असा उपदेश केल्यास मग त्या पुरुषास रज्जूचें ज्ञान होतां च कालत्रयीं सर्प नसतांना व्यर्थ अज्ञानानें सर्प भासून भयकंपादिक जाहले; या प्रकारें रज्जूचे ठायीं सर्पाचा अत्यंत अभाव दिसतो. तसें त्वंपदार्थशोधनपूर्वक सद्गुरूपदेशद्वारा महावाक्यार्थाचें ज्ञान होऊन मी ही ब्रह्मरूपी च, व जगत् ही अवघें ब्रह्मरूपी च. कालत्रयीं ब्रह्मस्वरूपीं जगत् नाहीं च. असा निश्चय होणें हा आत्यंतिकप्रलय होय.

बंधाचें स्वरूप—तस्मात् दृश्यमात्र नाशवंत. या स्तव

लोकान्तरप्राप्ति किंवा देवत्वाची प्राप्ति कांहीं मोक्ष नव्हे. मोक्ष तो कोणता ह्मणशील ? तर सांगतों. स्वस्वरूपावस्थान जें त्यास मोक्ष ह्मणावा. यासि दृष्टान्त. कोणी एक पुरुष पिशाचग्रहें करून ग्रस्त जाहला असतां ब्राह्मण होत्साता यावनी भाषा बोलतो. मी ब्राह्मण नाहीं यवन आहें, या प्रकारें विपरीत भाषण करिताहे. त्या काळीं सर्व जन त्याचा विपरीत व्यवहार पाहून या ब्राह्मणास काय प्रतिबंध प्राप्त जाहला, मोठा अनर्थ प्राप्त जाहला, आपल्या स्वरूपास विसरून भ्रष्ट जाहला ह्मणतात. त्यास च पुनः पूर्वपुण्यें करून कोणी एक पंचाक्षरी प्राप्त होऊन ती पिशाचबाधा दूर होतां च पूर्ववत् पूर्वस्थिती वर येऊन मी ब्राह्मण आहें, माझे ठायीं यवनत्वाचा स्पर्श सुद्धां नसतांना व्यर्थ भ्रमानें मी नानाप्रकारची वल्गना करीत होतों असें आश्चर्य मानून स्वप्नांत ही मी यवन अशी बुद्धि न करीत होत्साता स्वस्थ ब्राह्मणत्वाभिमानें करून संध्यावंदनादि स्वधर्मानुष्ठानाचे ठायीं तत्पर ज्या काळीं होतो, त्या काळीं सर्व जन, आतां हा विचारविपरीतबंधा पासून मुक्त जाहला ह्मणतात. तसा हा जीव जो तो जगताच्या उत्पत्तीच्या पूर्वीं निद्रेंत जसा निर्विकारब्रह्मरूप असतो तसा ज्ञानस्वरूप, सत्यस्वरूप, आनंदस्वरूप, सजातीयविजातीयस्वगतभेदरहित, अद्वितीयब्रह्मरूप च होता. नंतर सूर्या वर उलूकांनीं कल्पित अंधकारवत् ब्रह्मस्वरूपीं अज्ञानजनकल्पित अनिर्वचनीय त्रिगुणात्मक

मायाशक्तीच्या योगें करून आपल्या स्वरूपासी, श्वानसंगें व्याघ्रबालवत् विसरून मायारूप स्थूलदेहाच्या तादात्म्यानें मी कृश जाहलों, मी श्यामवर्ण आहें, मी गौरवर्ण आहें, मी अमुक गोत्री, अमुकाच्या कुलांतला आहें, मी ब्राह्मण आहें, क्षत्रिय आहें, वैश्य आहें, शूद्र आहें, ब्रह्मचारी आहें, गृहस्थ आहें, वानप्रस्थ आहें, यति आहें, मी स्त्री आहें, पुरुष आहें, नपुंसक आहें, असे स्थूलदेहाचे धर्म आपल्या वर मानून घेतो. आणि पूर्वस्थूलदेहाचा व लिंगदेहाचा वियोग होऊन स्थूलदेहास मरण प्राप्त जाहल्यास आपणास च मरण, आणि दुसऱ्या स्थूलदेहाच्या व लिंगदेहाच्या संयोगरूप स्थूलदेहास जन्म प्राप्त जाहलें असतां आपणास जन्म मानिताहे. या प्रकारें मायारूप लिंगदेहाच्या तादात्म्यानें, त्यांत प्रतमत: इंद्रियतादात्म्यानें मी चांगला डोळस, दूरदर्शी आहें अथवा मंददर्शी आहें, अथवा अंध आहें, मूक, बधिर, पंगु आहें, असें मानिताहे. प्राणतादात्म्यें करून मी क्षुधित आणि तृषित आहें असें मानिताहे; मनाच्या तादात्म्यें करून मी संकल्पविकल्प करणारा आहें, असें मानिताहे. बुद्धितादात्म्यानें मी बुद्धिमान् असें मानिताहे. आणि कर्ता भोक्ता सुखी दुःखी, परलोकांत पुनः या मृत्यु लोकांत गमनागमनकर्ता मी च आहें, या प्रकारें लिंगदेहाचे धर्म आपल्या वर मानून विपरीत वलगना करिताहे. या च प्रकारें जड अज्ञानरूप कारणदेहाच्या तादात्म्यानें आपणास जड मूढ मानून घेताहे. या च प्रकारच्या

विपरीत बुद्धीनें व्यर्थ शोकातें पावून साक्षात् परमात्मा असतां ही जीवदशेतें प्राप्त जाहलाहे. हें च बंधाचें स्वरूप होय.

जीवन्मुक्ताचें स्वरूप—तदनंतर कोणी एका काळीं अनेक जन्मार्जितपूर्वपुण्याचा उदय प्राप्त होतां च ईश्वरानुग्रहें करून आपण कोण, आपल्या रूपातें जाणावें, आणि संसारा पासून मुक्त होण्या विषयीं उपाय तो कोणता; तो ही संपादन करावा म्हणून सद्गुरूस शरण जाण्याची इच्छा करीत होत्साता अकस्मात् सद्गुरु ही प्राप्त होतो. तदनंतर सद्गुरू प्रति शरण जाऊन "हे गुरो, हे स्वामिन्, या संसारबंधा पासून या जन्ममरणात्मक दुःखा पासून मजला आपण मुक्त करावें. "मी दीन अनाथ आहें." या प्रकारें प्रार्थना केली असतां मग ते दयाळु गुरु उपदेश करितात. हे शिष्य, तूं केवळ सच्चिदानंदस्वरूप, अद्वितीय, निर्विकार, निरवय व ब्रह्मस्वरूप च आहेस. परंतु तूं अविद्येच्या योगानें आपल्या स्वरूपास विसरून अविद्यात्मक पंचकोशांच्या तादात्म्यानें सुखी, दुःखी, विकारी, दिसताहेस. सुषुप्तींत अहंकाराचा लय होऊन स्थूलदेहादिकांचे तादात्म्यास सुटतां, हे च तुझ्या स्वरूपाच्या ठायीं क्षुधा, तृषा, काम, क्रोध, सुख, दुःखादिक कांहीं एक विकार दिसत नाहींत. त्या काळीं तूं केवळ सत्यस्वरूप, ज्ञानस्वरूप, आनंदस्वरूप दिसताहेस. तस्मात् तूं सच्चिदानंदस्वरूप ब्रह्म च आहेस. असा उपदेश होतां च त्या च काळीं शिष्याच्या मनांतला भ्रम, कर्ता, भोक्ता, सुखी, दुःखी, हा संघात च मी;

ब्राह्मणादि जातिमान् मी, अशी विपरीत बुद्धि जी होती ती निर्विकार नष्ट होऊन साक्षात् अकर्ता, अभोक्ता, निर्गुण, निर्विकार, सर्वव्यापक, अद्वितीय, सच्चिदानंदस्वरूप, परमात्मा च मी, ब्रह्म च मी अशी अंतःकरणाचे ठायीं वृत्ति उत्पन्न होतीहे. मी ब्रह्म या प्रकारची वृत्ति च अपरोक्ष ब्रह्मज्ञान होय. हें ज्ञान ज्यास दृढ प्राप्त जाहलें त्यास जीवन्मुक्त जाणावें.

संचित प्रारब्ध व क्रियमाण—मी ब्रह्म च, अकर्ता मी, अभोक्ता मी, असें निश्चयात्मक जें ज्ञान त्या ज्ञानाच्या प्रभावें करून जीवन्मुक्ताचीं संचितकर्में भस्म होतात. क्रियमाणकर्में भर्जितबीजवत् भर्जित होतात. प्रारब्धकर्म भोगें करून नष्ट होताहे. या प्रकारें संपूर्ण कर्मांचा नाश होतो. या कारणा स्तव हा देह पडल्या नंतर पुनः देहान्तरप्राप्तिरूप जन्म च त्या जीवन्मुक्तास प्राप्त होत नाहीं.

ज्ञानें करून संचितादि कर्में कशीं नष्ट होतात तो प्रकार सांगतों.

महावाक्याच्या विचारें करून मी अकर्ता, मी ब्रह्म अशी बुद्धि नष्ट होतीहे. मी कर्ता ही बुद्धि नष्ट होतां च मी कर्मांचा कर्ता अशा अभिमानानें अनेक कल्पां पासून ज्ञान होई पर्यंत जें जें पुण्यपापात्मक कर्म संचित केलें होतें तें संपूर्ण नष्ट होताहे. कां जर ह्मणशील तर जशी वृक्षाची मुळी तोडिल्यास वृक्ष आपल्या आपण पडतो. तसें संपूर्ण कर्मांस कर्तृत्वबुद्धि मूळ होय. ती नष्ट जाहली असतां अर्थात् संचित कर्म नष्ट

होताहे. क्रियमाण कर्म ही भर्जितबीजवत् जाहलें. जसे भाजलेले गहूं खायाच्या मात्र उपयोगी. पेरले असतांना अंकुर कांहीं उत्पन्न होत नाहींत. तसें क्रियमाणकर्म ह्मणजे ज्ञान्यानें केलें जें पापपुण्यरूपकर्म त्यास बीजरूप जो 'मी कर्ता' असा अभिमान तो 'मी अकर्ता' असें जें ज्ञान तेणें करून नष्ट होतां च मग तें कर्म लोकांस दृष्टी पडण्या विषयीं आणि ज्ञान्यास विक्षेप देण्या विषयीं मात्र उपयोगी, परंतु पुढें ज्ञान्यास देहान्तरप्राप्तिरूप जन्म देण्यास उपयोगी नाहीं. या स्तव भर्जितबीजवत् ह्मणावें. प्रारब्धकर्म भोगें करून नष्ट होताहे. या स्तव जावत्काल प्रारब्धकर्म आहे तावत्काल ज्ञान्याचा देह राहतो. कर्म सरतां च देह पडतो. त्या कालीं ज्ञान्याचा घटस्फोट होतो.

घटस्फोट—घटस्फोट ह्मणजे प्राणपंचक, ज्ञानेंद्रियपंचक, व कर्मेंद्रियपंचक असे पंधरा आणि अंतःकरणचतुष्टय हे अवघे ज्या ज्या भूता पासून उत्पन्न जाहले होते त्या त्या भूतांत पुनः मिळाले असतां तदनंतर आत्मचैतन्य आणि बाहेर व्यापक जें ब्रह्मचैतन्य हीं दोन्ही एक च जाहलीं. यासि दृष्टान्त. जसा घट फुटला असतां घटांतला घटाकाश व बाहेरला महदाकाश हे दोनी मिळून एक च होतात. तसे च लिंगदेहोपाधी मुळें आत्मचैतन्य, ब्रह्मचैतन्या हून भिन्न होऊन परिच्छिन्न दिसत होतें. परंतु लिंगदेह नष्ट होतां च आत्म्याची परिच्छिन्नता जाऊन अपरिच्छिन्न, अद्वितीय,

सच्चिदानंदस्वरूप ब्रह्म च होत्साता राहतोहे. यास ह्मणावें स्वस्वरूपावस्थानमोक्ष. यास च ह्मणावें विदेहमुक्ति.

## मीमांसकादिकांच्या मतांचा उपन्यास

हा मोक्ष जो तो ब्रह्मज्ञाना वांचून इतर साधनें, कर्म, उपसना योग, काशीमरण अथवा तीर्थयात्रानामस्मरणादिक घेणें करून प्राप्त होत नाहीं. हीं अवघीं कर्मादिक साधनें जीं, तीं अंतःकरणशुद्धिद्वारा ब्रह्मज्ञानाच्या उत्पत्तीस कारण होऊन मोक्षप्राप्तीस कारण होतात. तस्मात् या कर्मादिसाधनांस मोक्षप्राप्तींत परंपरे करून कारणत्व व ज्ञानास साक्षात्कारणत्व होय. या विषयीं दृष्टान्त. अंधकारनिवृत्तिद्वारा स्वदेहादिपदार्थभान होण्या विषयीं दीपादिप्रकाश साक्षात्कारण होय. व तैलवर्त्यादिक जे ते परंपराकारण होतात. कर्मादिसाधनांस मोक्षप्राप्तींत साक्षात्कारणत्व नाहीं. परंपराकारणत्व तें कसें आहे हा प्रकार मीमांसकादिकांच्या मतांचा उपन्यास करून सांगतों.

मीमांसकमत—जैमिन्यादि करून मीमांसक चतुर्विध कर्म ह्मणतात. नित्य, नैमित्तिक, काम्य व निषिद्ध असें चार प्रकारचें कर्म आहे. स्वर्गादिफलाच्या उद्देशा वांचून जें संध्यावंदनअग्निहोत्रादि कर्म शास्त्रांत विहित, अर्थात् ज्या कर्मास

शास्त्रांत फल सांगीतलें नाहीं, तें नित्यकर्म होय. ग्रहणादिपर्वकालनिमित्तें करून जें स्नानदानादि यथाशास्त्र कर्म हें नैमित्तिक कर्म होय. यास ही शास्त्रांत फळ सांगीतलें नाहीं. जें कांहीं स्वर्गादिफलप्राप्त्यर्थ शास्त्रांत सांगीतलेलें ज्योतिष्टोमादि कर्म तें काम्यकर्म होय. जें कांहीं शास्त्रांत, हें न करावें, ह्मणून सांगितलें, जें ब्रह्महत्यादिक हें निषिद्ध कर्म होय.

त्यांत मोक्षाची ज्यास इच्छा असेल त्यानें नित्यनैमित्तिककर्मानुष्ठान ईश्वरप्रीत्यर्थ करावें. ह्मणजे अनेकजन्मां पासून आजपर्यंत जें कर्म संचित केलें असेल तें संपूर्ण नष्ट होताहे. आणि या जन्मीं काम्य कर्म करूं नये. ह्मणजे स्वर्गाचे ठायीं देह प्राप्त होत नाहीं. व निषिद्ध कर्म न करावें ह्मणजे नरकाचे ठायीं देह प्राप्त होत नाहीं. प्रारब्धकर्म तर भोगें करून च नष्ट होताहे. अर्थात् हा देह पडल्या नंतर आत्म्यास पुढें देह प्राप्त होण्यास कर्माकर्म च नाहीं. त्या काळीं देह कोठून प्राप्त होणार ? तस्मात् आत्मा आपल्या स्वस्वरूपें करून राहिला.

या प्रकारें स्वस्वरूपावस्थानमोक्ष कर्में करून प्राप्त होतो. ज्ञानाचें काय प्रयोजन ? तस्मात् यावज्जीव कर्मानुष्ठान च करावें. वृद्धावस्थेंत सर्व अवयव शिथिल होतात. यावज्जीव साङ्ग कर्मानुष्ठान कसें होईल ? असें ह्मणशील तर नित्यकर्मानुष्ठानांत किंचित् अंगवैगुण्य जाहलें असतां हि प्रधानाच्या अनुष्ठानें करून पूर्वोपात्तदुरितक्षयद्वारा परमेश्वरप्रसादानें मोक्ष प्राप्त होतो. तस्मात् ज्ञानार्थ संन्यास करण्याचें प्रयो

जन नाहीं. जे कोणी कर्म करण्या विषयीं असमर्थ असतील, अंधपंगुमूकादिक, त्यांनीं संन्यास करावा. या प्रकारें ते प्रतिपादन करितात.

## मीमांसकांचें ईश्वरस्वरूपा विषयीं मत.

प्रश्न—हे गुरो, मीमांसक निरीश्वरवादी आहेत. त्यांच्या मतानें ईश्वरप्रीत्यर्थ कर्म करणें कसें घडेल ?

उ०—ते मूर्तिमंत देवतादिक मात्र मानीत नाहींत. विग्रहित ह्मणजे विग्रहवान् देवता मानिल्यास अवघें नाशवंत आहे. अनित्यविग्रहरूप अर्थाच्या योगें वेदांस हि अनित्यत्व प्राप्त होईल. ते वेदांस नित्य मानितात. या स्तव ते मंत्रमयी देवता मानितात. मंत्रमयी देवता ह्मणजे ज्या देवतेचा वाचक जो शब्द तो च देवता. तस्मात् ईश्वरशब्द हा ईश्वर. इंद्रशब्द हा इंद्र. अशा अवघ्या शब्दरूप देवता. या प्रकारें मंत्ररूपी इंद्रशब्द हा इंद्र. अशा अवघ्या मंत्ररूप देवता. या प्रकारें मंत्ररूपी ईश्वर त्यांच्या मतांत आहे. अस्तु. प्रसंगोपात्त हें हि सांगितलें. हा मीमांसकांचा सिद्धान्त.

मीमांसकमताचें खंडन—आतां याचें खंडन वेदान्ताचे

---

१ व्यासांनीं केलेला वेदान्ताचा ग्रंथ उत्तर मीमांसा ( ब्रह्मसूत्रें० ) हा होय.

आचार्य जे व्यास त्यांनीं केलें आहे. तें ही सांगतों. व्यास ह्मणतात. कर्मानुष्ठान स्वस्वरूपावस्थानमोक्षप्राप्तीस साक्षात्कारण नाहीं. ज्ञानोत्पत्तिद्वारा कारण आहे. कसें तें सांगतों

नित्यनैमित्तिकानुष्ठानें करून मागील संचित कर्म नष्ट होताहे, ह्मणून मीमांसक ह्मणतात. त्यांस आपण विचारावें कीं, मागील कर्म पुण्यरूप व पापरूप दोनी प्रकारचें आहे. त्यास, नित्यनैमित्तिकानुष्ठानें करून दोनी कर्में नष्ट होताहेत, किंवा एक पाप च नष्ट होताहे? दोनी नष्ट होतात ह्मणणें हें योग्य नाहीं. कसें तें सांगतों. नित्यनैमित्तिक कर्म हें पुण्यरूप असून मागील पुण्यकर्माचा नाश कसें करील? पुण्यापुण्याचा कांहीं परस्पर विरोध नाहीं. जसा प्रकाशानें प्रकाशाचा नाश होत नाहीं तसें पुण्यानें पुण्य कांहीं नष्ट होत नाहीं. अर्थात् या नित्यानुष्ठानानें मागील पाप मात्र नष्ट होताहे, असें प्राप्त जाहलें. तेव्हां मागील पुण्य जें राहिलें तें भोगण्या विषयीं आत्म्यास जन्म प्राप्त होतील. आणि अनेक कोटिकल्पांचे ठायीं संपादित केलेलें पुण्यकर्म किती आहे याचा कांहीं अंत लागत नाहीं. तेव्हां आत्म्यास पुढें जन्म किती प्राप्त होतील याचा हि अंत लागत नाहीं. आणि अनेककल्पां पासून केलेलें संपूर्ण पाप नित्यानुष्ठानें करून नष्ट होताहे ह्मणणें हें ही अयोग्य. तीं मागील पापें किती आहेत याचा अंत लागेल तर अशी व्यवस्था करावी. अंत नसतांना व्यवस्था करणें अयोग्य.

तस्मात् त्या पापकर्में करून अनेक जन्म आत्म्यास होतील. आणि काम्यकर्म व निषिद्ध कर्म करूं नये ह्मणतात हा निर्बंध होणें अशक्य. वसिष्ठादिकांच्यानें सुद्धां हा निर्बंध होणें अशक्य. मग इतर साधारण जीवांची कथा काय? महान महानां पासून ही प्रारब्धयोगानें काम्य व निषिद्ध घडलें आहे, अशा कथा पुराणादिकांच्या ठायीं आहेत. तस्मात् काम्य व निषिद्ध कर्म ही घडेल. त्या पासून ही पुनः जन्म प्राप्त होईल. या प्रकारें कर्मांचा नाश होत नाहीं. या स्तव जन्ममरणादिसंसारा पासून ज्ञाना वांचून केवळ कर्मानें च स्वस्वरूपावस्थानरूपमोक्ष प्राप्त होणार नाहीं.

प्र०—हे गुरो, कर्म तरी कशास करावें?

उ०—हे शिष्य, स्वर्गादिफलाची इच्छा असल्यास सोमयागादि काम्य कर्म करावें. यथासाङ्ग काम्यानुष्ठानें करून स्वर्गादिलोकांची प्राप्ति होताहे. स्वर्गादिभोगांचे ठायीं वैराग्यपूर्वक ज्यास मोक्षेच्छा आहे त्यानें काम्य व निषिद्ध हीं दोनी कर्में टाकून अंतःकरण शुद्ध होण्या विषयीं ईश्वरप्रीत्यर्थ अनुष्ठान केल्यास अंतःकरणशुद्धीस कारण होताहे. तस्मात् अंतःकरणशुद्धि हें फल असतां नित्यनैमित्तिककर्मास फल नाहीं ह्मणणें हें ही अयोग्य. आणि दग्धरथाश्वन्यायें करून पितृलोकप्राप्ति ही नित्यकर्मांचें फल शास्त्रांत सांगितलें आहे. तस्मात् अंतःकरणशुद्धि हें नित्यनैमित्तिकांचें मुख्य फल आहे. पितृलोकप्राप्ति हें अवान्तर फल होय. यास दृष्टान्त. ज्या पुरुषानें आम्रवृक्ष लाविला, त्यास आम्रफ-

लप्राप्ति हें मुख्य फल होय. व छायागंधप्राप्ति अवान्तर फल होय.

दग्धरथाश्वन्याय कसा तें सांगतों. कोणी एका पुरुषाच्या रथाचे अश्व मेले होते. आणि कोणे एके पुरुषाचा रथ दग्ध जाहला होता. त्या काळीं एकाचे अश्व व एकाचा रथ अशी योजना करून दोघे ही रथा वर बसून गेले. त्या प्रमाणें पितृलोकास साधन आणि नित्यकर्मास फल शास्त्रांत सांगितलें नाहीं. या स्तव परस्परें योजना करणें हा दग्धरथाश्वन्याय जाणावा.

तस्मात् या प्रकारें फल संभवत असतां, नित्यकर्मास फल नाहीं ह्मणणें हें अर्थात् अयोग्य.

संन्यास—ज्ञाना वांचून केवळ कर्में करून मोक्ष प्राप्त होत नाहीं, हें पूर्वीं च सांगितलें आहे. तें ज्ञान वेदान्तश्रवण, मनन, व निदिध्यासन रात्रंदिवस केल्या वांचून शीघ्र प्राप्त होणार नाहीं. रात्रंदिवस श्रवणादिकांचा अभ्यास करण्या विषयीं संन्यासा वांचून गृहस्थास नाना प्रकारचे विक्षेपां मुळें तितका अवकाश नाहीं. या स्तव गृहस्थास ज्ञान होण्यास कालान्तर लागेल. ह्मणून शास्त्रांत संन्यासविधान केलें आहे. अंधपंग्वादिकांनीं संन्यास घ्यावा, हा च सिद्धान्त केल्यास "ब्रह्मनिष्ठगुरू प्रति शरण जावें, गुरुशुश्रूषा करावी, प्रश्न करावा, वेदान्तश्रवण करावें" या प्रकारें प्रतिपादन करणारें जें शास्त्र त्यास व्यर्थत्व प्राप्त होईल. अंधादिकां ला श्रवणादिसाधन करण्याची योग्यता नाहीं ह्मणून. तस्मात्

विद्वान् प्राज्ञास, सर्वांगयुक्त, मातृ शिक्षित, गुरुशिक्षित, या प्रकारच्या पुरुषास, क्षत्रियादिजातिरहित असतांना व अविरक्ताप्रतिबंध नसतांना संन्यास घेण्याचा अधिकार आहे. अंधपंग्वादिकांस, मूर्खांस, आणि क्षत्रियादिकांस संन्यासाचा अधिकार नाहीं.

मीमांसकांच्या ईश्वरविषयकमताचें खंडन—आणि ते मीमांसक मंत्रमयी देवता व मंत्रमय च ईश्वर मानितआहेत, हें हीं अयोग्य च. कसें अयोग्य तें सांगतों. अनेकपुराणेतिहासादिकांमध्यें इंद्रादिदेवतेचा विग्रह "वज्रहस्तःपुंरदरः" इत्यादिप्रकारें करून, आणि त्याचीं अहल्यागमनादि कृत्यें, हीं ऐकिलीं आहेत. मंत्रमयी देवता मानिल्यास पुराणादिकांस अप्रामाण्य प्राप्त होईल. तसें च मंत्रमय च ईश्वर मानिल्यास कर्म तर उत्पन्न होतां नष्ट होताहे, मग "त्याचें फळ कालान्तरीं प्राप्त होत आहे, अमुकानें अमुककालीं अमुक कर्म केलें होतें, त्या कर्मास हें फल द्यावें," असें अनुसंधान ठेवून कालान्तरीं फल देणें हें चैतन्यस्वरूपी ईश्वर नसल्यास अनित्यजडवर्णसमूहशब्दस्वरूपी ईश्वरास कसें घडेल ? तस्मात् मंत्रमय ईश्वर म्हणणें हें अयोग्य. सर्वज्ञ, सर्वशक्तिमान्, सर्वान्तरयामी, चैतन्यस्वरूप, ईश्वर मानावा.

तस्मात् केवळ कर्म मोक्षप्राप्तीस साक्षात् कारण नाहीं. अंतःकरणशुद्धिद्वारा व ज्ञानोत्पत्तिद्वारा, परंपरया कारण आहे. हा च शास्त्रसिद्धान्त जाणावा.

समुच्चयवादिमत-आणि समुच्चयवादि जें ह्मणतात तें ही असंगत. कसें असंगत तें ही त्यांच्या मताचा उपन्यास करून सांगतों. जसा पक्षी जो तो दोन्हीं पक्षें करून आकाशांत गमन करितो त्या प्रकारें मुमुक्षु जो तो ज्ञान व कर्म या दोन साधनें करून ब्रह्मरूपमोक्षास प्राप्त होतो. या स्तव मी ब्रह्म असें निश्चयात्मक ज्ञान झाल्या नंतर ही अकरणीं प्रत्यवायनिवृत्त्यर्थ यावज्जीव श्रौतस्मार्त कर्म करावें. तस्मात् केवळ ज्ञान कांहीं मोक्षास कारण नाहीं. ज्ञानकर्मांचा समुच्चय जो तो मोक्षास कारण, असें समुच्चयवादी ह्मणतात. तें ही अयोग्य. कसें तें ऐक.

समुच्चयवादखंडन—ज्या प्रकारें यागादिकांचा आणि स्वर्गांचा साध्यसाधनभावसंबंध आहे, ह्मणून ज्या काळीं यागानुष्ठान त्या काळीं स्वर्गप्राप्ति नाहीं, व ज्या काळीं स्वर्गप्राप्ति त्या काळीं यागानुष्ठान नाहीं, या प्रकारें दोघांची एककाळीं स्थिति च होत नाहीं, त्या प्रकारें कर्म आणि ज्ञान या दोघांचा साध्यसाधनभावसंबंध आहे. ज्ञान जें तें साध्य होय. कर्म जें तें साधन होय. या स्तव दोघांची एककाळीं स्थिति च संभवत नाहीं. मग समुच्चय कसा प्राप्त होईल?

आणि या ज्ञानकर्मांचा परस्पर व्याघ्रबकऱ्यां प्रमाणें परस्पर बाध्यबाधकभाव आहे, ह्मणून दोघांची स्थिति च एका पुरुषाच्या ठायीं संभवत नाहीं. कशी ती ऐक. मी ब्राह्मण अथवा क्षत्रियादिजातिमान् आहें. हे माझे स्वधर्म आहेत. या कर्मांचा मला अधिकार आहे. हें मला अवश्य

कर्तव्य आहे. अशी कर्तृत्वादि बुद्धि उत्पन्न करून कर्मानुष्ठान होताहे. आणि मी सच्चिदानंदस्वरूप, अद्वितीय, अकर्ता, निर्विकार, परमात्मा, आहें, ब्रह्म आहें, हें ज्ञान जें तें कर्तृत्वादिबुद्धीचा नाश करून उत्पन्न होताहे. अर्थात् जेथें कर्तृत्वाभिमान तेथें च कर्म राहताहे. जेथें कर्तृत्वाभिमान नष्ट होऊन अकर्तृत्वबुद्धि, तेथें ज्ञान राहाताहे. कर्तृत्वबुद्धि आणि अकर्तृत्वबुद्धि ह्या दोन्ही एका पुरुषाचे ठायीं राहत नाहींत. या कारणास्तव ज्ञान व कर्म हीं एका पुरुषाचे ठायीं राहत नाहींत. यांचा अंधकारप्रकाशां प्रमाणें परस्पर विरोध आहे. असें असतांना "ज्ञानकर्मांचा समुच्चय मोक्षास कारण,, हें भाषण बालिशभाषणवत् जाणावें. तस्मात् केवल जीवब्रह्मैक्यज्ञान च मोक्षास साधन होय. केवल कर्म अथवा ज्ञानकर्मांचा समुदाय हीं कांहीं मोक्षास साधनें नाहींत. हा च शास्त्राचा सिद्धान्त जाणावा.

---

## उपासना.

प्रश्न—हे गुरो, केवल कर्म अथवा ज्ञानकर्मसमुच्चय हीं मोक्षास साधनें नसोत. परंतु उपासनें करून मोक्ष प्राप्त होतो, ह्मणून उपासकजन ह्मणतात. या विषयीं ते दृष्टान्त देतात कीं, जशी अळी जी ती भ्रमराचे ध्यासें करून भ्रमर च होतीहे, तसा हा जीव जो तो ब्रह्माच्या ध्यासें

करून ब्रह्म च होतो. ब्रह्माचा ध्यास ह्मणजे रात्रंदिवस मी ब्रह्म, मी ब्रह्म अशी भावना करणें ही च उपासना होय. आणि जसें लोहास वनस्पतीचा योग जाहला असतां, सुवर्णरूपता प्राप्त होतीहे, तसें उपासनायोगानें जीवास ब्रह्मस्वरूप प्राप्त होताहे. तस्मात् उपासना च करावा. ज्ञानाचें काय प्रयोजन?

उत्तर—भ्रमरकीटकन्यायें करून जीव ब्रह्म होतो ह्मणतात. त्यास ती अळी आपल्या गृहांत असतांना भ्रमर येऊन त्या आळीस टोंचीत असतो. त्या काळीं त्या अळीस ह्मणजे कीटकास भ्रमर येऊन टोंचील या भीती मुळें भ्रमराचा रात्रंदिवस ध्यास लागतो. त्या ध्यासानें मग ती अळी जी ती भ्रमरा प्रमाणें आकाशांत भ्रमण करीत आहे. एतावता त्या कीटकास भ्रमरतुल्यता मात्र प्राप्त होताहे. भ्रमररूपता कांहीं प्राप्त होत नाहीं. तसें या दृष्टान्तानें जीवास ब्रह्मतुल्यता मात्र प्राप्त होईल, ब्रह्मरूपता कांहीं प्राप्त होणार नाहीं. मोक्ष तरी ब्रह्मस्वरूपाच्या प्राप्तीस ह्मणावा. तस्मात् उपासनें करून मोक्ष प्राप्त होतो ह्मटल्यास हा भ्रमरकीटकांचा दृष्टान्त अयोग्य. तसा च दुसरा लोहसुवर्णदृष्टान्त ही अयोग्य. जसें वनस्पतीचे रसाचे योगानें लोहास सुवर्णरूपता प्राप्त होत्ये हें सत्य. परंतु जावत्कालपर्यंत त्या रसाचें सामर्थ्य लोहांत आहे, तावत्काल त्या लोहास सुवर्णरूपता असत्ये. कालान्तरें करून रससामर्थ्य नष्ट जाहलें असतां, पुन्हा सुवर्णरूपता नष्ट होऊन लोहाचें लोह च होताहे. तसें जीवास

उपासनेचे योगानें ब्रह्मस्वरूपता मानिल्यास जावत्काल उपासनासामर्थ्य, तावत्काल जीवास ब्रह्मरूपता राहील. उपासनासामर्थ्य नष्ट जाहलें असतां, कालान्तरीं पुनः ब्रह्म रूपता नष्ट होऊन जीवाचा जीव होईल. त्या काळीं ब्रह्मप्राप्तिरूपमोक्षास अनित्यत्व प्राप्त होऊन मोक्षास नित्यत्व प्रतिपादन करणारें जें शास्त्र त्यास अप्रामाण्य प्राप्त होईल. तस्मात् उपासना मोक्षप्राप्तीस साक्षात् कारण नाहीं. एकाग्रताद्वारा निरिच्छपुरुषास अंतकाळीं ज्ञानोत्पत्ती करून वर्तमानदेहपाता नंतर च मोक्षदायक. सत्यलोकादिप्राप्तीची ज्यास इच्छा आहे त्या पुरुषास सत्यलोकादिकांचे ठायीं नेऊन तेथें नानाप्रकारचे उत्तम भोग भोगवून हिरण्यगर्भाच्या मरणावसानीं ज्ञान उत्पन्न करून ब्रह्मदेवा सह वर्तमान मुक्त करून या प्रकारें क्रममुक्तिदायक आहे. या प्रकारें ज्ञानोत्पत्तिद्वारा च उपासना मोक्षास कारण. तस्मात् ज्ञानार्थ उपासना करावी. ज्ञान यथार्थ जाहल्या नंतर कर्मा प्रमाणें उपासनेचें ही प्रयोजन नाहीं. मोक्षप्राप्तींत ज्ञान च स्वतंत्र आहे.

आणि कोणी एक उपासना ब्रह्मलोकप्रापक मात्र आहेत. ज्ञानप्रापक नाहींत. त्या ज्ञानप्रापक उपासना कोणत्या, त्यां मध्यें ही क्रममुक्तिदायक कोणत्या, अंतकालीं देहपातानंतर मुक्तिदायक कोणत्या आणि ज्ञानातें उत्पन्न करून केवल ब्रह्मलोकप्रापक कोणत्या, हा सर्व प्रकार उपासनास्वरूपांत दाखवून सांगतों.

उपासनानाम मनोव्यापार. तो कसा ह्मणशील तर सांगतों. आपणास सगुणब्रह्माची अथवा निर्गुणब्रह्माची अथवा पंचाग्निविद्यादिकांची, ज्याची उपासना करण्याची इच्छा असेल त्या त्या उपासनेचीं अंगें कोणतीं, गुण कोणते, हा प्रकार गुरुमुखानें समजून घेऊन सर्वकाळ आपल्या अंतःकरणांत इतरपदार्थाकार वृत्ति उत्पन्न होऊं न देतां, उपास्यब्रह्मादिदेवताकारवृत्तीचा च रात्रंदिवस प्रवाह चालविणें हें उपासनेचें स्वरूप होय.

उपासनेचे भेद—आतां उपासनेचे भेद सांगतों. अहंग्रहोपासना, प्रतीकोपासना, दहरोपासना, पंचाग्निविद्यारूपोपासना. या प्रकारें शास्त्रांत नानाप्रकारचे उपासनेचे भेद सांगितले आहेत. आणि अहंग्रहोपासनेचा ही भेद आहे. सगुणब्रह्माची अहंग्रहोपासना आणि निर्गुणब्रह्माची अहंग्रहोपासना.

सगुणब्रह्माची अहंग्रहोपासना—आतां सगुणब्रह्माची अहंग्रहोपासना सांगतोंः—सर्वज्ञ, सर्वशक्तिमान्, सर्वनियंतृत्वादिगुणविशिष्ट, ईश्वराख्य, सगुणब्रह्म मी आहें, ह्मणून रात्रंदिवस आपल्या ठायीं शालग्राम विष्णू प्रमाणें भावना करून घेणें. ह्मणजे सर्वकाल दुसरी वृत्ति उत्पन्न न होऊं देतां, सर्वज्ञत्वादिगुणविशिष्ट, ईश्वराख्य, ब्रह्म च मी, या वृत्तीचा च अंतःकरणीं प्रवाह चालविणें. या प्रकारें हिरण्यगर्भ मी, अशी आपल्या ठायीं भावना करून घेणें ही हिरण्यगर्भाची उपासना जाणावी. जसा प्राण जो तो सुषुप्तीं

त सर्वांचा उपसंहार करून घेतो त्या प्रकारें प्रलयकालीं वायु जो तो सर्वांचा उपसंहार आपल्या ठायीं करून घेतो. ह्मणून प्राणाचे ठायीं आणि वायूचे ठायीं सवर्गगुण जाणावा. तस्मात् सवर्गगुणविशिष्ट प्राण मी, ही आध्यात्मिकोपासना; सवर्गगुणविशिष्ट वायु मी, ही आधिदैविकोपासना; आणि पातालादिलोकां पासून सत्यलोका पर्यंत ज्याचे पदादिमस्तकान्त शरीरावयव आहेत, चंद्रसूर्य ज्याचे नेत्र आहेत, असा जो वैश्वानर तो मी, अशी भावना करणें ही वैश्वानरोपासना. या प्रकारें करून सगुणब्रह्माच्या अहंग्रहोपासना शास्त्रांत अनेक आहेत. या उपासनांचें फल अर्चिमार्गद्वारा ब्रह्मलोकादिलोकान्तराच्या ठायीं जाऊन तत्तुल्यस्वरूपतेतें प्राप्त होऊन तत्तुल्यभोगांतें भोगून ब्रह्मदेवा बरोबर सरते शेवटीं मुक्ति होणें हें होय.

---

१ अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् ॥
तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः

॥ भ०गी० ॥८।२४॥

भावार्थ—या मार्गांत अग्नि, ज्योति (सूर्यप्रकाश), दिवस, शुक्लपक्ष, उत्तरायण इत्यादिकांच्या अभिमानिनी देवता असतात. देहपातानंतर जीव पहिल्या देवते कडे जातो. ती देवता त्याला दुसऱ्या देवते कडे पोंचविते. दुसरी देवता तिसऱ्या देवते कडे पोंचविते. या प्रमाणें जीवाला त्या देवता ब्रह्मा पर्यंत नेऊन पोंचवितात. या मार्गाला अर्चिमार्ग, देवमार्ग, शुक्लमार्ग किंवा ब्रह्ममार्ग ह्मणतात.

निर्गुणब्रह्माची अहंग्रहोपासनाः—आतां निर्गुणब्रह्माची अहंग्रहोपासना सांगतों. सच्चिदानंदस्वरूप अद्वितीय ब्रह्म च मी अशी आपल्यावर निर्गुणब्रह्मभावना रात्रंदिवस करणें ही निर्गुणब्रह्माची अहंग्रहोपासना होय. याचें फळ निरिच्छ पुरुषास वर्तमानदेहपातानंतर च मोक्षप्राप्ति. स्वेच्छपुरुषास ब्रह्मलोकप्राप्तिपूर्वक ज्ञानद्वारा ब्रह्मदेवा सह वर्तमानस्वस्वरूपावस्थानरूपमोक्षप्राप्ति.

प्रतीकोपासना—प्रणवाचे ठायीं निर्गुणब्रह्म अथवा सगुणब्रह्म याची भावना करणें, आणि शालग्रामप्रतिमादिकांचे ठायीं सगुणब्रह्माची भावना करणें, ह्या अवस्था प्रतीकोपासना जाणाव्या. यांचें ही फल ब्रह्मलोकप्राप्तिपूर्वक ज्ञानद्वारा क्रममुक्ति.

दहरोपासना—दहरोपासना ह्मणजे दहर ह्मणजे अल्प असा जो हृदयाकाश त्याचे ठायीं स्थित जें चैतन्य त्याचे ठायीं ब्रह्मभावना करणें. याचें फल क्रमिक मुक्ति च.

पंचाग्न्युपासना—अग्निहोत्राश्वमेधादिकर्मानुष्ठानें करून जे कोणी एक पुरुष धूममार्गानें स्वर्गलोकास जातात ते तेथें

---

धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम् ॥
तत्र चान्द्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते
॥ भ० गी० ॥८।२५॥

भावार्थ—या मार्गात धूम, रात्रि, कृष्णपक्ष, दक्षिणायन, ज्योति (चंद्रप्रकाश) इत्यादिकांच्या अभिमानिनी देवता, असतात. त्या ही देहपातानंतर जीवाला क्रमें करून पितृलोकीं पोंचवितात, या मार्गाला धूममार्ग, पितृमार्ग किंवा कृष्णमार्ग असें ह्मणतात.

यावत्पुण्य वास करून पुण्य क्षीण होतां च त्या द्युलोका पासून मृत्युलोकीं येते वेळेस मध्यें पांच ठिकाणीं त्यांचा वास होतो. ह्मणून पांच स्थळीं त्याच्या होमाची कल्पना करावी. प्रथमतः स्वर्गाचे ठायीं पुण्य क्षीण होतां च त्याचा देह घृता प्रमाणें विरघळून जातो. या स्तव द्युलोकांत त्याचा होम होतो. ह्मणून द्युलोकाचे ठायीं अग्निदृष्टि करावी. तदनंतर मेघा मध्यें येऊन मेघरूप होऊन पर्जन्यरूप होतो, तेव्हां पर्जन्या मध्यें होम जाहला ह्मणावा. या स्तव पर्जन्याचे ठायीं अग्निदृष्टि करावी. मग तेथून वृष्टिद्वारा अन्ना मध्यें येऊन अन्नरूपें करून अन्ना मध्यें राहतो. ह्मणून अन्नांत होम कल्पावा. आणि अन्नरूपपृथ्वीचे ठायीं अग्निदृष्टि करावी. तदनंतर अन्नद्वारा पुरुषाचे उदरांत जाऊन वीर्यरूपें करून राहतो. त्या काळीं पुरुषाचे ठायीं होम जाहला ह्मणावा या स्तव पुरुषाचे ठायीं अग्निदृष्टि करावी. तदनंतरत्यभा- पासून रेतोरूपें करून स्त्रीचे उदरांत येऊन गर्भरूपें करून राहतो. तेथें ही पांचव्यानें होम जाहला. या स्तव स्त्रीचे ठायीं ही अग्निदृष्टि करावी. या प्रमाणें पांचांचे ठायीं अग्निभावना करणें ही पंचाग्निविद्या होय. आणि या पांच ठिकाणीं कुंड कोणतें, समिधा कोणत्या, ज्वाला कोणत्या, धूम कोणते हा संपूर्ण प्रकार त्या पंचाग्निविद्याप्रकरणांत सांगितला आहे. ग्रंथ वाढेल या स्तव येथें सांगितला नाहीं या पंचाग्निविद्ये करून दुसऱ्या मन्वंतराचे ठायीं पुनः माघारा येतो. या स्तव ही उपासना ज्ञानद्वारा क्रममुक्तिदायक

ही नाहीं. मागें सांगितल्या ज्या उपासना त्या क्रममुक्तिदायक जाणाव्या.

तस्मात् संपूर्ण उपासना ज्ञानोत्पत्ती विषयीं मात्र एकाग्रताद्वारा कारण आहेत. मोक्षप्राप्ती विषयीं साक्षात् कारण ज्ञान च होय. या स्तव ज्ञानसंपादन करावें.

---

## योग.

प्रश्न—हे गुरो, केवळ अद्वितीयब्रह्मस्वरूपें करून अवस्थिति च मोक्ष, ह्मणून आपण पूर्वीं मोक्षाचें लक्षण सांगितलें, त्याज वरून अर्थांत द्वैतनिवृत्ति हें मोक्षाचें स्वरूप ठायीं ? तस्मात् द्वैतनिवृत्तिरूपमोक्षप्राप्ती विषयीं अष्टांगपंचसंपादन करावें, ब्रह्मज्ञानाचें काय प्रयोजन ह्मणून पतंजलिप्रभृति योगी ह्मणतात, तस्मात् मोक्षप्राप्त्यर्थ योग च संपादित करावा,

उत्तर—हे शिष्य, चित्ताच्या वृत्तीचा निरोध करणें हें योगाचें स्वरूप या योगाचे प्राप्त्यर्थ शास्त्रांत योगाचीं अष्ट अंगें सांगितलीं आहेत. तीं अंगें कोणतीं, त्यांचें स्वरूप व भिन्न भिन्न फलें तीं कोणतीं तें ही सांगतों.

यम, नियम, आसन, प्रणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, आणि समाधि हीं योगाचीं अष्ट अंगें होत.

यम—यम कोणते ते सांगतों. अस्तेय ह्मणजे चोरी न करणें, दया, आर्जव, शांति, शौच ह्मणजे मृत्तिकाजलें करून देह शुद्ध करणें हें बाह्य शौच व रागादिरहित अंतःकरण करणें हें आंतरशौच, धैर्य, मिताशन ह्मणजे परिमित भोजन करणें, सत्यभाषण, अहिंसा ह्मणजे जीवाची हिंसा न करणें आणि ब्रह्मचर्य, हे दहा यम होत.

नियम—आतां नियम सांगतों-आस्तिक्य ह्मणजे वेदशास्त्रांचे ठायीं आणि ईश्वराचे ठायीं आस्तिक्यबुद्धि असणें, संतोष, तप, ईश्वरार्चन, दान, लज्जा, सुमति, श्रवण, होम, जप, हे दहा नियम, जाणावे.

यमनियमांचीं फलें—यांत कित्येकांचें फल सांगतों. अहिंसाभ्यासें करून परस्परविरोधी अहिनकुलादिक जे ते विरोधातें टाकून याच्या सन्निध वास करिताहेत. सत्यभाषणाचे अभ्यासानें जें आपण पुण्यकर्म केलें त्याचें फल शीघ्र प्राप्त होतें. अस्तेयाचे अभ्यासानें स्वतः संपूर्ण रत्नें उपस्थित होतात. ब्रह्मचर्याचे अभ्यासें करून वीर्यप्राचुर्य होताहे. अपरिग्रह ह्मणजे दान याचे अभ्यासानें जन्मान्तराचें स्मरण होताहे; त्या स्मरणें करून सकलयोग्यांस अनुभूत जे विषय त्यांचा बोध जाहला असतां संपूर्ण जंतूंच्या भाषा, इंगितें इत्यादिकांचा परिचय होतो. शौचानुष्ठानें करून अंतःकरणशुद्धि आणि अमेध्यवस्तूचे ठायीं जुगुप्सा उत्पन्न

होऊन आपल्या शरीराचे ठायीं निंद्यबुद्धि होऊन तदनंतर दुसऱ्याचे शरीराचे ठायीं देखील निंद्यबुद्धि होऊन संग करूं नये असें वाटताहे. सन्तोषें करून सुखप्राप्ति होत्ये. तपें करून शरीर आणि इंद्रियें शुद्ध होतात. शरीर शुद्ध जाहलें असतां शरीरास महान् अथवा सूक्ष्म करणें आणि एककालीं अनेक देहांची रचना करणें हें सामर्थ्य प्राप्त होताहे. इंद्रियशुद्धि करून अति सूक्ष्म व अतिदूर शब्दाचें श्रवण आणि आकाशीं गमन करणाऱ्याचें वर्तमान कथन करणें, सूक्ष्म गुप्त दूर वस्तूचें दर्शन होणें, या प्रकारच्या गंधादिकांचें ही दर्शन होणें, परकायाप्रवेशादिसामर्थ्य हें संपूर्ण प्राप्त होतें. जपें करून इष्टदेवतादर्शनादि होताहे तदनंतर समाधिप्राप्ती विषयीं जीं विघ्नें असतील तीं दूर होऊन समाधिलाभ होताहे. हें यमनियमांचें फल सांगितलें.

आसनाचे प्रकार व फलें—आतां आसनाचें फल सांगतों—पद्मासन, स्वस्तिकासन, भद्रासन, वीरासन, हीं पांच आसनें योगप्राप्ती विषयीं मुख्य आहेत. यां हून इतर अनेक आसनें शास्त्रांत प्रसिद्ध आहेत. यांचें फल अंगशैथिल्यादिकांचा अभाव व शीतोष्णक्षुधातृषादिकांचा जय होणें.

प्राणायाम व त्याचें फल—आतां प्राणायामाचा प्रकार व फल सांगतों. शरीराचे ठायीं संचार करणारा जो वायु त्याचें वामनासापुटद्वारा यथाशक्ति हळु हळु वरतें होणें हा पूरक होय. मध्यें यथाशक्ति प्राणवायु व अपानवायु यांचा रोध करणें, हा कुंभक होय. तदनंतर यथाशक्ति दक्षिण-

नासापुटद्वारा हळू हळू वायु बाहेर सोडणें हा रेचक होय. या प्रकारें पूरक, कुंभक, व रेचक, यांस प्राणायाम ह्मणावें. त्यांत ही समंत्रक प्राणायाम व अमंत्रक प्राणायाम या प्रकारें दोन भेद आहेत. ब्राह्मणादिकांनीं समंत्रक व शूद्रादिकांनीं अमंत्रक करावा. पूरककुंभकरेचककाळीं मनांत मंत्राचा उच्चार करून प्राणायाम करणें हा समंत्रक व मंत्राचा उच्चार न करितां नुसता प्राणायाम करणें हा अमंत्रक. रेचक व पूरक न करितां केवळ कुंभक मात्र केल्यानें ही प्राणायाम होतो. हा उत्तम प्राणायाम जाणावा.

आतां प्राणायामाचें फल सांगतों. बहुकालपर्यंत प्राणायामाचा अभ्यास करून प्राणायाम सिद्ध जाहला असतां हीं फळें प्राप्त होतात. पाताल, सलिल, गिरि, भूमि आकाश या सर्वांचे ठायीं अकुंठित गति प्राप्त होत्ये. आणि शापानुग्रहसामर्थ्य, अप्रतिहतसर्वज्ञता, इष्टार्थसंपादन करून घेणें, भयाचा नाश करणें, हें सामर्थ्य ही साध्य होतें. आणि अंतर्हित होणें इत्यादि सिद्धि हि प्राप्त होतात.

प्रत्याहार—विषयाचे ठायीं संचार करणारीं जीं इंद्रियें त्यांस विषयांचे ठायीं दोषदृष्टि दाखवून विषयां पासून माघारें फिरविणें हा प्रत्याहार जाणावा.

धारणा—अंगुष्ठा पासून ब्रह्मरंध्रा पर्यंत जें स्थान आहे त्या स्थानाचे ठायीं प्राणवायूचें धारण करून चित्ताची स्थापना करणें ही धारणा जाणावी.

ध्यान—अंतःकरणाचे ठायीं सगुण ब्रह्म अथवा निर्गुण ब्रह्म

ह्यांची भावना करणें. ह्मणजे ब्रह्माकारवृत्तीचा प्रवाह चालविणें हें ध्यान होय.

समाधि-या प्रकारें तैलधारावत् वृत्तिप्रवाहरूप ध्यान करितां करितां अकस्मात् त्या वृत्तींत आनंदाचें प्रतिबिंब पडतें. त्या काळीं आनंदाचें भान होतां च देहादि बाह्यपदार्थांची विस्मृति होत्ये. जावत्काल आनंद, आनंदाकारवृत्ति आणि आनंदाचा अनुभव घेणारा असें ध्येयध्यानध्यातृरूप त्रिपुटीचें भान आहे तावत्काल सविकल्प किंवा संप्रज्ञात किंवा सबीजसमाधि होय. पुढें ध्याता ह्मणजे आनंदाचा अनुभवकर्ता आणि ध्यान म्हणजे आनंदाकारवृत्ति या दोघांचा त्याग करून वृत्तिरहित होत्साता आनंदांत निमग्न होऊन निर्वातस्थळीं ठेविला जो दीप त्याचे परि निश्चळ ज्या काळीं चित्त राहताहे त्या काळीं निर्विकल्प किंवा निर्बीज किंवा असंप्रज्ञात समाधि जाणावा.

या समाधीला होणारीं विघ्नें व निवारणाचे उपाय—समाधीच्या प्राप्ती विषयीं लय, विक्षेप, कषाय आणि रसास्वाद अशीं चार विघ्नें आहेत. तीं तीं विघ्नें ज्या काळीं प्राप्त होतील त्या काळीं त्या त्या उपायें करून दूर करावीं ह्मणजे हा समाधि प्राप्त होईल.

लय म्हणजे सगुण अथवा निर्गुण वृत्तीचा प्रवाह चालत असतांना ती वृत्ति आनंदांत लीन करिते वेळेस अकस्मात् नित्याभ्यासा मुळें हृदयकमलीं पुरीततीनाडींत जाऊन अज्ञानांत लीन होत्ये. त्या काळीं निद्रा प्राप्त होतां च देह आस-

ना वर बसलेला खालीं पडतो. समाधींत कांहीं देह खालीं पडतो असें नाहीं. समाधींत सूक्ष्म अहंकार देहास व्यापून असतो. निद्रेंत अहंकार जो तो देहास सोडून अज्ञानांत लीन होतो. ह्मणून ज्या काळीं चित्त लीन होण्यास पाहत आहे त्या काळीं सावध राहून ब्रह्माकारवृत्तीचा च प्रवाह चालविणें. म्हणजे लयविघ्नाची निवृत्ति होत्ये.

नंतर विक्षेप ह्मणजे ध्येयाकार वृत्ति सुटून मध्यें घटाकार, पटाकार, वृत्ति उत्पन्न होणें. असें दुसरें विघ्न प्राप्त जाहलें-असतां, पुनः त्या कालीं घटपटादि पदार्थांच्या ठायीं दोषदृष्टि देऊन घटपटादिपदार्थां पासून अंतःकरणवृत्तीस माघारें फिरवून पूर्ववत् ध्येयाकारवृत्तीचा प्रवाह चालविणें. ह्मणजे विक्षेपरूपविघ्नाची निवृत्ति होईल.

पुढें कषाय ह्मणजे ध्येयाकारता सुटून इतरपदार्थाकार ही न होऊन स्तब्धान्तःकरण होत्साता मूकवत् तूष्णीम् राहणें, हें कषायरूपी तिसरें विघ्न होय हें विघ्न प्राप्त जाहलें असतां पुनः पूर्ववत् सावध होऊन ध्येयाकारवृत्तीचा च प्रवाह चालविणें. म्हणजे या विघ्नाची निवृत्ति होईल.

आणि पुढें वृत्तिप्रवाह चालतां चालतां वृत्तींत आनंदाचा प्रतिबिंब पडून अंतःकरणांत आनंद वाटतो. त्या आनंदास उत्कृष्ट मानून प्रीतिपूर्वक त्याचें आस्वादन करित होत्साता तेथें च निमग्न होऊन राहणें हें रसास्वादरूपी चवथें विघ्न होय. तेथें त्रिपुटीचें भान आहे. जावत्काल त्रिपुटीचें भान आहे तावत्काल किंचित् श्रम असतात. या कारणा स्तव तें

ही विघ्न च होय. त्या कालीं वृत्तीचा जो प्रवाह चालविला आहे तो सोडून वृत्तिरहित अंतःकरण करून सावध होत्साता तूष्णीम् रहावें. ह्मणजे पुढें बिम्बभूत आनंदांत ती वृत्ति लीन होतां च निर्विकल्पसमाधि प्राप्त होतो अशीं हीं चार विघ्नें व त्यांच्या निवृत्तीचे उपाय ही सांगितले.

सविकल्पसमाधीच्या पूर्वीं ही नानाप्रकारचीं विघ्नें प्राप्त होतात. अकस्मात् सूर्यबिंब दृष्टीस पडून लखलख प्रकाश दिसतो. उष्णा सारखा ताप होतो. एकाएकीं अंधकार दिसतो. आणि गरगरगरगर फिरून वरतीं गेल्या सारखा भास होतो. हीं अवघीं विक्षेपरूप विघ्नें जाणून ध्येयाकार-वृत्तीचा प्रवाह जो चालला आहे तो सोडूं नये. आणि वातपित्तकारक पदार्थ फार खाऊं नयेत. ह्मणजे हीं विघ्नें होणार नाहींत.

प्रश्न—हे गुरो, चित्तवृत्तिनिरोधरूपनिर्विकल्पसमाध्यात्मकयोगाचीं आपण अष्टांगें सांगितलीं. ग्रंथान्तराचे ठायीं तर नेति, धूति, नौलि, इत्यादिक षट्कर्में व लंबिका इत्यादिक

---

(१) हठयोगप्रदीपिकेंत शरीरशुद्ध्यर्थ षट्कर्में फलसहित सांगितलीं आहेत. तीं येणें प्रमाणें:—

धौतिर्बस्तिस्तथानेतिस्त्र टकं नौलिकं तथा ॥
कपालभातिश्चैतानि षट्कर्माणि प्रचक्षते ॥ १ ॥

अर्थ—१ धौति. २ बस्ति. ३ नेति. ४ त्राटक. ५ नौलिक आणि कपालभाति अशीं षट्कर्में होत.

ही साधनें, अशीं अनेक सांगितलीं आहेत. मग अष्टांग च कसें ?

---

षट्कर्मकमिदं गोप्यं घटशोधनकारकम् ॥
विचित्रगुणसंधायि पूज्यते योगिपुंगवैः ॥ २ ॥

अर्थ—शरीरशुद्धि करणारें असें हें कर्मषट्क फार गुप्त ठेवावें. हें कर्मषट्क शरीरांत विचित्र गुण उत्पन्न करणारें आहे. ह्मणून योगिजन याची योग्यता फार समजतात.

१ धौतिकर्म.

चतुरंगुलविस्तारं हस्तपंचदशायतम् ॥
गुरूपदिष्टमार्गेण सिक्तं वस्त्रं शनैर्ग्रसेत् ॥
पुनः प्रत्याहरेच्चैतदुदितं धौतिकर्म तत् ॥ ३ ॥

अर्थ—चार अंगुळें रुंद व पंधरा हात लांब असें, नवें पागोटें इत्यादिकांचें सूक्ष्म वस्त्र, किंचित् उष्ण जलांत भिजवून गुरूनें सांगितलेल्या रीतीनें हळु हळु गिळावें. प्रथम दिवशीं एक हात, दुसरे दिवशीं दोन हात, तिसरे दिवशीं तीन हात या प्रमाणें दररोज एकैक हात अधिक गिळावें. जें वस्त्र गिळिलें असेल त्याचा शेवट पुढील दोन वरच्या, व दोन खालच्या दांतांनीं बळकट धरून नौलिकर्मानें उदरांतील वस्त्र नीट हालवून पुनः हळु हळु बाहेर काढावें. हें धौतिकर्म होय. असें सिद्धांनीं ह्मटलें आहे.

कासश्वासप्लीहकुष्ठं कफरोगाश्चविंशतिः ॥
धौतिकर्मप्रभावेण प्रयान्त्येव न संशयः ॥ ४ ॥

उत्तर—नेति धूति इत्यादिक षट्कर्में शरीरशुद्ध्यर्थं व

---

अर्थ—याचें फळ असें आहे कीं, कास, श्वास, प्लीहा, कुष्ठ आणि वीस प्रकारचे कफरोग हे या धौतिकर्माच्या प्रभावें करून नाशा प्रत पावताहेत.

२ बस्तिकर्म.

नाभिदघ्नजले पायौ न्यस्तनालोत्कटासनः ॥
आधाराकुंचनंकुर्यात्क्षालनं बस्तिकर्म तत् ॥ ५ ॥

अर्थ—नद्यादिजलसंचया मध्यें नाभिप्रमाण खोल उदकांत उभा राहून, कनिष्ठिकांगुलि ज्यांत शिरेल इतकी पोकळ वेळूची नळी, सहा अंगुलें लांबीची घेऊन चार अंगुलें पर्यंत गुदप्रदेशांत घालावी. व बाहेर दोन अंगुलें शिल्लक ठेवावी. मग उत्कटासन (पायांच्या खोटांवर कुल्ले टेकून पायांच्या अंगुलीवर स्थिर राहणें) आंत जलप्रवेश होईल अशा रीतीनें आधाराचा संकोच करावा. मग नौलिकर्मानें शरीरांत शिरलेलें जळ हालवून बाहेर सोडावें. हें बस्तिकर्म होय.

गुल्मप्लीहोदरं चापि वातपित्तकफोद्भवाः ॥
बस्तिकर्मप्रभावेन क्षीयन्ते सकलामयाः ॥ ६ ॥

धात्विन्द्रियान्तःकरणप्रसादं दद्याच्चकान्ति दहनप्रदीप्तिम् ॥
अशेषदोषोपचयं निहन्यादभ्यस्यमानं जलबस्तिकर्म ॥ ७ ॥

अर्थ—या श्लोकद्वयें करून या कर्माचें फळ सांगतात. गुल्म, प्लीह, जलोदर आणि वात, व कफ यां पासून होणारे रोग या सर्वांचा नाश या बस्तिकर्मानें होताहे. तसें च रस, रक्त, मांस,

लंबिकादिसाधनें जीं तीं कुंभकशुध्यर्थ जाणावीं. एतावता हीं बहिरंगसाधनें आहेत.

---

मेद, अस्थि, मज्जा व शुक्र हे सात धातु, पंचकर्मेन्द्रियें, पंचज्ञानेंन्द्रियें, व अंतःकरणचतुष्टय यांचे ताप, विक्षेप, शोकादि, मोह, गौरव, आवरण, दीनतादि जे राजसतामसधर्म हे सर्व निवृत्त होताहेत. सुख, ज्ञान, चापल्य इ० सात्विकधर्म, प्रसाद, कांति, व जठराग्नीची प्रदीप्ति होतीहे. आणि समस्त जें वात, पित्त, कफ यांचें न्यूनाधिक्य तें नाहींसें होताहे.

## २ नेति.

सूत्रं वितस्ति सुस्निग्धं नासानाले प्रवेशयेत् ॥
मुखान्निर्गमयेच्चैषा नेतिः सिद्धैर्निगद्यते ॥ ८ ॥

अर्थ—वीतभर अथवा या कर्मास सोईचा, चांगला गुळगुळीत व ग्रंथिरहित व दृढ असा एक दोरा नाकांत घालून तोंडांतून बाहेर काढावा. तो असा. ज्या नाकपुडींत दोरा घातला असेल तदितर नाकपुडी हातानें दाबून पूरक करावा. आणि मुखानें रेचक करावा. असें वारंवार केलें असतां नाकपुडींतून दोरा मुखांत येईल. मग दोन्ही शेवटें धरून हळू हळू दोरा चाळवा. तसेंच एका नाकपुडींत दोरा घालून दुसरी नाकपुडी दाबून पूरक करावा. व दुसऱ्या नाकपुडीनें रेचक करावा. असें वारंवार केलें असतां दोरा दुसऱ्या नाकपुडींत येईल. मग त्या दोऱ्याचीं दोन्हीं शेवटें धरून घर्षण करावें. वारंवार अभ्यास केल्यावर हा प्रकार साध्य होतो. यास नेतिकर्म असें सिद्ध ह्मणतात.

आणि या अष्टांगसाधनांत ही निर्विकल्पसमाधि, सविकल्प-

कपालशोधिनी चैव दिव्यदृष्टिप्रदायिनी ॥
जत्रूर्ध्वजातरोगौघं नेतिराशु निहंतिच ॥ ९ ॥

अर्थ—हें नेतिकर्म कपाल व नासानाल यांची शुद्धि करितें. दिव्य दृष्टि देतें. व स्कंधाचे वरच्या प्रदेशांत उत्पन्न होणारे रोग तत्काल नाहींसे करितें.

४ त्राटक.

निरीक्षेन्निश्चलदृशा सूक्ष्यलक्ष्यं समाहितः ॥
अश्रुसंपातपर्यंतमाचार्यैस्त्राटकं स्मृतम् ॥ १० ॥

अर्थ—एकाग्रचित्त होऊन निश्चलदृष्टि करून एखादा सूक्ष्म पदार्थ नेत्रांत अश्रु येत तों पर्यंत पहावा. या कर्माला मत्स्येंद्रादियोगाचार्य त्राटककर्म ह्मणतात.

मोचनं नेत्ररोगाणां तंद्रादीनां कपाटकम् ॥
यत्नतस्त्राटकं गोप्यं यथा हाटकपेटकम् ॥ ११ ॥

अर्थ—हें त्राटककर्म नेत्ररोगनाशक आहे. तसेंच तंद्रा, आलस्य इत्यादिकांचा पराभव करणारें आहे. सुवर्णाच्या पेटी प्रमाणें हें अत्यंत गुप्त ठेवावें.

५ नौलिकर्म.

अमन्दावर्तवेगेन तुन्दं सव्यापसव्यतः ॥
नतांसो भ्रामयेदेषा नौलिः सिद्धैः प्रचक्षते ॥ १२ ॥

अर्थ—दोन्ही स्कंध खालीं करून, अतिवेगानें परिभ्रमण करणारा जो जलभ्रम ( भोंवरा ) त्याच्या वेगानें, आपलें उदर

समाधी पेक्षां अंतरंग, सा पेक्षां प्राणायाम, त्या पेक्षां आसन, त्या पेक्षां यम आणि यमा पेक्षां नियम. अंतरंग ह्मणजे जवळ व बहिरंग ह्मणजे दूर.

तस्मात् जावत्काल निर्विकल्पसमाधि आहे, तावत्काल वृत्तिरहित अंतःकरण असतें. ह्मणून द्वैताचें भान नाहीं.

---

डाव्या उजव्या भागीं हालवावें. ह्या कर्माला सिद्धपुरुष नौलि-कर्म ह्मणतात.

मन्दाग्निसंदीपनपाचनादि संधापिकानंदकरी सदैव ॥
अशेषदोषामयशोषणी च हठक्रिया मौलिरियं च नौलिः॥१२॥

अर्थ—हें नौलिकर्म अग्निमान्द्य नाहींसें करितें. जठराग्नि प्रदीप्त करून भुक्तान्नाचें पचन करितें. मलशुद्धि करणारें आहे. अनेकवातादि दोष व रोग यांचें शोषण करितें. धौत्यादिहठ-क्रियेंत हें फार श्रेष्ठ होय.

६ कपालभाति.

भस्त्रावल्लोह कारस्य रेचपूरौ ससंभ्रमौ ॥
कपालभातिर्विख्याता कफदोषविशोषणी ॥ १३ ॥

अर्थ—लोहाराच्या भात्या प्रमाणें जलद रेचक व पूरक करावे. याला कपालभाति ह्मणतात. येणें करून वीस प्रकारचे कफ-दोष नाहींतसे होतात.

षट्कर्मनिर्गतस्थौल्यकफदोषमलादिकः ॥
प्राणायामं ततः कुर्यादनायासेन सिद्ध्यति ॥ १४ ॥

अर्थ—धौतीत्यादिषट्कर्मे करून शरीराची स्थूलता, वीस-

समाधी पासून व्युत्थित जाहला असतां पुनः पूर्ववत् कर्तृत्वाभिमान व रागद्वेषादिक उत्पन्न होतात. तदनुसार पुनः कर्म करील. कर्मानुसार पुनः देहान्तरप्राप्तिरूप जन्म प्राप्त होईल च. तस्मात् जन्ममरणात्मकसंसारा पासून ज्ञाना वांचून केवळ योगानुष्ठानें करून कांहीं मोक्ष प्राप्त होत नाहीं. या स्तव मोक्षप्राप्तीस साक्षात् कारण ज्ञान च होय.

प्रश्न—हे गुरो, योगें करून मोक्ष प्राप्त होत नाहीं. तर पतंजलीनें योग सांगायाचें कारण काय ?

उ०—ज्याचें अंतःकरण परमचंचल आहे. कितीही श्रवण केलें तरी स्थिर होत नाहीं, वारंवार विषयां कडे धांवत आहे, त्यानें योगाचा अभ्यास करावा. ह्मणजे या समाधीच्या अनुष्ठानानें संपूर्ण कर्म आणि अनेक वासना नष्ट होऊन तो वेदान्त-श्रवणाचा उत्तम अधिकारी होतो. एकवार गुरुमुखा पासून त्वंपदार्थशोधनपूर्वक महावाक्याचा अर्थ श्रुत केला असतां

---

प्रकारचे कफदोष, व दुसरे शरांतील मळ हे नाश पावतात. असें झालें असतां, प्राणायाम अनायासानें साध्य होतो. नाहीं तर प्राणायामाला फार श्रम पडतात.

---

अवाप्ताष्टगुणैश्वर्याः सिद्धाः सद्भिर्निरूपिताः ॥

अर्थ—अणिमा, महिमा, गरिमा, लघिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशित्व आणि वशित्व हे अष्टगुण ज्यांस प्राप्त झाले ते सिद्ध जाणावे असें पंडित ह्मणतात.

मी च ब्रह्म ऐसें जीवब्रह्मैक्यज्ञान झटिति उत्पन्न होताहे. आणि अणिमामहिमेत्यादि अष्ट सिद्धि ही प्राप्त होताहेत.

या योगाचे प्राप्ती विषयीं सुलभ उपाय सांगतों. जे ब्राह्मणादिक उत्तम अधिकारी आहेत त्यांनीं शुद्ध देशांत पद्मासनादि आसनां वर बसून मनांत दीर्घ प्रणवाचा उच्चार करावा. इतर स्त्रीशूद्रादिकांनीं मनांत राम या अक्षरांचा उच्चार करावा. ह्मणजे कालान्तरें करून क्रमानें सविकल्पसमाधिपूर्वक निर्विकल्पसमाधि प्राप्त होईल. पुढें वेदान्तविचाराची योग्यता प्राप्त होऊन विचारपूर्वक ज्ञानद्वारा मोक्ष प्राप्त होईल. तस्मात् योग हा ज्ञानोत्पत्ती विषयीं साक्षात् कारण नाहीं. मोक्षप्राप्तीस साक्षात् कारण ज्ञान च होय. या स्तव ज्ञानसंपादन करावें.

---

# सांख्यमत.

प्रश्न—हे गुरो, निरीश्वरवादी कपिलादिक सांख्य ह्मणतात कीं, प्रकृतिपुरुषविचारें करून च स्वस्वरूपावस्थानमोक्ष प्राप्त होईल. महावाक्यप्रतिपाद्य जीवब्रह्मैक्यज्ञानाचें काय प्रयोजन? तस्मात् प्रकृतिपुरुषविचार करावा.

उत्तर—जे प्रकृतिपुरुष दोन च मानितात, ईश्वर कांहीं मानीत नाहींत, ते सांख्य. ती प्रकृति ह्मणजे जगतास

कारण, त्रिगुणात्मक, प्रधान, ह्मणतात. तें जगत्कारण-त्रिगुणात्मक प्रधान, नित्य आहे. स्वतंत्र आहे. जसें दुग्ध जें तें दधिरूपें करून परिणामा प्रति प्राप्त होताहे, तसें हें प्रधान महत्तत्व, अहंकार, शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या पंच तन्मात्रा आणि पंचमहाभूतें, एकादश इंद्रियें- पंच ज्ञानेंद्रियें, एक मन व पंच कर्मेंद्रियें इत्यादि त्रयोविंशतितत्वरूप जगदाकारें करून परिणामा प्रति पावताहे. ह्मणून परिणामी उपादानकारण होत्सातें पुरुषास भोगापवर्ग देण्या विषयीं स्वतंत्र कर्तृ आहे; असें ह्मणतात. पुरुष ह्मणजे आत्मा जो तो स्वतः निर्विकार, चैतन्यस्वरूप आणि पुष्करपलाशवत् निर्लेप आणि प्रतिशरीरीं भिन्न मानितात. त्या आत्म्यास देहेंद्रियाद्याकारें करून परिणामा प्रति पावली जी प्रकृति त्या प्रकृतीशीं अविवेकें करून जें तादात्म्य ( अभेद, एकीभाव ) त्या तादात्म्या संबंधानें सुख, दुःख, कर्तृत्व, भोक्तृत्व इ० नानाप्रकारचे अनर्थ प्राप्त होतात. पुनः अन्वयव्यतिरेकें[१] करून पंचकोशविचारपूर्वक देहेंद्रियादिरूपजडप्रकृती पासून पुरुष वेगळा काढिला असतां, मग तो पुरुष सुखदुःखादिसंपूर्णविकारां पासून मुक्त होऊन आपल्या वास्तवस्वरूपें करून अवस्थित जाह-

---

१ जें असतां जें असतें. उ०—आत्मा आहे ह्मणून पंचकोश आहेत हा अन्वय. जें नसतां जें नसतें. उ०—आत्मा नसल्यास पंचकोश नाहींत. हा व्यतिरेक.

ला असतां, अर्थात स्वस्वरूपावस्थानमोक्ष प्राप्त होतो. ऐक्यज्ञानपूर्वें काय प्रयोजन ह्मणतात. परंतु या प्रकृतिपुरुषाचे विवेकानें त्वंपदार्थभूत आत्म्याचें मात्र शोधन जाहलें. प्रकृति वेगळी पुरुष वेगळा. ही द्वैतबुद्धि कांहीं नष्ट जाहली नाहीं. आणि प्रकृति सत्य, प्रकृतीचें कार्य जगत् ही सत्य, ही बुद्धि नष्ट जाहली नाहीं. जावत्काल द्वैतबुद्धि तावत्काल दुःखात्मकसंसारनिवृत्ति होत नाहीं. ह्मणून श्रुति ही सांगत्ये. तस्मात् प्रकृतिपुरुषविचार जो तो त्वंपदार्थशोधना विषयीं उपयोगी होऊन ज्ञानद्वारा मोक्षास उपयोगी. या स्तव प्रकृतिपुरुषविचारास ही मोक्षप्राप्तींत परंपराकारणत्व आहे. साक्षात्कारणत्व कांहीं नाहीं. साक्षात्कारणत्व मोक्षप्राप्तीस जीवब्रह्मैक्यज्ञान. तस्मात् ज्ञानसंपादन करावें.

---

## काशीवास.

प्रश्न—हे गुरो, कोणी वृद्धजन ह्मणतात, या कर्मादि साधनांचें अनुष्ठान, श्रमसाध्य. योगोपासनादिकांचें अनुष्ठान तरी त्यापेक्षां ही दुःसाध्य. तेव्हां ज्ञान प्राप्त होणें परम कठीण. या स्तव स्वदेशादिकांचा त्याग करून काशीवास करावा. काशींत च देहत्याग करावा ह्मणजे कांहीं एक योगकर्मादि

अनुष्ठानादिकांचा आयास न करित होत्साता अनायासानें मरण होतां च मोक्ष प्राप्त होतो. या स्तव ज्ञानप्राप्तिद्वारा मोक्ष प्राप्त होण्या विषयीं कर्मयोगोपासनादि प्रयास टाकून काशींत मरण्या विषयीं काशीवास च करावा.

उत्तर—काशीमरण हीं ज्ञानद्वारा मोक्षास कारण आहे. साक्षात्कारण नाहीं. कसें तें ऐक. प्रथमतः काशी च प्राप्त होणें दुर्लभ. काशी प्राप्त जाहली तरी यथाविधि वास होणें कठीण. पूर्वकर्मानुसार प्राणिमात्रा पासून पापपुण्यें घडत आहेत. काशींत महान् पातक घडल्यास एकैका पातकास छत्तीस हजार वर्षें भैरवयातना सांगितली आहे. त्या भैरवयातने नंतर दिव्य देह प्राप्त होतो. त्या दिव्यदेहांत विश्वेश्वर तारकोपदेश करतां च मीं ब्रह्म असें जीवब्रह्मैक्यज्ञान होताहे. मग ज्ञानानंतर लिंगदेहाचा घटस्फोट होऊन स्वस्वरूपावस्थानमोक्षास प्राप्त होतो. तस्मात् ज्ञाना वांचून कांहीं काशींत ही मोक्ष नाहीं.

आणि ग्रंथान्तराचे ठायीं काशिक्षेत्राची व्यवस्था सांगितली आहे ती अशी—काशी, वाराणशी, अविमुक्ति, आणि अंतर्गृहीं. या प्रकारें चार विभाग क्षेत्राचे सांगितले आहेत. त्यांत काशींत मरण प्राप्त जाहल्यास भैरवयातनाभोगा नंतर एककल्पपर्यंत सलोकता, तदनंतरं एककल्पपर्यंत समीपता, तदनंतर एककल्पपर्यंत सरूपता, तदनंतर स्वस्वरूपावस्थान आणि कैवल्यरूप सायुज्यमुक्ति. अशी तीन कल्पां नंतर ज्ञानद्वारा मुक्ति होते. वाराणशींत; मरण प्राप्त झाल्यास

एक कल्प समीपता व एक कल्प सरूपता; अशी दोन कल्पां नंतर मुक्ति होते. अविमुक्तेंत देहपतन जाहलें असतां एक कल्प सरूपता व तदनंतर ज्ञानप्राप्तिद्वारा मुक्ति अशी एक कल्पानें मुक्ति होते. आणि अंतर्गृही मध्यें अकस्मात् बाहेरून येतां च तेथें पापाचरण न करीत होत्साता मरण जाहल्यास तत्काळ विश्वेश्वरानें उपदेश करितां च ज्ञानोत्पत्ती नंतर मुक्ति होते. एतावता काशीमरण मोक्षप्राप्तीस कारण सत्य आहे. पण ज्ञानद्वारा च मोक्षास कारण.. साक्षात् कारण नाहीं. साक्षात् कारण सर्वत्र या लोकीं व परलोकीं ज्ञान च होय. हा सर्व शास्त्रांचा सिद्धान्त जाणावा.

आणि काशीमरणें करून ज्ञानोत्पत्ति होण्या विषयीं जे प्रयास ते ही पूर्वीं च सुचविले आहेत. आणि काशीक्षेत्रीं मरण हें सर्वांच्या स्वाधीन ही नाहीं. हानि, मृत्यु, जन्म, लाभ हे प्रारब्धाधीन आहेत. ह्मणून शास्त्रांत सांगितलें आहे. हे जन्ममरणादिक प्राण्याचे स्वाधीन जर असते तर सर्व प्राणी सुखदायक श्रीमंताच्या गृहीं जन्म घेते. दुःखदायक, दरिद्री आणि पश्वादिकांचे ठायीं जन्म न घेते. तस्मात् जन्म ही कोणाचे स्वाधीन नाहीं. व मरण ही कोणाचे स्वाधीन नाहीं. असा शास्त्राचा सिद्धान्त. आणि लोकव्यवहारें करून अनुभव ही असत. या जन्मीं ज्ञानप्राप्ती विषयीं यत्न न करीत होत्साता काशींत मरून मुक्त होऊं, असे काशीमरणें करून मोक्षाशा करणारे ते केवळ बालिश

जाणावे. या च प्रकारें सप्तपुरींतल्या अयोध्यादि[१] षट्पुरी ज्या त्या जन्मान्तरीं काशीप्रापक होत्सात्या ज्ञानोत्पत्तिद्वारा मोक्षास कारण आहेत. साक्षात् कारण नाहींत. तस्मात् मोक्षप्राप्तीस ज्ञान च साक्षात् कारण होय.

---

## तीर्थयात्रा व ईश्वरस्मरण इत्यादि.

प्रश्न—हे गुरो, तीर्थयात्रेश्वरस्मरणादिकें करून ही मोक्षप्राप्ति पुराणान्तरीं ऐकिली आहे. तर आपण ज्ञान च मोक्षास कारण कसें म्हणतां ?

उत्तर—तीर्थयात्रेश्वरस्मरणादिकांस ही अंतःकरणशुद्धिद्वारा परंपरे करून मोक्षास कारणत्व आहे. साक्षात्कारणत्व नाहीं. परंपराकारण कसें तें सांगतों.

षड्विधकर्म—नित्य, नैमित्तिक, प्रायश्चित्त, काम्य निषिद्ध आणि स्वाभाविक असें सहा प्रकारचें कर्म आहे. अकरणीं प्रत्यवायजनक जें संध्यावंदनाग्निहोत्रादिक हें नित्यकर्म होय. पर्वकाळनिमित्त स्नानदानादिक हें नैमित्तिक होय. कृच्छ्र, चान्द्रायण, तीर्थयात्रा, ईश्वरस्मरणादिक हें प्रायश्चित्त होय. स्वर्गादि-

---

१ अयोध्या-मथुरा-माया-काशी-कांची-अवंतिका ॥
पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायकाः ॥

फलप्रापक ज्योतिष्टोमादिक हें काम्यकर्म होय. नरकप्रापक ब्रह्म-हत्यादिक हें निषिद्धकर्म होय. व्यर्थ आयुःक्षयद्वारा अनिष्टप्रापक हें स्वाभाविककर्म होय. अशीं सहा प्रकारचीं कर्में आहेत.

यांत साधारण व असाधारण असे दोन प्रकारचे भेद आहेत. सामान्यफलोत्पादक ह्मणजे सर्वफलांचें उत्पादक तें साधारण कर्म होय. विशेषफलोत्पादक ह्मणजे एकैक फलाचें उत्पादक तें असाधारण कर्म होय. आणि सर्वाधिकारीं कर्तृत्व तें साधारण व भिन्नभिन्नाधिकारीं कर्तृत्व तें असाधारण. कृच्छ्रचान्द्रायणादिक हें एकैक पापाचें निवर्तक. या स्तव हें असाधारण प्रायश्चित्त. तीर्थयात्रा, ईश्वरस्मरणादिक हें सर्वपापांचें निवर्तक. या स्तव हें साधारण प्रायश्चित्त होय. आणि सर्वांस करण्या विषयीं अधिकार आहे. या कारणा स्तव ही हें साधारण प्रायश्चित्त होय.

त्या तीर्थ, ईश्वरस्मरणादिकांत ही उत्तम, मध्यम व कनिष्ठ हा प्रकार आहे. तो प्रकार असा.

चतुर्विधतीर्थ.—स्वर्गमृत्यु पातालादि लोकांचे ठायीं चार प्रकारचीं तीर्थें आहेत. दैवतीर्थ, आसुरतीर्थ, ऋषितीर्थ आणि मानुषतीर्थ. गंगा, गोदा, नर्मदा, इत्यादिक हें ब्रह्मादि देवें करून अधिष्ठित आहे ह्मणून दैवतीर्थ. गयासुरादिकें करून व्याप्त तें आसुरतीर्थ होय. पुष्करादिक ऋषींनीं निर्मित तीर्थ ह्मणून ऋषितीर्थ होय. मनुष्यांनीं निर्माण केलेलें मनुष्यतीर्थ होय.

क्षेत्रें—असें च क्षेत्रें हीं दैवासुरभेदें करून चार प्रकारचीं आहेत.

प्रतिमा— शिवविष्ण्वादि प्रतिमा हीं चार प्रकारच्या ह्मणजे ऋषिस्थापित, असुरस्थापित, देवस्थापित आणि मनुष्यस्थापित या भेदें करून चार प्रकारच्या आहेत.

यांत मानुषतीर्थां पेक्षां आर्षतीर्थादिक उत्तम. त्या पेक्षां आसुर उत्तम. आणि त्या पेक्षां दैवतीर्थादिक उत्तम जाणावें.

नामें—या च प्रकारें ईश्वरनामें हीं दोन प्रकारचीं आहेत. वाकेव्याहरी, रणछोडजी, नंदलाला, इत्यादि मनुष्यकल्पितनामें श्रद्धे करून उच्चार केल्यास पापनिवर्तक होतात. राम, कृष्ण, गोविंद, शिव, महादेव इत्यादि नामें श्रद्धा असो किंवा नसो उच्चारमात्रें करून स्वतः पापनिवृत्तिद्वारा फलदायक होतात.

तीर्थयात्रादिकां पेक्षां नामस्मरण उत्तम आणि सुलभ असून शीघ्रफलदायक आहे. आणि तीर्थयात्रादिकांस भूमिशयन, प्रातःस्नान, मार्गानें गमन करण्यास यानादिकांचा विचार, यथाविधि स्नानदानादिनियम, यांची अपेक्षा आहे. नामस्मरणास कांहीं एक नियमाची अपेक्षा नाहीं. या स्तव नामस्मरण तीर्थयात्रे पेक्षां श्रेष्ठ होयें. या कलियुगीं तरी ईश्वरप्रसादपूर्वक अंतःकरणाची लौकर शुद्धि होण्यास व्यासादिकांनीं सर्वसाधनां पेक्षां नामस्मरण च श्रेष्ठ सांगितलें आहे.

प्रश्न—हे गुरो, तीर्थयात्रानामस्मरणादिकें करून स्वर्गा-

दिलोकान्तराची ही प्राप्ति पुराणान्तरीं ऐकिली आहे. तर पापनिवृत्तिद्वारा अंतःकरणशुद्धि च फळ हें आपण कसें ह्मणतां?

उत्तर—हे शिष्य, सकामपुरुषास स्वर्गादिफळप्रापक, व निष्काम पुरुषास पापनिवृत्तिद्वारा अंतःकरणशुद्धिकारक होय. तस्मात् तीर्थयात्रानामस्मरणादिक हीं सर्वपापनिवृत्तिद्वारा व अंतःकरणशुद्धिद्वारा ज्ञान उत्पन्न होण्यास कारण आहेत. या स्तव हीं मोक्षप्राप्तीस परंपरया कारण होत. साक्षात्कारण ज्ञान च होय.

तस्मात् या जन्मीं अथवा जन्मान्तरीं अनुष्ठित जें कर्म, उपासना, योग, तीर्थयात्रा, ईश्वरनामस्मरणादिसाधनें, येणें करून ज्याचें अंतःकरण अत्यंत शुद्ध होऊन साधनचतुष्टयसंपन्न जो जाहला असेल त्या अधिकारी पुरुषानें महावाक्यप्रतिपाद्य जीवब्रह्मैक्यज्ञानप्राप्ति होण्या विषयीं त्वंपदार्थ व तत्पदार्थ यांचें शोधन करून महावाक्यादिवेदान्तश्रवण करावें. दुर्लभ, सर्वाधिकारसंपन्न व सर्वसामग्रीसंपन्न असा हा मनुष्यदेह व्यर्थ जाऊं देऊं नये.

मनुष्यदेहाची योग्यता—हा मनुष्यदेह दुर्लभ कसा तो सांगतों पापपुण्य समान जाहलें असतां नरदेह प्राप्त होतो. पापपुण्याची समानता होणें काकतालीयवत् दुर्लभ जाणावें.

सर्वाधिकारसंपन्न कसा तो सांगतों. या जगतांत देव, ऋषि, व मनुष्य असे तिघे अधिकारी जन आहेत. त्यांत देवांस ब्रह्मविद्या आणि कोणी एका उपासनेचा मात्र अधिकार

आहे. कर्म करण्याचा अधिकार नाहीं. कां जर ह्मणाल तर ऐका. इंद्रादिदेवांच्या उद्देशें करून हविर्द्रव्यत्याग करणें यास कर्म ह्मणावें इंद्रादिदेवांस आपल्या उद्देशानें आपणांस हविर्द्रव्यत्याग करितां येत नाहीं. या स्तव देवांस कर्माधिकार नाहीं.

या च प्रकारें ऋषींस ही ब्रह्मविद्या आणि उपासनेचा मात्र अधिकार आहे. कर्माचा कांहीं अधिकार नाहीं. मंत्रानुष्ठानकालीं छंदऋषि व देवता यांचा उच्चार केला पाहिजे. ऋषि जर मंत्रानुष्ठान करतील तर आपण त्या मंत्रांचे ऋषि असून आपला आपण उच्चार कसा करावा? या स्तव त्यांस ही कर्माधिकार नाहीं.

मनुष्यांस कर्म, उपासना, व ब्रह्मविद्या या सर्वांचा अधिकार आहे. या स्तव मनुष्य सर्वाधिकारसंपन्न ह्मणावा. आणि गुरु, शास्त्र, इंद्रियें, मन, बुद्धि, इत्यादि सर्व सामग्री करून संपन्न आहे, या स्तव सर्वसामग्रीनें संपन्न ह्मणावा.

असा अधिकारी देह प्राप्त जाहला असतां वेदान्तश्रवणद्वारा ज्ञानसंपादन करून संसारबंधना पासून मुक्त होण्या विषयीं जे यत्न करीत नाहींत ते आरूढ पतित जाणावे. हें समजून ज्ञानसंपादन करून जन्ममरणात्मक संसारा पासून मुक्त होण्या विषयीं यत्न करावा.

प्रश्न—हे गुरो, ज्ञानोत्पत्तिविषयीं तत्त्वंपदार्थशोधनपूर्वक वेदान्तश्रवण, मनन, निदिध्यासन, वारंवार करावें ह्मणून

सांगितलें. त्यास श्रवणादिकें करून ज्ञान प्राप्त होईल. तत्त्वंपदार्थशोधनाचें काय प्रयोजन ?

उत्तर—हे शिष्य, ज्या वाक्याचे ठायीं जीं पदें आहेत त्या पदाच्या अर्थाचें भिन्न भिन्न ज्ञान जाहल्या वांचून समुदायरूपवाक्याचे अर्थाचें ज्ञान होत नाहीं, हा अनुभव आहे. या स्तव तत्पदाचा अर्थ काय, व त्वंपदाचा अर्थकाय; या दोनी पदार्थांचें ज्ञान अवश्य पूर्वी पाहिजे.

प्रश्न—हे गुरो, त्वंपदाचा अर्थ जीवात्मा आणि तत्पदाचा अर्थ ईश्वर, परमात्मा या प्रकारें सर्वांस तत्त्वंपदार्थांचें ज्ञान आहे च. पदार्थशोधनाचें काय प्रयोजन ?

उत्तर—त्वंपदार्थभूत जीवात्मा व तत्पदार्थभूत परमात्मा, ईश्वर या दोघां विषयीं शास्त्राचे ठायीं वादी अनेक प्रकारें विवाद करीत आहेत. आपलें आपलें मत स्थापित करण्या विषयीं प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द, अर्थापत्ति, अनुपलब्धि, संभव ऐतिह्य अशीं आठ प्रमाणें आहेत, त्यांतून कांहीं एक प्रमाणें ही दाखवितात. नाना प्रकारच्या युक्त्या ही दाखवितात. ते अनेकवाद्यांचे सिद्धान्त ही पाहून मुमुक्षूस भ्रम होऊन महावाक्यप्रतिपाद्य ऐक्यज्ञान होणार नाहीं. या स्तव पदार्थशोधन अवश्य पाहिजे.

# भाग दुसरा.

## तत्त्वमसि या महावाक्याचा अर्थ.

### त्वंपदार्थशोधन.

प्रथमतः त्वंपदार्थभूत आत्मा याविषयीं वाद्यांची विप्रतिपत्ति दाखवितों.

चार्वाकमत—देहात्मवादी चार्वाक जे ते देहास च आत्मा मानितात. देह च आत्मा या विषयों प्रत्यक्षप्रमाण आहे ह्मणतात. देहा हून आत्मा जर वेगळा असता तर प्रत्यक्ष दृष्टीस पडता. देहा हून वेगळा कोणी आत्मा दृष्टिस पडत नाहीं. या स्तव ते देह च आत्मा मानितात. या विषयीं ते विरोचनाचा दृष्टान्त देतात. शास्त्रांत ज्ञानाधिकारणत्व हें आत्म्याचें लक्षण ऐकिलें आहे. तें लक्षण "मनुष्योऽहं" या प्रकारें करून आहे. ह्मणून देहाचे ठायीं च ज्ञानाधिकारणत्व दिसताहे. देह जो तो जड असतां ज्ञानवान् ह्मणजे चेतनावान् कसा ह्मणाल तर ते चार्वाक ह्मणतात कीं, पृथिवीचे परमाणु, जलाचे परमाणु, तेजाचे परमाणु, आणि वायूचे परमाणु, असे भूतचतुष्टयाचे परमाणु एकत्र होऊन हा देह उत्पन्न होतो. त्या देहाचे ठायीं भूतचतुष्टयाचें मेलन होतां च चेतनगुण उत्पन्न होतो. जसें हरिद्रा, चुना, व पाणी हीं तीन्ही एकत्र होतां च तांबडा रंग उत्पन्न होतो. त्या

चेतनगुणाचे योगानें देह चेतनावान् दिसतो. तस्मात् देहास ज्ञानाधिकारणत्व ही आहे. प्रत्यक्षप्रमाण ही अनुकूल आहे. विरोचनाचा सिद्धान्त ही आहे या कारणा स्तव देह च आत्मा असें चार्वाक ह्मणतात.

इन्द्रियात्मवादी—दुसरे इंद्रियात्मवादी. देह जो तो इंद्रियांस दृश्य आहे. इंद्रियें जे ते द्रष्ट आहेत. या स्तव इंद्रियें च आत्मा. आणि देह चेतनवान् ह्मणणें हें ही अयोग्य. स्वदेहास मरण प्राप्त जाहलें असतां प्रेतदेहाच्या ठायीं चैतन्य दिसत नाहीं. या स्तव देह जो तो घटा परी जड होय. इंद्रियांच्या योगानें चेतनवान् दिसतो. अश्वाचे योगानें जसा रथ जो तो जड असतांना ही चलायमान दिसतो. तस्मात् रथाच्या परी देह जड आहे. ह्मणून तो आत्मा नव्हे. अश्वाच्या परी इंद्रियें चेतन आहेत. इंद्रियें चेतन आहेत, या विषयीं काय प्रमाण ह्मणाल तर छांदोग्योपनिषदांत प्रमाण आहे. कसें तें सांगतों.

छांदोग्योपनिषदांत इंद्रियांचा परस्पर कलह ऐकिला आहे. कलह कसा तो सांगतों. चक्षु आदि करून संपूर्ण इंद्रियें परस्पर अभिमानें करून "मी थोर आहें, माझ्या च योगानें देह चालतो. मी देहास सोडिलें असतां क्षणमात्र निर्वाह होणार नाहीं." या प्रकारें परस्परें कलह करित आपल्यांत थोर कोण याचा निर्णय करावा ह्मणून सर्व इंद्रियें ब्रह्मदेवा कडे जाऊन प्रश्न करितीं जाहलीं कीं, हे पितामह,

आमच्या या संपूर्ण इंद्रियांत थोर कोण आहे हें सांगावें. त्या कालीं पितामह सांगते जाहले. हे बाप हो, तुमचे मध्यें ज्यानें देहास सोडिलें असतां तत्काल देहास प्रेतत्व प्राप्त होईल तो तुमच्यांत श्रेष्ठ जाणावा. या प्रमाणें सांगतां च त्या काळीं पृथक् पृथक् इंद्रियें देहास सोडून बाहेर गेलीं. पण देहास प्रेतत्व कांहीं प्राप्त जाहलें नाहीं. अंधत्व, बधिरत्न, मुकत्वादि अंगवैगुण्य जाहलें असतां ही देहाचा निर्वाह जाहला. तदनंतर पुनः अवघीं इंद्रियें लज्जित होऊन आपापल्या स्थानीं येऊन राहिलीं. नंतर प्राण ह्मणूं लागला, हे इंद्रियें हो, आतां मी जातों. तुम्ही देह सांभाळावा. मग तो प्राण देहास सोडून ज्या काळीं बाहेर निघण्या विषयीं उद्युक्त जाहला त्या काळीं सर्व इंद्रियें व्याकुळ होऊन प्रार्थना करूं लागलीं. हे प्राणा, आमच्यांत तूं श्रेष्ठ आहेस. तुझे योगानें आमची या देहांत स्थिति आहे. तुझ्या योगानें देहाचें ही जीवन आहे. तूं देहास सोडिल्यास देहास ही प्रेतत्व येईल. व. आमची स्थिति ही होणार नाहीं. अशी इंद्रियांनीं प्रार्थना केली असतां, मग प्राण स्वस्थ होतां च अवघे स्वस्थ जाहले. एतावता इंद्रियें घटा प्रमाणें जड जर असतीं, चेतन नसतीं तर परस्पर कलह कां करतीं? परस्पर कलह करितात. या स्तव इंद्रियें चेतन होत. ह्मणून इंद्रियें च आत्मा होय. देह. आत्मा नव्हे.

आणि देहास आत्मत्व मानण्यास प्रत्यक्षप्रमाण ह्मणतात,

हें ही अयोग्य. बाल्यावस्थेंत जो बालदेह होता तो तारुण्या-स्थेंत नाहीं. तारूण्यावस्थेंतला देह वृद्धावस्थेंत नाहीं. या प्रकारें देहास अनित्यत्व दिसत असतां तद्विषयक प्रत्यक्षप्रमाणास अर्थात् अनित्यत्व प्राप्त होऊन अप्रामाण्यप्राप्त जाहलें. जसा स्वप्नांत प्रत्यक्ष पाहिला जो देह तो जाग्रतींत दिसत नाहीं. ह्मणून स्वप्नस्थ देहाच्या प्रत्यक्षास, तसा च बालदेह तारुण्यांत नाहीं व तरुण देह वृद्धावस्थेंत नाहीं, या स्तव त्याच्या प्रत्यक्षास ही अप्रामाण्य जाणावें.

अहो, बालदेह भिन्न, तरुण देह भिन्न, वृद्धदेह भिन्न, असे भिन्न भिन्न देह मानिल्यास तो च हा देह ही प्रत्यभिज्ञा कशी लोकांत प्रसिद्ध आहे? असें ह्मणसील तर सांगतों. जसा दीप लावून कोनाड्यांत ठेविला असतां, त्याचा धूर वरती जात असतो. धूमा बरोबर ज्वाला हि वर जाते. त्यांत पूर्वधूमा बरोबर गेलेली ज्वाला भिन्न, दुसऱ्या धूमा बरोबर गेलेली ज्वाला भिन्न, व विद्यमानकालीं जी ज्वाला दिसत आहे, ती ही भिन्न. अशा भिन्न भिन्न ज्वाला असतां ही ती च ही ज्वाला असा लोकांस भास होतो. जसी ही प्रत्यभिज्ञा भ्रमरूप त्या च प्रमाणें "तो च हा देह" ही प्रत्यभिज्ञा भ्रमरूप जाणावी. तस्मात् देहास आत्मा मानिल्यास देह अनित्य आहे. तेव्हां आत्म्यास ही अनित्यत्व प्राप्त होईल. आत्मा तरी सर्वांच्या

मतें नित्य आहे. आणि अकृतांभ्यागम आणि कृतविनाश असे दोन दोष ही प्राप्त होतील. तस्मात् देह आत्मा नव्हे.

अहो, देहात्मवादी देहा वर आत्मत्वबुद्धि करितात. तर ते विष्ठे वर आत्मत्वबुद्धि कां करित नाहींत.

उत्तर—या प्राण्यानें जें अन्न भक्षण केलें, त्या अन्नाचे स्थूल, मध्यम व सूक्ष्म असे तीन भाग होतात. स्थूल भाग तो पुरीष ह्मणजे विष्ठा होऊन बाहेर पडतो. मध्म भागाचा रस होऊन सवनाडींत प्रवेश करून तो या देहास वाढवितो. आणि सूक्ष्म भागानें मनाची वृद्धि होत्ये. तस्मात् जसा स्थूलदेह अन्नाचा विकार, तशी विष्ठा ही अन्नाचा विकार होय. देह आत्मा जाहल्यास विष्ठा कां आत्मा होणार नाहीं? या स्तव विष्ठे प्रमाणें देह असतां त्या देहा वर आत्मत्वबुद्धि करणारे चार्वाक पामर जाणावे. व

---

१ नास्तिकदर्शनाचे कर्ते चार्वाकादि हे पूर्वापरजन्म मानीत नाहींत. मनुष्यादिकांस पूर्वजन्म नसल्या मुळें ह्या जन्मांत सुखदुःखादि जे भोग प्राप्त होतात, ते पूर्व जन्मार्जित कर्मा वांचून प्राप्त होतात असें मानावें लागेल. आणि पूर्वकर्मा वांचून भोग प्राप्त होत असल्यास त्या भोगांत न्यूनाधिक्यभाव कां असावा असा विचार ही प्राप्त होतो. हा अकृताभ्यागमदोष होय. तसें च अपर ह्मणजे पुढील जन्म नसल्या मुळें ह्या जन्मांत किती ही पाप अथवा पुण्य केलें तरी त्याचा कांहीं उपयोग नाहीं असें होईल. हा कृतविनाशनामक दोष होय.

ते विरोचनाचा दृष्टान्त देतात, या स्तव ते विरोचना सारखे अविवेकी जाणावे

विरोचनाची गोष्ट —विरोचन अविवेकी कसा तो सांगतों- कोणी एका काळीं ब्रह्मदेवाच्या मुखांतून आत्मज्ञानाचें माहात्म्य ऐकून आत्मज्ञानसंपादन करावें, या हेतू स्तव इंद्र आणि विरोचन हे दोघे ही ब्रह्मदेवास शरण जाऊन प्रार्थना करिते झाले. हे पितामह, आत्मज्ञान झालें असतां, पुनः जन्ममरण प्राप्त होत नाहीं. असें आपल्या मुखांतून ऐकिलें आहे. आणि हजारों श्रुति ही सांगतात. तस्मात् तो आत्मा कोण त्या विषयीं आह्मांस उपदेश करावा. तदनंतर ब्रह्मदेवांनीं दोघांला ही एका वाक्यानें च उपदेश केला. तो प्रकार सांगतों.

हे इंद्र, हे विरोचन, या चक्षूच्या ठायीं जो पुरुष दिसतो, तो आत्मा होय. आणि तो आत्मा अविनाशी आहे. अजर ह्मणजे जरारहित आहे. अमर आहे. शोकरहित आहे.

या प्रकारें लक्षणसहित ब्रह्मदेवानें उपदेश करितां च तदनंतर इंद्र व विरोचन हे दोघे ही आपापल्या बिऱ्हाडास जाऊन विचार करूं लागले कीं, नेत्रांत जो पुरुष दिसतो तो आत्मा होय. या प्रकारें ब्रह्मदेवांनीं सांगितलें आहे. नेत्रांत तर आपल्या पुढें कोणी पुरुष उभा राहिल्यास त्याच्या देहाचा प्रतिबिम्ब पडतो. त्या प्रतिबिम्बास आत्मा

ह्मणावा किंवा देहास आत्मा ह्मणावा हा संशय प्राप्त जाहला. त्या काळीं पुनः दोघे ही देवा कडे जाऊन प्रश्न करिते जाहले कीं, आपण "नेत्राचे ठायीं जो पुरुष दिसतो तो आत्मा" ह्मणून सांगितलें. त्यास, नेत्रांत तरी दुसऱ्याचे देहाचा प्रतिबिम्ब दिसतो. तेव्हां तो प्रतिबिम्ब आत्मा होय, किंवा देह आत्मा होय हा संशय दूर करावा.

तदनंतर पुनः ब्रह्म देवांनीं सांगितलें कीं, तुह्मीं पुनः बिऱ्हाडास जाऊन एक मृच्छराव घेऊन त्यांत जल भरून आपण अभ्यंगस्नान करून वस्त्रालंकारयुक्त होत्साते मग त्या जलपूरित शरावांत पाहून विचार करावा.

तदनंतर दोघे ही बिऱ्हाडास जाऊन जलपूरित मृच्छराव घेऊन त्यांत, अभ्यंगस्नान करून व अलंकारभूषणें करून युक्त होत्साते पाहते जाहले. पुनः अलंकारभूषणें काढून नुसता च देह पाहते जाहले. त्या काळीं दोघांनीं ही विचार केला. जर प्रतिबिंब आत्मा ह्मणावा तर प्रतिबिम्ब तरी देहाचे स्वाधीन आहे. जसा देह तसा प्रतिबिम्ब दृष्टीस पडतो. आणि देहाच्या सत्ते पेक्षां प्रतिबिम्बास भिन्न सत्ता नाहीं. तस्मात् प्रतिबिम्ब कांहीं आत्मा नव्हे, हा निश्चय दोघांनीं केला. तदनंतर देह च आत्मा होईल, हा विचार करूं लागले.

विचार करितां करितां इंद्रास संदेह प्राप्त झाला कीं, देहास आत्मा मानिल्यास अविनाशित्व, अजरत्व, विशोकत्व,

स्वयंप्रकाशत्व इत्यादि श्रुतीनें जीं आत्म्याचीं लक्षणें सांगितलीं तीं देहाचे ठायीं लागू पडत नाहींत. या कारणास्तव तें अवघें व्यर्थ होऊन श्रुतीस अप्रामाण्य प्राप्त होईल. तस्मात् हा स्थूलदेह आत्मा नव्हे.

असा विचार करून पुनः इन्द्र ब्रह्मदेवास शरण गेला. तदनंतर ब्रह्मदेवांनीं सांगितलें कीं, तुझ ठायीं रजोगुणाचें बाहुल्य आहे. तस्मात् तूं बत्तीस वर्षें ब्रह्मचर्य कर.

या प्रकारें तो इंद्र ब्रह्मदेवाकडे तीन वेळा आला असतां तीन वेळ ही प्रकारान्तरें करून आत्मोपदेश करून बत्तीस बत्तीस वर्षें ब्रह्मचर्य सांगितलें तदनंतर पांच वर्षें ब्रह्मचर्य धारण करून विचार करितां च मग इंद्रास यथार्थ आत्म्याचें ज्ञान झालें. त्या दिवसा पासून त्रैलोक्याचें राज्य करित असतां ही सर्व कर्में करून अलिप्त होत्साता व ब्रह्मस्वरूपें करून स्थित होत्साता जीवन्मुक्त ह्मणवितो.

विरोचन संदेह न करितां अविनाशित्व, अजरत्व, अमरत्व इत्यादि श्रुतीनें सांगितलें जें आत्म्याचें लक्षण तें संपूर्ण देहाचे ठायीं च कुयुक्तीनें घटवून देहास च आत्मा समजून कृतकृत्यता मानून घेता झाला.

त्याची कुयुक्ति ही सांगतों. देह जो तो अविनाशी च आहे. परंतु त्याचें तिरोधान न होण्यास व जरादि विकार ही प्राप्त न होण्यास जीं योग[1]कल्पादि साधनें आहेत तीं

---

१ कल्प ह्मणजे नियोगशास्त्र. त्यांतील कर्में.

साध्य न केलें असतां देह जो तो मेल्या सारखा व जरादि रोगें करून ग्रस्त जाहल्या सारखा दिसतो. जसें, बेडकोळ्या उष्णकाळांत वाळून चर्म होऊन पडल्या असतां मेल्या सारख्या भासतात. पर्जन्यकाळीं पर्जन्यरूप साधन प्राप्त होतां च पुनः त्या च बेडकोळ्या जीवंत होऊन उड्या मारितात. तसा देह ही मेल्या सारखा दिसतो. परंतु मरत नाहीं. या स्तव देहास दहन करूं नये. पुरून ठेवावा. ह्मणजे कालान्तरीं गुरुमहाराज बाहेर फिरतील तेव्हां त्यांच्या आंगाचा वायु सुटेल. त्या वायूचे स्पर्शमात्रें करून पुरलेले देह अवघे जीवंत होतील. अशी कुयुक्ति लोकांस सांगून बुद्धीस भ्रम पाडून पुरण्याचा संप्रदाय विरोचनानें केला. तो च संप्रदाय म्लेच्छादिकांत ही दिसताहे. या कारणा स्तव तो विरोचन वेदबाह्य व अविवेकी होय.

त्याचा दृष्टान्त घेऊन देहास आत्मत्व मानणारे, आणि जाति, कुल, गोत्र, वर्ण आश्रम, स्त्रीत्व, पुरुषत्व, नपुंसकत्व, कृशत्व, स्थूलत्व, बाल्य, तारुण्य, वृद्धत्व, जन्म, मरण, हे जे धर्म ते आत्म्याचे ठायीं मानणारे, ते केवल अविवेकी जाणावे. तस्मात् देह आत्मा नव्हे. देहाचे द्रष्टे आणि चेतन अशीं जीं इंद्रियें त्यांस च आत्मत्व मानणें हें योग्य आहे. आणि अहं या प्रकारची बुद्धिवृत्ति त्या वृत्तीचा जो विषय तो आत्मा, हें सर्वांस सम्मत आहे. 'काणोऽहं' 'बधिरोऽहं' 'मूकोऽहं' या प्रकारें अहंबुद्धिग्राह्यत्व इंद्रियांचे ठायीं च

दिसताहे. या कारणा स्तव इंद्रियें च आत्मा होय.

प्राणात्मवादी—या प्रकारें इंद्रियात्मवादी यानें इंद्रियांस आत्मत्व सिद्ध करितां च हिरण्यगर्भोपासक प्राणात्मवादी जे ते व्यग्र होत्साते इंद्रियात्मवादखंडन करण्या विषयीं उद्युक्त होत्साते इंद्रियवाद्यास ह्मणतात. हे इंद्रियात्मवादिन्, ज्या काळीं प्राण जो तो देहाच्या बाहेर निघण्या विषयीं उद्युक्त झाला त्या काळीं संपूर्ण इंद्रियें व्याकुळ होऊन "हे प्राण, तूं आमच्यांत श्रेष्ठ आहेस. तुझ्या सत्तेनें आमची या देहांत स्थिति आहे". अशी प्राणाची इंद्रियांनीं प्रार्थना केली. ही कथा विदित असतां ही पुनः प्राणाच्या अधीन होऊन राहाणारीं जीं इंद्रियें त्यांस आत्मत्व मानतोस? प्राणास आत्मत्व मानींत नाहींस! तस्मात् तुझी बुद्धि मोठी कुशल दिसत्ये. आणि "मी प्राण आहें, प्रज्ञा आहें" ह्मणून इंद्रानें प्रतर्दननामक राजास उपदेश केला आहे. या स्तव प्राण च आत्मा होय.

इंद्राचा प्रतर्दनास उपदेश—इंद्रानें प्रतर्दनास कां उपदेश केला तो ही प्रकार सांगतों. दिवोदासाचा पुत्र प्रतर्दन काशीचा राजा होता. तो रूप, यौवन, गुण, बल, पराक्रम, यांहीं करून संपन्न होत्साता संपूर्ण पृथ्वीचा जय करून सर्व राजे आज्ञांकित करून प्रतिज्ञा करिता झाला कीं, जो कोणी क्षात्रधर्माचा अभिमान करील, त्याला मी आपल्या अंकित करून ठेवीन.

अशी प्रतिज्ञा ऐकून कोणे एक्या काळीं अकस्मात् तेथें नारद आले. त्या काळीं राजानें आसन, पाद्य, अर्घ्य इत्यादिकें करून यथाविधि पूजासत्कारादि करून नारदाला आसना वर बसविल्या नंतर नारद ह्मणूं लागले, हे राजा, विद्यमानकाळीं क्षात्रधर्माचा इंद्रास मोठा अभिमान आहे त्याचा पराभव करून त्यास अंकित केल्या वांचून तुझी प्रतिज्ञा सिद्ध नाहीं. या प्रकारें सांगुन नारदमुनि जाते झाले.

तदनंतर, राजास ईर्ष्या उत्पन्न होऊन इंद्राशीं युद्ध करण्या विषयीं बराबर सेना, रथ घेऊन न जातां तो एकाकी धनुष्यबाणमात्र साह्य घेऊन व एक दूत बरोबर घेऊन इंद्राची जी पुरी अमरावती ती प्रति जाता झाला. तेथें अमरावतीच्या द्वारा बाहेर जाऊन उभा राहून इंद्रास निरोप सांगण्या विषयीं इंद्रा कडे दूत पाठविला. मग तो दूत इंद्राचे सभेंत जाऊन इंद्रास सांगता जाहला, हे इंद्र, भूलोकीं विश्वेश्वराची नगरी काशी या नामें करून मुक्तिपुरी प्रसिद्ध आहे. तेथील दिवोदासाचा पुत्र प्रतर्दननामक राजा आहे. त्याचा मी दूत आहें. त्यानें आपणास निरोप सांगितला आहे कीं, आपण क्षात्रधर्माचा अभिमान करतां. या स्तव मी आपली प्रतिज्ञा सिद्ध करण्या विषयीं एकाकी एक धनुष्यबाणमात्र साह्य होत्साता आलों आहें. तुह्मांस सामर्थ्य असल्यास युद्ध करावें. नाहीं तर शरण यावें.

त्या काळीं देवेन्द्र त्या दूताचें वाक्य ऐकून परम आश्चर्य

करीत होत्साता सर्व देवां सहित युद्धास येता झाला. त्या काळीं प्रतर्दन वीरासन घालून उभा राहत होत्सातः देवां प्रति बोलता झाला. हे देव हो, माझे जे नियम आहेत ते सांगतों ऐका. माझ्या वर दुसऱ्यांनीं बाण टाकिल्या वांचून मी बाण टाकणार नाहीं. आणि जो षोडशवर्षां-च्या आंत असेल, जो साठ वर्षां वर असेल, जो मी शरण आहें ह्मणेल, आणि जो युद्धा पासून पळेल त्याशीं मी युद्ध करीत नाहीं. आणि अस्त्रानें युद्ध करित नाहीं या स्तव पूर्वी आपण सर्वांनीं माझ्या वर बाण टाकावे. मागून मी सर्वां वर बाण टाकीन. असें ह्मणतां च सर्व देवांस परम आश्चर्य वाटून क्रोधयुक्त होत्साते इंद्रा सहित सर्व देव प्रतर्दना वर बाणांची वृष्टि करिते झाले. त्या काळीं प्रतर्दनानें आपल्या कुशलते करून सर्वांचे बाण तोडून एक ही बाण आपणास लागूं दिला नाहीं. नंतर प्रतर्दन देवां वर बाण टाकिता झाला. हजार बाण इंद्रा वर, कोणा वर पांच शें, कोणा वर तीन शें, कोणा वर शंभर आणि सामान्य देव जे होते, त्यांस वक्षस्थळीं एक, दोन भुजांचे ठायीं दोन, कंठदेशीं एक, मस्तकास एक, असे पांच पांच बाण, या प्रकारें सर्वांस बाणें करून ताडन करतां च सर्व देव मूर्छित झाले.

तदनंतर पुनः सर्व देव सावध होतां च देवेन्द्रांनीं मनांत विचार केला कीं हा मानवी होत्साता महापराक्रमी दिसतो.

याचा पराभव आमच्यानें होणार नाहीं. यासी शरण जावें हें ही आह्मांस योग्य नाहीं. तस्मात् कांहीं तरी युक्तीनें यास आपल्या अंकित करावें. या अभिप्रायें करून प्रतर्दना प्रति इंद्र ह्मणूं लागला; हे प्रतर्दन, तुझा पराक्रम, तुझी बुद्धि, व कुशलता, पाहून मी परम प्रसन्न झालों. जें तुला इच्छित असेल तो वर माग.

असें देवेन्द्र बोलतां च प्रतर्दन बोलता झाला. हे देवेन्द्र, मी परम अपराधी आहें आपण आह्मांस परम पूज्य असता ही या क्षात्रधर्माच्या अभिमानें करून आपणास म्यां फार दुःख दिलें. या क्षात्रधर्मास धिकार असो. असा मी अपराधी असतां ही आपण सत्वस्थ, दयाळु, या मुळें वरप्रदान देण्या विषयीं उद्युक्त झालां आहां आपण सुज्ञ आहांत. हा विचार करून सर्वोत्कृष्ट जी विद्या असेल ती मला सांगावी.

अशी प्रार्थना करितां च मग इंद्र विचार करून आत्मविद्या सांगण्या विषयीं उपक्रम करीत होत्साता, मी प्राण आहें, प्रज्ञा आहें, ह्मणून उपदेश करिता झाला.

इंन्द्रियात्मवादखंडन—तस्मात् प्राण च आत्मा होय. आणि अविनाशित्व हें आत्म्याचें लक्षण ऐकिलें आहे तें लक्षण प्राणाचे ठायीं घटत आहे. इंद्रियांचे ठायीं घटत नाहीं. कसें तें सांगतों.

स्वप्न सुषुप्तींत इंद्रियांचा लय जाहला असतां ही प्राणाचा

लय होत नाहीं. तीन्ही अवस्थेंत श्वासोच्छ्वासरूपें करून प्राण जागा असतो. या स्तव प्राण च आत्मा होय.

इंद्रियात्मवादी इंद्रियांस चेतन मानितात, हें अयोग्य. कसें तें सांगतों. अपचीकृतपंचमहाभूतां पासून इंद्रियें उत्पन्न झालीं. तीं पंचमहाभूतें तरी जड आहेत. हा सर्वांस अनुभव आहे. त्यां पासून उत्पन्न जाहलीं जीं इंद्रियें हीं चेतन कशीं होतील? .

प्रश्न—चेतन जर नसतीं तर त्यांनीं परस्परें कलह कसा केला असता?

उत्तर—कलह कांहीं इंद्रियांनीं केला नाहीं. इंद्रियाभिमानी देवतांनीं केला.

अथवा उपनिषदांत जो कलह सांगितला तो अर्थवाद जाणावा. कसा तो सांगतों सर्व इंद्रियादिकां पेक्षां प्राणास ज्येष्ठश्रेष्ठत्व सांगून तद्गुणविशिष्ट प्राणोपासना सांगावी यांत वेदाचें तात्पर्य आहे. कलहकथनांत तात्पर्य नाहीं. वेदांत प्रजापतीनें आपल्या वपेचा होम केला ह्मणून सांगितलें आहे. पण तें कांहीं खरें नाहीं. आपल्या वपेचा होम जर करिता तर वांचता कसा? या करितां वेदाचें तात्पर्य काय, पशुयाग प्रशस्त आहे. यांत तात्पर्य जाणावें. तस्मात् इंद्रियें कांहीं चेतन नाहींत.

आणि इंद्रियांस त्यांनीं द्रष्टृत्व मानिलें आहे हें ही अयोग्य. कसें तें सांगतों. आपलें मन अन्यत्र गेलें असतां, नेत्रा पुढून

कांहीं गेलें तरी स्पष्ट दिसत नाहीं. कोणी भाषण केल्यास स्पष्ट ऐकूं येत नाहीं. पाठीस चिमटा घेतल्यास स्पष्ट भान होत नाहीं. तस्मात् हीं स्वतंत्र नाहींत. दुर्बिणी प्रमाणें किंवा उपनेत्रा प्रमाणें रूपादिविषयांच्या अवलोकना विषयीं साधन मात्र आहेत. हे द्रष्टे कांहीं नव्हेत. या स्तव इंद्रियांस आत्मत्व कांहीं नाहीं. इंद्रियांस आश्रयभूत जो प्राण तो च आत्मा होय. आणि इंद्रियात्मवाद्यांस आपण पुसावें कीं, तुह्मी पृथक पृथक इंद्रियांस आत्मा मानितां किंवा इंद्रियसमुदायास आत्मा मानितां ?

उभयपक्षीं ही दोष येतो. कसा तो सांगतोंः—पृथक पृथक आत्मा मानिल्यास एका देहा मध्यें दहा इंद्रियें तेव्हां दहा आत्मे जाहले. जसें एका ग्रामास दहा मालक असल्यास दहा आज्ञा ग्रामांत होतात. या मुळें सर्व लोक त्रस्त होऊन ग्राम सोडून गेले असतां तो गांव च वोस होतो. तसें एका देहाचे ठायीं दहा आत्मे झाल्यास ते आत्मे देहास आपापल्या कडे ओढितील. व असें झालें असतां तत्काळ शरीर च पडेल. तस्मात् पृथक् पृथक इंद्रियांस आत्मत्व मानणें हें अयोग्य. इंद्रियसमुदायास आत्मत्व मानिल्यास जो दोष येतो तो ही सांगतों. जसें भिंत, स्तंभ, काष्ठ, तृण इत्यादिसमुदायास गृह ह्मणावें. त्यांत भिंत अथवा स्तंभ पडल्यास गृह च नष्ट होताहे. त्या प्रमाणें दहा इंद्रियांत एक इंद्रिय नष्ट जालें असतां आत्मा च नष्ट होईल. पुढें शरीराचें चालणार नाहीं. हा दोष प्राप्त होतो. या स्तव इंद्रियसमुदा-

यास आत्मत्व नाहीं. तस्मात् इंद्रियें आत्मा नव्हत. प्राण च आत्मा होय.

आतां अहंबुद्धिग्राह्यत्व इंद्रियांस आहे. या स्तव इंद्रियें च आत्मा ह्मणतात. हें ही अयोग्य. अहंबुद्धिग्राह्यत्व इंद्रियांस जर असतें तर मी नेत्र, मी कर्ण, मी पाद, असा व्यवहार होता. असा व्यवहार कांहीं लोकांत नाहीं. या स्तव अहंबुद्धिग्राह्य इंद्रियें नाहींत. मग "काणोऽहं, बधिरोऽहं, मूकोऽहं," हा व्यवहार कसा ह्मणाल तर अविवेकमूलक भ्रम जाणावा. तस्मात् इंद्रियें आत्मा नव्हत. काणत्व, बधिरत्व, मूकत्व हे धर्म ही आत्म्याचे नव्हत. देहाचे आहेत. तस्मात् इंद्रियांस आश्रयभूत असा जो प्राण तो च आत्मा होय.

मनात्मवादी—या प्रकारें प्राणात्मवाद्यानें प्राणास आत्मत्व सिद्ध करितां च मग मनात्मवादी क्रुद्ध होऊन ह्मणतात; अहो, बाह्यवायू प्रमाणें जड असा जो प्राण तो आत्मा कसा होईल? तो जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तीन्ही अवस्थांत ही जागा असतो. सुषुप्तींत मनादिकांचा लय जाहला असतां ही प्राणाचा लय न होतां तो जागा असतो ह्मणून आत्मा मानावा ह्मणाल तर हें ही अयोग्य. जसा यजमान निद्रित जाहला असतां राजगृहाचे रक्षणा विषयीं द्वारपाल जागे असतात. ह्मणून ते यजमान होतील काय ? तसा हा प्राण जो तो द्वारपाल जाणावा. आणि हा प्राण आत्मा जर असता तर सुषुप्तींत कोणी गळ्यांतील कंठी नेली असतां

प्रतिबंधा करितां जागा असून ही प्रतिबंध करीत नाहीं. आणि सर्पादि जंतु अंगा वरून गेले असतां ही जाणत नाहीं. तसें च कोणीं चिमटा घेतला असतां अथवा पाय चुरिले असतां, सुखदुःखांचा अनुभव घेत नाहीं तस्मात् हा मूढ असून आत्मा कसा होईल ? जाग्रतिस्वप्नावस्थेंत मन असतें. या कारणा स्तव सुखदुःखाचा ही अनुभव होतो. अनुकूल व प्रतिकूल पदार्थांचें ही ज्ञान होतें. या स्तव मन च आत्मा होय.

शंका—अहो, आत्मा तरी अविनाशी आहे. व मनाचा तर सुषुप्तींत लय होतो. मग मनास आत्मत्व कसें ?

समाधान—सुषुप्तींत मनाचें तिरोधान होताहे. नाश कांहीं होत नाहीं. सुषुप्तींत मनाचा नाश झाल्यास काल अनुभविल्या पदार्थांचें आज स्मरण होणार नाहीं. कां, जर ह्मणाल तर कारण सांगतों. काल ज्या मनानें अनुभव केला तें मन तरी सुषुप्तींत नष्ट जाहलें. आज दुसरें मन जाहलें. तेव्हां त्या मनानें अनुभविल्याचें या मनास स्मरण कसें होईल ? स्मरण तर होताहे. या स्तव सुषुप्तींत मनाचें तिरोधान मात्र होताहे. नाश कांहीं होत नाहीं. या स्तव मन च आत्मा होय. प्राण कांहीं आत्मा नव्हे.

शंका—अहो, प्राण जर आत्मा नसता तर प्रतर्दना प्रति इंद्र जो तो मी प्राण आहें, प्रज्ञा आहें, ह्मणून आपणास प्राणरूपता, प्रज्ञारूपता, दाखवून आत्मोपदेश कां करिता ?

समाधान—प्रतर्दना प्रति इन्द्रानें प्राण च आत्मा, प्रज्ञा च आत्मा या अभिप्रायें करून कांहीं मी प्राण, मी प्रज्ञा, हा उपदेश केला नाहीं. तर त्या इंद्राचा अभिप्राय कोणता ह्मणाल तर सांगतों. जो प्राणाचा ही प्राण, प्रज्ञेची ही प्रज्ञा ह्मणजे ज्याचे सत्तेनें प्राण जो तो जड असतां ही चेष्टा करितोहे, प्रज्ञा ह्मणजे बुद्धि जी ती स्वतः जड असतां हीं ज्याचे योगानें ह्मणजे सत्तेनें चेतनायुक्त होऊन अन्य. घटपटादि पदार्थांतें भासविते. असा जो प्राणोपाधिक, प्रज्ञोपाधिक तो प्राणप्रज्ञाशब्दें करून लक्षून मी प्राण आहें, असा उपदेश केला. तस्मात् प्राणास, प्रज्ञेस कांहीं इंद्रानें आत्मत्व सांगीतलें नाहीं. प्राण च आत्मा जर असता तर दृप्तबालाकिनामक ब्राह्मणा प्रति अजातशत्रुनामक राजा जो तो प्राणास अनात्मत्व दाखवून प्राणा हून वेगळा आत्मा कां दाखविता? त्या अजातशत्रूनें स्पष्ट वेगळा आत्मा दाखविला. या कारणा स्तव प्राण आत्मा नव्हे.

दृप्तबालाकीची गोष्ट—राजानें बालाकी प्रति प्राणा हून वेगळा आत्मा कसा दाखविला ती कथा वेदांत आहे. ती अशी. बालाकिनामक एक ब्राह्मणाचा मूल होता. तो परम गर्विष्ठ होता या कारणा स्तव त्यास दृप्तबालाकि नांव पडतें जाहलें. आणि तो अल्पवयस्क पण परमधूर्त, महान् छलक, मोठा वादविवाद करणारा, होता. असा तो मूर्ख ब्रह्मातें न जाणून छायाब्रह्म, प्रतिबिम्बब्रह्म, इत्यादि उपासनार्थ जीं षोड-

कांहीं गेलें तरी स्पष्ट दिसत नाहीं. कोणी भाषण केल्यास स्पष्ट ऐकूं येत नाहीं. पाठीस चिमटा घेतल्यास स्पष्ट भान होत नाहीं. तस्मात् हीं स्वतंत्र नाहींत. दुर्बिणी प्रमाणें किंवा उपनेत्रा प्रमाणें रूपादिविषयांच्या अवलोकना विषयीं साधन मात्र आहेत. हे द्रष्टे कांहीं नव्हेत. या स्तव इंद्रियांस आत्मत्व कांहीं नाहीं. इंद्रियांस आश्रयभूत जो प्राण तो च आत्मा होय. आणि इंद्रियात्मवाद्यांस आपण पुसावें कीं, तुह्मी पृथक पृथक इंद्रियांस आत्मा मानितां किंवा इंद्रियसमुदायास आत्मा मानितां ?

उभयपक्षीं ही दोष येतो. कसा तो सांगतों:—पृथक पृथक आत्मा मानिल्यास एका देहा मध्यें दहा इंद्रियें तेव्हां दहा आत्मे जाहले. जसें एका ग्रामास दहा मालक असल्यास दहा आज्ञा ग्रामांत होतात. या मुळें सर्व लोक त्रस्त होऊन ग्राम सोडून गेले असतां तो गांव च वोस होतो. तसें एका देहाचे ठायीं दहा आत्मे झाल्यास ते आत्मे देहास आपापल्या कडे ओढितील. व असें झालें असतां तत्काळ शरीर च पडेल. तस्मात् पृथक पृथक इंद्रियांस आत्मत्व मानणें हें अयोग्य. इंद्रियसमुदायास आत्मत्व मानिल्यास जो दोष येतो तो ही सांगतों. जसें भिंत, स्तंभ, काष्ठ, तृण इत्यादिसमुदायास गृह ह्मणावें. त्यांत भिंत अथवा स्तंभ पडल्यास गृह च नष्ट होताहे. त्या प्रमाणें दहा इंद्रियांत एक इंद्रिय नष्ट जालें असतां आत्मा च नष्ट होईल. पुढें शरीराचें चालणार नाहीं. हा दोष प्राप्त होतो. या स्तव इंद्रियसमुदा-

पास आत्मत्व नाहीं. तस्मात् इंद्रियें आत्मा नव्हत. प्राण च आत्मा होय.

आतां अहंबुद्धिग्राह्यत्व इंद्रियांस आहे. या स्तव इंद्रियें च आत्मा ह्मणतात. हें ही अयोग्य. अहंबुद्धिग्राह्यत्व इंद्रियांस जर असतें तर मी नेत्र, मी कर्ण, मी पाद, असा व्यवहार होता. असा व्यवहार कांहीं लोकांत नाहीं. या स्तव अहंबुद्धिग्राह्य इंद्रियें नाहींत. मग "काणोऽहं, बधिरोऽहं, मूकोऽहं," हा व्यवहार कसा ह्मणाल तर अविवेकमूलक भ्रम जाणावा. तस्मात् इंद्रियें आत्मा नव्हत. काणत्व, बधिरत्व, मूकत्व हे धर्म ही आत्म्याचे नव्हत. देहाचे आहेत. तस्मात् इंद्रियांस आश्रयभूत असा जो प्राण तो च आत्मा होय.

मनात्मवादी—या प्रकारें प्राणात्मवाद्यानें प्राणास आत्मत्व सिद्ध करितां च मग मनात्मवादी क्रुद्ध होऊन ह्मणतात; अहो, बाह्यवायू प्रमाणें जड असा जो प्राण तो आत्मा कसा होईल? तो जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तीन्ही अवस्थांत ही जागा असतो. सुषुप्तींत मनादिकांचा लय जाहला असतां ही प्राणाचा लय न होतां तो जागा असतो ह्मणून आत्मा मानावा ह्मणाल तर हें ही अयोग्य. जसा यजमान निद्रित जाहला असतां राजगृहाचे रक्षणा विषयीं द्वारपाल जागे असतात. ह्मणून ते यजमान होतील काय? तसा हा प्राण जो तो द्वारपाल जाणावा. आणि हा प्राण आत्मा जर असता तर सुषुप्तींत कोणीं गव्यांतील कंठी नेली असतां.

श ब्रह्में बृहदारण्यकांत सांगितलीं त्या ब्रह्मांचा मात्र ज्ञाता होता असा तो दृप्तबालाकि विद्याबलें करून संपूर्ण पृथ्वीच्या ठायीं फिरत होत्साता बहुतेक ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या तीन वर्णातें जिंकून अकस्मात् काशीस प्राप्त झाला. काशींत ही तीन्ही वर्णातें जिंकून मग अजातशत्रुराजाला जिंकण्या करितां राजसभेंत प्राप्त होऊन राजास ह्मणूं लागला, हे राजन्, तुला मी ब्रह्मोपदेश करण्या विषयीं आलों आहें. तस्मात् तूं ब्रह्मोपदेश ऐक. असें बालाकीनें ह्मणतां च त्याचें भाषण ऐकून त्या च क्षणीं वस्त्रभूषणादिकें करून अलंकृत सहस्त्र गाई बालाकी प्रति गुरुदक्षिणा देऊन राजा ह्मणता जाहला. हे बालाके, हे ब्राह्मण, अवघे व्यर्थ जनकराजा कडे जातात. जनक जो तो ब्रह्मविद्या घेऊन गुरुदक्षिणा देत असतो. आणि मी ब्रह्मविद्या सांगेन ह्मणतां च गुरुदक्षिणा देतों. असा मी असतांना, परीक्षा न करून ब्राह्मण जनका कडे जातात. अस्तु. त्यांची इच्छा. हे बालाके, ब्रह्म तें कसें? हें मज कारणें सांग. ह्मणून तो राजा ह्मणतां च मग तो बालाकि राजा प्रति, हे राजा, छायापुरुषब्रह्म, प्रतिबिम्बब्रह्म, प्राणब्रह्म. अशीं सोळा ब्रह्में सांगता झाला. तदनंतर महाज्ञानी, महाप्रतापी, परम दयालु, अजातशत्रुनामक राजा जो तो त्या सोळा ब्रह्मांचे ठायीं दोष देऊन ह्मणाला. हीं कांहीं ब्रह्में नव्हत. हीं प्रतिबिम्बादि नाशवंत असतां अविनाशी ब्रह्में कशीं होतील? तस्मात् तूं मूर्ख आहेस. य-

थार्थ ब्रह्म विदित नसतांना मी ब्रह्मज्ञानी, मी ज्ञानी, अशा अभिमानानें सर्व थोर थोर ब्राह्मणादिकांचा उपमर्द त्वां केला. तूं शिक्षेस पात्र आहेस. पण ब्राह्मण जाणून तुझी उपेक्षा केली तस्मात् हे बालाके, तूं अभिमानातें टाकून यथार्थ ब्रह्मवेत्ता पाहून त्याला शरण जाऊन यथार्थ ब्रह्मज्ञानसंपादन कर. या मिथ्याब्रह्मज्ञानानें कृतार्थ होणार नाहींस.

या प्रकारें राजानें त्यास पश्चात्ताप होण्या विषयीं कठोर भाषण करितां च तदनंतर त्यास पश्चात्ताप होऊन तो विचार करिता झाला, हा राजा परम धार्मिक, दयालु, सर्वज्ञ, आहे. मी असा महान् अपराधी असतां ही सर्व अपराधांची क्षमा करून पुनः राजा मला हितोपदेश च करित आहे. तस्मात् हा महान् ज्ञानी असतांना यास टाकून अन्यास शरण जाणें योग्य नाहीं. यास च शरण जावें. असा निश्चय करून तो मग राजाची प्रार्थना करिता झाला.

हे राजन्, माझी निष्ठा आपल्या ठायीं च आहे. आपण च माझे गुरु आहांत. पृथ्वींतले ब्राह्मण, वैश्य, क्षत्रिय अवघे जिंकून आपणास जिंकावें या उद्देशानें मी येथें आलों होतों. आपण महान् तेजस्वी, महान् ज्ञानी, या स्तव आपल्या येथें माझा पराभव झाला. आपल्या दर्शनें करून व भाषणें करून मला पश्चात्ताप ही जाहला. तस्मात् आपणांस मी शरण आहें. आपण माझा उद्धार करावा.

अशी बालाकीनें प्रार्थना करितां च तदनंतर बालाकी प्रति

राजा ह्मणूं लागला. हे बालाके, तूं ब्राह्मण आहेस. तुला उपदेश करण्या विषयीं आह्मां क्षत्रियांस अधिकार नाहीं. तस्मात् तूं कोणी चांगला ब्रह्मवेत्ता ब्राह्मण पाहून त्यासी शरण जाऊन ब्रह्मविद्यासंपादन कर. आणि मी कठोर भाषण केल्या स्तव तुला भीति उत्पन्न होऊन शरण ह्मणत अससील, तर तूं मनांत भीति मानूं नको. मी चोर, लबाड, महान् अन्यायी, जे असतील त्यांस सुद्धां एकाएका तीव्र दंड करित नाहीं. तूं तर ब्राह्मण आह्मांस पूज्य आणि गुरुस्थानापन्न. तेव्हां तुला दंड कसा करीन तुझा हा दुरभिमान नष्ट होऊन पश्चात्ताप व्हावा या कारणा स्तव किंचित् म्यां भयप्रद भाषण केलें. हे ब्राह्मणा, माझ्या अपराधाची क्षमा करावी. मी तुझा सेवक आहें. कांहीं पदार्थांची इच्छा असल्यास आज्ञा करावी. हे बालाके, तूं निर्भय होत्साता स्वस्थचित्तें करून अन्यत्र ब्राह्मण गुरु पाहून शरण जा.

तदनंतर बालाकि ह्मणता झाला. मी आपणांस सोडून अन्यत्र शरण जाणार नाहीं. आपण च कृपा करावी.

मग राजानें बालाकीची निष्ठा पाहून मनांत विचार केला कीं, हा तरी ब्राह्मण. यास उपदेश करण्याचा अह्मां क्षत्रियांस अधिकार नाहीं. परंतु दान देण्याचा आह्मांस अधिकार व प्रतिग्रह करण्याचा यास अधिकार आहे तस्मात् यास ब्रह्मविद्येचें दान करीन असा विचार करून मग

तो राजा त्या बालाकीस सिंहासना वर बसवून षोडशोपचार पूजा करून यथाविधि संकल्प करून ब्रह्मविद्येचें दान करिता झाला.

मग त्या बालकीचा हात धरून त्यास अंतःपुरांत नेता झाला. त्या अंतःपुरांत कोणी एक पुरुष निद्रित घोरत होता. त्या काळीं निद्रित पुरुषास पाहून राजा जो तो बालाकी प्रति बोलता जाला. हे बालाके तूं ज्या प्राणास आत्मा मानितो आहेस, तो प्राण तर घोरतो आहे. यास तूं हाका मार. हा जर आत्मा असेल तर जागा होऊन तुला उत्तर देईल. मग बालाकि ह्मणता जाहला. आपण च हाक मारावी. तदनंतर तो राजा "हे प्राण, हे अमुक, हे अमुक" अशीं नाना प्रकारें नांवें घेऊन हाका मारिता जाहला. प्राणानें कांहीं ओ दिली नाहीं. तदनंतर तो राजा निद्रित पुरुषाचे जवळ बसून त्याचा हात धरून बळकट पिळिता जाहला. त्याला एक काठी ही मारिली तदनंतर तो निद्रित पुरुष जागा होऊन बसल्या वर राजानें बालकीस विचारिलें. हे बालाके, हा जाग्रत जाहला जो पुरुष तो निद्रेंत कोठें लीन जाहला होता? आणि हा कोठून जाग्रत होऊन बाहेर आला. हें मज कारणें सांग असें ह्मणतां च बालकि ह्मणतो. हे राजन्, मला कांहीं समजत नाहीं. आपण च सांगावें. असें ह्मणतां च राजा ह्मणतो. हे बालाके, प्राण जर आत्मा असता तर हाक मारितां च

ओ देता. आणि तो तर ओ देत नाहीं. या कारणा स्तव हा प्राण जो तो बाह्यवायुवत् जड होय. हा शरीराचें रक्षण करण्या विषयीं केवळ द्वारपाल होय. आत्मा तर प्राणा हून वेगळा आहे. वेगळा कोणता ह्मणाल, तर अर्थात् सुखदुःखांचा अनुभव करणारें, अनुकूलप्रतिकूलविचार करणारें, जें मन तो च आत्मा होय.

विज्ञानात्मवादी—या प्रकारें मनात्मवाद्यानें मनास आत्मत्व सिद्ध करितां च मग क्षणिकविज्ञानात्मवादी योगाचार्य ह्मणतात, हे मनात्मवादिन्, विज्ञानमूलत्व मनास स्पष्ट असतांना, तूं मनास आत्मत्व कसें मानितोस? विज्ञानमूलत्व मनास कसें ह्मणाल तर सांगतों. अहंवृत्तिरूप आणि इदंवृत्तिरूप या प्रकारें दोन प्रकारचें अंतःकरण आहे. त्यांत अहंवृत्तिरूप अंतःकरणास विज्ञान ह्मणावें. इदंवृत्तिरूप अंतःकरणास मन ह्मणावें अहंवृत्तिमूलत्व इदंवृत्तीस स्पष्ट च आहे. कसें तें सांगतों. लोकांत आपणातें जाणिल्या वांचून बाह्यपदार्थातें कोणी जाणत नाहींत. या स्तव प्रथम अहंवृत्ति व पश्चात् इदंवृत्ति उत्पन्न होत्ये. ह्मणून विज्ञानमूलत्व मनास जाणावें. क्षणक्षणा तें विज्ञान उत्पन्न होतें. आणि नाशातें पावतें. या कारणा स्तव विज्ञान क्षणिक होय. आपल्या प्रकाशें करून आपण प्रकाशित होताहे. या कारणा स्तव स्वप्रकाशत्व ही आहे. आणि वेदांत विज्ञानमयकोशास जीवत्व ही सांगितलें आहे. या कारणा स्तव विज्ञान ह्मणजे बुद्धि

ती च आत्मा होय. मन कांहीं आत्मा नव्हे. आणि सुखदुःखांचें भोक्तृत्व व अनुकूलप्रतिकूलत्व जाणणें हें मनाचे ठायीं दिसताहे. या कारणा स्तव मन च आत्मा ह्मणून मनात्मवादी ह्मणतात. परंतु मनास भोक्तृत्वादिक असेल तर ही कल्पना करावी. मन तरी सुखदुःखांचा भोग होण्या विषयीं आणि विज्ञानमयास कर्तृत्व प्राप्त होण्या विषयीं कारण होय. हें सर्व लोकांत आणि शास्त्रांत ही प्रसिद्ध आहे. जशी अश्वरशना अश्वास फिरण्या विषयीं सारथ्यास साधन होय, त्या प्रकारें इंद्रियरूप अश्वांस विषयांचे ठायीं प्रवृत्त करण्या विषयीं विज्ञानमय मन जें तें साधन होय. तस्मात् विज्ञानमय कोश आत्मा. मन आत्मा नव्हे.

आणि त्या मनात्मवाद्यांनीं अजातशत्रु व बालाकि यांची कथा सांगून प्राणा हून आत्मा वेगळा हें दाखवून मन प्राणा हून वेगळें आहे, या कारणा स्तव आत्मा होय, असें सिद्ध केलें. परंतु हें ही अयोग्य. कसें तें सांगतों. जसें प्राणा हून मन भिन्न तसें प्राणा हून विज्ञान ही भिन्न आहे. अजातशत्रुराजानें मन च आत्मा असा कांहीं उपदेश केला नाहीं. प्राणा हून आत्मा भिन्न इतका च उपदेश केला. असें असतांना, प्राणा हून भिन्न, मनास मूलभूत, शास्त्रांत जीवत्वें करून प्रसिद्ध, जें विज्ञान त्यास टाकून मनास आत्मत्व मानणें हें अत्यंत मूर्खत्व जाणावें.

शून्यात्मवादी—या प्रकारें विज्ञानात्मवाद्यानें विज्ञानमयकोशास आत्मत्व सिद्ध करितां च मग शून्यवादी माध्यमिक व्यग्र होत्साते ह्मणतात. अहो, हें विज्ञान जें तें विद्युल्लते सारखें, अभ्रा प्रमाणें, निमिषोन्मेषां प्रमाणें, क्षणिक होत्सातें आत्मा कसें होईल? क्षणिक विज्ञान आत्मा होईल तर बाल्यावस्थेंत जो मी होतों तो च मी या वृद्धावस्थेंत आहें अशी जी प्रत्यभिज्ञा होताहे ती होऊं नये. लोकांत तो च मी अशी प्रत्यभिज्ञा तरी जन्मा पासून मरणकालपर्यंत आणि मागील व पुढील जन्मांची सुद्धा प्रत्यभिज्ञा दिसत असतांना क्षणिक विज्ञानमयास आत्मत्व कसें मानावें? आत्मा जो तो कोणता ह्मणाल तर विज्ञानमया हून भिन्न कोणी दिसेल त्यास आत्मा ह्मणावें. भिन्न कोणी दिसत नाहीं. या स्तव शून्य च आत्मा होय.

शास्त्रांत विज्ञानमयास जीवत्व सांगीतलें आहे. त्यांस टाकून शून्यास आत्मत्व कसें मानावें ह्मणाल तर सांगतों.

त्रिविधजीव—शास्त्रांत तीन प्रकारचे जीव सांगीतले आहेत. एक प्रातिभासिकजीव. एक व्यावहारिकजीव आणि एक पारमार्थिकजीव. असे तीन प्रकारचे जे जीव त्यांचें लक्षण ही सांगतों जावत्काल प्रतीति तावत्काल राहणारा स्वप्नकल्पित जीव प्रातिभासिक होय. जावत्काल व्यवहार तावत्काल राहणारा जाग्रदावस्थेंतला जीव व्यावहारिक. जाग्रदवस्थेंत विज्ञानमय असतो. या कारणा

स्तव विज्ञानमय व्यावहारिक जीव होय. या च अभिप्रायें करून शास्त्रांत विज्ञानमयास जीवत्व सांगितलें आहे. आता पारमार्थिक जीव कोणता ह्मणाल तर अर्थात् शून्यरूप च दिसतोहे. आणि शास्त्रांत आत्मा निर्विकार ऐकिला आहे. विज्ञानमयाचे ठायीं तरी कर्तृत्वादि विकार दिसतात. शून्याचे ठायीं शून्य च. या कारणा स्तव कांहीं एक विकार दिसत नाहीं. तें केवल निर्विकार. या कारणा स्तव शून्य च आत्मा होय.

शंका—अहो, शून्य जर आत्मा होईल तर त्या पासून ज्ञानज्ञेयात्मक जगत् कसें उत्पन्न होईल?

उत्तर—जसें शून्यगृहाचे ठायीं कांहीं एक नसतांना अकस्मात् पिशाचभ्रम होतो तसें शून्याचे ठायीं ज्ञानज्ञेयात्मक जगद्भ्रम होताहे. तस्मात् शून्य च आत्मा होय.

आणि दृप्तबालाकी प्रति अजातशत्रूनें क्षणिकविज्ञान च आत्मा असें कांहीं सांगितलें नाहीं. प्रथम प्राणास हाक मारून प्राण कांहीं जागृत होई ना. त्या काळीं प्राणास अनात्मत्व दाखविण्या विषयीं त्या निद्रित पुरुषाचा हात तो राजा पिळिता जाहला. त्याचा हात पिळितां च तो पुरुष जागा होऊन बसला. मग त्या बालाकीस राजानें विचारिलें. हे बालाके, हा पुरुष निद्रेंत कोठें होता? पुनः जाग्रतींत कोठून आला? हें सांग ह्मणतां च बालाकि ह्मणूं

लागला, हे राजन्, मला कांहीं समजत नाहीं. आपण सांगावें. असें ह्मणतां च राजा सांगता झाला. जेथें हा विज्ञानमय पुरुष लीन होऊन पुनः जाग्रत जाहला तो च आत्मा होय. हा प्राण कांहीं आत्मा नव्हे. अर्थात सुषुप्तींत क्षणिक विज्ञान दिसत नाहीं. शून्य मात्र दिसताहे. या कारणा स्तव शून्य च आत्मा. हा च राजाचा अभिप्राय दिसताहे.

आनंदमयात्मवादी—या प्रमाणें क्षणिकविज्ञानास अनात्मत्व सिद्ध करून शून्य च आत्मा असें शून्यवाद्यानें सिद्ध करितां च मग आनंदमयकोशास आत्मा मानणारे भट्टपाद मीमांसक ह्मणतात. सुषुप्तीच्या ठायीं कांहीं दिसत नाहीं. शून्य च दिसताहे. या कारणा स्तव शून्य आत्मा ह्मणणें हें ही अयोग्य. कसें तें सांगतों.

सुषुप्तीच्या ठायीं अन्य न दिसतां शून्य च दिसताहे, ह्मणून शून्यात्मवादी ह्मणतात. त्यास आपण पुसावें. हें काय शून्यास दिसताहे किंवा शून्या हून अन्य जो त्यास दिसताहे ? शून्यास दिसतें आहे ह्मणणें हें तरी अयोग्य. कसें तें सांगतों.

शून्य ह्मणजे असत्. तें मुळीं च नाहीं. त्यास काय दिसेल शून्या हून अन्यास दिसतें ह्मणाल तर शून्य जें तें असद्रूप. त्या हून अन्य तें सद्रूप. त्यास दिसत आहे ह्मणाल तर अर्थात् सद्रूप आत्मा जाहला. शून्य कांहीं आत्मा नव्हे. आणि

सुषुप्तींत कोणी एक सद्रूप असल्या वांचून सुषुप्तींत मी कांहीं एक जाणत नाहीं, सुखें करून निद्रेचा अनुभव करीत होतों, असें जाग्रतींत स्मरण तरी कसें होईल? सर्वलोकांस स्मरण तर होताहे. या कारणा स्तव सुषुप्तींत शून्याचा ही साक्षी सद्रूप आत्मा आहे. तो सुखरूप ही आहे. आणि चिज्जडरूप ही आहे. तो सुखरूप नसेल तर सुषुप्तींत सुखरूप होतों, असें न सांगतां, जाग्रतींत सांगताहे. या कारणा स्तव सुखरूप होय. जडस्वरूप जर नसता तर मी जड होतसाता कांहीं एक न जाणतां सुखरूप निद्रेचा अनुभव करित होतों ह्मणून जाग्रतींत न सांगता. जाग्रतींत सांगतो आहे. या कारणा स्तव तो चिज्जडस्वरूप जाणावा. तस्मात् सुषुप्तीच्या ठायीं शून्याचा ही साक्षी, सद्रूप, चिज्जडस्वरूप, आनंदरूप, आत्मा होय. अर्थात् देहात्मवादनिराकरणें करून अन्नमयकोश आत्मा नव्हे, हें सिद्ध जाहलें. मग राहिला जो आनंदमय कोश तो च आत्मा होय. शून्य कांहीं आत्मा नव्हे.

आणि अजातशत्रुराजाचा ही शून्य च आत्मा हा अभिप्राय नाहीं. कसा तो सांगतों. बालाकी प्रति राजानें विचारिलें. हे बालाके, हा जाग्रत जाहला जो तो विज्ञानमय निद्रेत लीन कोठें होता? पुनः जाग्रतींत कोठून आला? हें सांग. तस्मात् यांत राजाचा अभिप्राय काय ह्मणाल तर जो जाग्रत जाहलेला अहंकार, याचें जें उपादानकारण तो

आत्मा होय. प्राण आत्मा नव्हे. शून्य ही आत्मा नव्हे. कारण, जें असताहे तें भावरूप असताहे. शून्य तरी अभावरूप आहे. तस्मात् तें कारण कसें होईल?

चतुर्विधअभाव—तार्किक जे ते अभावास ही घटादिकार्योत्पत्ती विषयीं कारण मानितात. असें ह्मणाल तर त्यांनीं चार प्रकारचे अभाव मानिले आहेत. प्रागभाव, प्रध्वंसाभाव, अन्योन्याभाव, आणि अत्यंताभाव. यांत अत्यंताभावास कार्योत्पत्ती विषयीं कारणत्व संभवत नाहीं. कालत्रयीं न राहणारा जो घटात्यंताभाव तो घटोत्पत्तीस कारण कसा होईल? तसा अन्योन्याभाव ही कारण नाहीं. कां जर ह्मणाल तर सांगतों. घटाचा अभाव पटा वर, पटाचा अभाव घटा वर. असा जो परस्पराभाव तो अन्योन्याभाव होय. हा तरी घट, पट विद्यमान असतांना राहणार. तो घटपटादिकांच्या उत्पत्तीस कारण कसा होईल? या च प्रकारें प्रध्वंसाभाव ही कारण नाहीं. कसा तो सांगतों. घटाचा प्रध्वंस ह्मणजे नाश. तो तरी, घटनाशानंतर उत्पन्न होणार. मग तो घटाचे उत्पत्तीस कारण कसा होईल? तस्मात् तो प्रागभावास कारण मानितील हें ही अयोग्य. घटोत्पत्तीच्या पूर्वी जो अभाव तो प्रागभाव ह्मणावा. तो तरी अभावरूप असून भावरूपकार्याचे उत्पत्तीस कारण कसा होईल? अभावा पासून भावोत्पत्ति जर होत असती तर दधीच्या उत्पत्तीस दुग्धाचा,

घटाचे उत्पत्तीस मृत्तिकेचा, पटाच्या उत्पत्तीस तंतूचा लोकांत स्वीकार कां करिते? लोकां मध्यें दध्यादि कार्यांच्या उत्पत्ती विषयीं भावरूपदुग्धादिकांचा स्वीकार करीत आहेत. या कारणा स्तव जे भावरूप त्यांस च कारणत्व संभवताहे. अभावरूप जें शून्य त्यास कांहीं कारणत्व संभवत नाहीं. तस्मात् भावरूप आनंदमय च आत्मा. हा चिराजाचा अभिप्राय दिसतो.

प्रधानवादी—या प्रकारें भाट्टमीमांसकांनीं शून्यात्मवादखंडन करून आनंदमयकोशास आत्मत्व सिद्ध करितां च मग प्रधानवादी सांख्यविवेकी ह्मणतात. हे मीमांसक, आनंदमयकोश आत्मा कसा होईल? आत्मा जो तो निरवयव, निर्विकार, अदृश्य, अविनाशी, सद्रूप, चिद्रूप, आनंदस्वरूप, असा शास्त्रांत ऐकिला आहे. आनंदमय तर सावयव, सविकार, दृश्य, विनाशी, असद्रूप जडस्वरूप, आनंदविकार दिसतो. तो आत्मा कसा होईल?

आनंदमयकोश सावयव कसा तो सांगतों. जाग्रतीच्या अंतीं व निद्रेच्या आरंभीं या संधींत जो आनंद प्राप्त होतो, तो आनंदमय कोश जाणावा. तो आनंद कसा प्राप्त होतो, तो ही प्रकार सांगतों. जाग्रतींत भोगप्रद जें कर्म तें कर्म सरतां च शेवटीं त्या कर्मांतील एक पुण्यकर्म राहत आहे. त्या पुण्यकर्माचे योगानें सात्विक अंतःकरणाची वृत्ति उत्पन्न होताहे. ती वृत्ति अंतर्मुख

होतां च व त्या वृत्तीस आनंदाचें भान होतां च तेथें प्रीति उत्पन्न होताहे. या स्तव त्या वृत्तीस प्रियवृत्ति ह्मणावें. मग दुसरी वृत्ति उत्पन्न होतां च त्या वृत्तीस आनंदाचा लाभ होतो. त्या वृत्तीस मोदवृत्ति ह्मणावें. मग तिसरी वृत्ति उत्पन्न होतां च त्या वृत्तीस आनंदाचा भोग होतो. या स्तव त्या वृत्तीस प्रमोदवृत्ति ह्मणावी. आनंदमय कोशास वेदांत पक्षिरूपाची कल्पना केली आहे. प्रियवृत्ति हें आनंदमयाचें शिर होय, मोदवृत्ति दक्षिणपक्ष होय, प्रमोदवृत्ति उतरपक्ष होय. या तीन्ही वृत्तींत आनंदाचा प्रतिबिंब जो पडला तो आनंद, आनंदमयकोशाचें मध्यशरीर होय. बिंबभुत आनंदरूप ब्रह्म जें तें पुच्छ होय. या प्रकारें सावयवत्व सांगितलें आहे. या स्तव आनंदमय सावयव होय.

सविकार कसा तो सांगतों. पुण्यकर्मा चे योगानें प्रिय मोद व प्रमोद या वृत्ति उत्पन्न होतात. त्या वृत्ति अविद्येचे प्रकार होत. जसें, दधि हा दुग्धाचा विकार. या स्तव आनंदमय हा सविकार होय.

दृश्य कसा तो सांगतों. ज्या काळीं आपण शयन करून आनंदमय कोशांत प्रवेश करितों त्या काळीं बाहेर जे लोक बोलतात त्यांचें सामान्य ध्वनिरूपें करून भान असतां हि विशेषतः भान नाहीं. या स्तव पुरती जाग्रति ही नाहीं. पुरती सुषुप्ति ही नाहीं. त्या संधीस हा

आनंदाचा अनुभव घेत असतो. या स्तव तो आनंद दृश्य होय.

विनाशी कसा तो सांगतों. जावृत्काल तें पुण्यकर्म आहे, तावत्काल ती आनंदवृत्ति असते. हें पुण्यकर्म सरतां च मग ती वृत्ति निद्रारूपें करून अविद्येंत लीन होतां च मग गाढ निद्रा लागते. तेव्हां आनंदमय नष्ट होतो. या कारणा स्तव आनंदमय नाशवंत जाणावा.

या स्तव आनंदमय हा असद्रूप, जडस्वरूप व आनंदाचा विकार जाणावा. तस्मात् आनंदमय हा आत्मा नव्हे.

आणि भाट्ट ह्मणतात कीं, आत्मा चिज्जडस्वरूपी खद्योतवत् आहे. पण खद्योत ह्मणजे सोनकिडा तो सावयव आहे. या स्तव त्याच्या देहाच्या ठायीं अर्धा प्रकाश व अर्धा अप्रकाश संभवेल. आत्मा तर निरवयव. तेथें चिज्जड अशी उभयरूपता कशी प्राप्त होईल? उभयरूपता प्राप्त जाहल्यास सावयवत्व प्राप्त होऊन विनाशित्व प्राप्त होईल. आत्मा अनित्य हें कोणास ही सम्मत नाहीं.

राजाचा ही, आनंदमय हा च आत्मा असा कांहीं अभिप्राये नाहीं. कशा वरून ह्मणाल तर सांगतों. विज्ञानमय जेथें लीन होतो तेथून पुनः माघारा येतो. तो आत्मा ह्मणून राजानें बालकी प्रति सुचविलें. त्यांत जें सत् तें लयाचें अधिष्ठान होईल. असत् कांहीं अधिष्ठान होत नाहीं. आनंदमय जो तो असत्. या स्तव यास लयाधिष्ठानत्व

नाहीं. ह्मणून हा आनंदमय आत्मा नव्हे. हा चि राजाचा अभिप्राय.

सांख्य-आत्म्याचें स्वरूप—आनंदमय आत्मा जर नव्हे, तर आत्मा कोणता ह्मणाल तर सांगतों. सांख्य ह्मणतात, या आनंदमयातें आरंभ करून अन्नमया पर्यंत जे पंच कोश सांगितले, या पंचकोशांतें जाणणारा, ज्याचे योगानें हे पंच कोश जड असतां चेतना सारखे, असत् ह्मणजे रज्जुसर्पवत् मिथ्या असतांना सत्या सारखे, दुःखरूप असतांना प्रियसुखरूपा सारखे, अनात्मे असतांना आत्म्या सारखे, दिसतात तो आत्मा होय.

असा तो आत्मा कोणता ह्मणाल तर स्पष्ट दाखवितों. या आनंदमयकोशाच्या अवयवभूत ज्या प्रिय, मोद, प्रमोद, अशा वृत्ति आहेत, त्या वृत्तींत ज्या आनंदाचा प्रतिबिम्ब पडला, असा बिम्बभूत जो आनंद तो आत्मा होय. तो सद्रूप, चिद्रूप नसता तर या पंचकोशांतें जाणता कसा? आत्मा पंचकोशातें जाणतो. या कारणा स्तव आत्मा सद्रूप, चिद्रूप होय. आनंदमयचा च प्रतिबिम्ब या कारणा स्तव आनंदरूप होय. तस्मात् सत्यस्वरूप, चैतन्यस्वरूप आत्मा होय. आनंदमय कांहीं आत्मा नव्हे.

आणि पारमार्थिक जीवत्व, बिम्बभूत आनंदरूप जो आत्मा यास च संभवत आहे. शून्यास अथवा आनंदमयास संभवत नाहीं. कसें तें सांगतों. कालत्रयीं ज्याचा बाध

होत नाहीं, तो पारमार्थिक सत्य जाणावा. शून्य तरी कालत्रयीं नाहीं. त्यास जीवत्व कोठून प्राप्त होणार ?' आनंदमय ही क्षणिक आहे. या कारणा स्तव त्रिकालाबाध्यत्वरूप पारमार्थिकत्व कसें प्राप्त होईल ? हा बिम्बभूत आत्मा जो तो कालत्रयाचे ठायीं विद्यमान आहे. या कारणा स्तव हा पारमार्थिक जीव होय.

आत्म्याची कालत्रयीं विद्यमानता—कालत्रयीं विद्यमान कसा हें सांगतों. जाग्रदवस्थेंत आपल्या अंतःकरणाच्या ठायीं ज्या ज्या वृत्ति कामाकार, क्रोधाकार, घटाकार, पटाकार, अशा नाना प्रकारच्या उत्पन्न होतात, त्या त्या वृत्तींच्या उत्पत्तीस, स्थितीस व नाशास जाणत होत्सता साक्षिस्वरूपें करून राहताहे. स्वप्नावस्थेंत संपूर्ण इंद्रियांचा लय होताहे. या कारणा स्तव इंद्रियांचा प्रकाश नसतो. आणि चंद्र, सूर्य, अग्नि, नक्षत्रादिकांचा ही प्रकाश नसतो. मनाचा प्रकाश म्ह-णावा तर मन च स्वप्नांत प्रपंचाकारें झालें आहे या स्तव तें दृश्य होय. त्यास द्रष्टृत्व कसें प्राप्त होईल ? तस्मात् हा सच्चिदानंदस्वरूप बिम्बभूत आत्मा च आपल्या प्रकाशें करून प्रकाशित होऊन प्रपंचातें भासवित होत्साता राहतो. सुषुप्तींत मनादिकांचा लय असतां ही सुषुप्तीतें हा च भासवितो. या प्रकारें तीन्ही अवस्थेंत याची विद्यमानता आहे. या स्तव हा च पारमार्थिक आत्मा होय. या हून भिन्न जे अन्नमयादिक ते अवघे अनात्मे जाणावे.

शंका—अहो, हे अन्नमयादिक अनात्मे जर आहेत तर लोकांचे ठायीं आत्मत्वबुद्धि कां होत्ये.

समाधान—आत्मा कोण, अनात्मा कोण हा विवेक न करीत होत्साता अनात्म्याचे ठायीं आत्मत्वबुद्धि करताहे. उक्तप्रकारें करून विवेक केल्यास अन्नमयास आरंभ करून आनंदमया पर्यंत अनात्मे भासून बिम्बभूत जो आनंद, सच्चिदानंदस्वरूप, अवस्थात्रयाचा साक्षी, निरवयव, निर्विकार हा च आत्मा असा निश्चय होतो.

शंका—अहो, सत्-चित्-आनंद हे आत्मस्वरूपभूत आहेत. आत्म्याचे अवयव नव्हत. आत्म्यास सच्चिदानंदस्वरूप ह्मणाल तर सत्-चित्-आनंद हे आत्म्याचे अवयव जाहले. मग निरवयव आत्मा कसा?

समाधान—जसी उष्णता आणि प्रकाश हीं दोन्ही अग्नीचीं स्वरूपें असून परस्परें भिन्न नाहींत, तसें सत्, चित्, आनंद हे आत्मस्वरूप असून हीं परस्परें भिन्न नाहींत. जर आनंद आणि चित् हे दोन्हीं सता हून भिन्न होतील, तर असत् होतील. मग आनंद व चैतन्य हे वंध्यापुत्रवत् अस्द्रूप जाहले असतां, जगतांत कोणा एकाला ही सुख प्राप्त होणार नाहीं. याचें कारण, जगतांत जे आनंद प्राप्त होतात ह्मणजे विषयाचे योगानें विषयानंद, समाधीच्या योगानें योगानंद, तूष्णीम्भूतावस्थेंत जो आनंद, आणि निद्रेच्या अंतीं व जागृतीच्या आरंभीं जो वासनानंद, हे

संपूर्ण आत्मानंदा पासून आहेत. आत्मनंद च नसल्यास हे अंशभूत आनंद कोठून प्राप्त होतील ?

आत्मानंदा पासून संपूर्ण आनंद कसे प्राप्त होतात तो ही प्रकार सांगतों. पूर्वीं विषयाचे इच्छेनें अंतःकरण व्यग्र होताहे. मग प्रारब्धानें विषय प्राप्त होतां च त्या कालीं क्षणमात्र अंतःकरण वृत्तिरहित होऊन स्थिर होतां च त्या अंतःकरणांत स्वरूपभूत जो आत्मानंद हा प्रतिबिम्बित होतो. त्या कालीं अंतःकरण आनंदरूप राहताहे. पुनः प्रारब्धकर्मानें दुसऱ्या पदार्थाची इच्छा होतां च व पुनः अंतःकरण व्यग्र होतां च तो प्रतिबिम्ब नष्ट होतो. मग अंतःकरण व्याकुल असतें. असें च चित्तवृत्तिनिरोधरूपयोगें करून अंतःकरण वृत्तिराहित होऊन समाधि प्राप्त होतां च त्र त्या कालीं अंतःकरणांत आत्मानंद प्रतिबिम्बित होतां च आनंद प्राप्त होतो. असा च वासनानंद. सुषुप्तींत ब्रह्मानंदाचा अनुभव होत असतो. त्याचा संस्कार क्षणमात्र असतो. या मुळें तो ही त्या आत्मानंदाचा च अंश जाणावा. या प्रकारें जगतांत जितके आनंद प्राप्त होतात ते अवघे या आत्मानंदाचे च अंश होत. तो च असत् जाहल्यास जगतास आनंद कसा होईल ? तस्मात् आनंद, सता हून भिन्न नाहीं, सद्रूप च आहे. तसें च चित् ही सता हून भिन्न जाहल्यास चैतन्य ह्मणजे ज्ञान च असत् जाहलें. ज्ञान असत् जाहल्यास कांहीं एका ही पदार्थाचें भान होणार

नाहीं. मग जगदान्ध्यप्रसंग च प्राप्त होईल. तस्मात् चैतन्य ह्मणजे ज्ञान हीं सत्ता हून भिन्न नाहीं. सद्रूप च आहे.

शंका—अहो, घटज्ञान मला जाहलें. पटज्ञान नष्ट जाहलें. या प्रकारें लोकांत ज्ञानास ही उत्पत्ति, नाश, दिसताहे. मग ज्ञान सद्रूप ह्मणजे नित्य कसें होईल?

उत्तर—ज्ञानाचे दोन प्रकार आहेत. एक सविशेषज्ञान व एक निर्विशेष ज्ञान. घटाकारपटाकारवृत्तिप्रतिबिम्बित ज्ञान तें सविशेष. व वृत्त्यादिकांच्या उत्पत्तिस्थितिनाशास साक्षिभूत जें ज्ञान तें निर्विशेषज्ञान होय. हें निर्विशेषज्ञान च आत्म्याचें स्वरूप जाणावें. वृत्तिरूप सविशेषज्ञान अनित्य होय. कसें तें सांगतों. वृत्ति उत्पन्न जाहली असतां व नष्ट जाहली असतां वृत्त्यवच्छिन्न ज्ञान हीं उत्पन्न जाहल्याचे परी व नष्ट जाहल्याचे परी दिसताहे. या स्तव तें वृत्तिरूपज्ञान अनित्य होय. वृत्ति जड असतांना तेथें ज्ञानत्वव्यवहार कसा ह्मणाल, तर वृत्तीच्या ठायीं चैतन्याचा प्रतिबिम्ब पडतां च वृत्ति चिदाकार भासते. या स्तव वृत्तीस ज्ञान ह्मणावें. तस्मात् वृत्तीस ज्ञान ह्मणणें हा उपचार होय. वृत्ति कांहीं मुख्य साधन नव्हे. मुख्य ज्ञान तरी आत्मस्वरूपभूत जें निर्विशेषज्ञान पूर्वीं सांगितलें तें च होय. अन्यत्र त्याच्या प्रतिबिम्बाच्या योगानें चेतनादि व्यवहार जाणावा. तें आत्मस्वरूपभूतज्ञान च अंतःक-

रणावच्छिन्न होऊन प्रमातृवृत्त्यवच्छिन्न, प्रमाणविषयावच्छिन्न होऊन, या अंतःकरणादि उपाधींच्या योगानें प्रमातृ, प्रमाण, प्रमेय, या नामांतें प्राप्त होताहे. अस्तु. जें कांहीं आत्मस्वरूपभूत निर्विशेषज्ञान तें नित्य होय. ह्मणून सद्रूप जाणावें.

असेंच सत् जर चिता हून व आनंदा हून भिन्न होईल, तर तें घटादिकांचे परी जड होईल. घटादिकांचे परी दुःखरूप जाहलें असतां, घटादिकांचे परी सतास ही अनित्यत्व प्राप्त होऊन सद्रूप आत्मा च अनित्य होईल. आत्मा अनित्य जाहल्यास अवस्थात्रयाचें भान कोणास होईल? मग सर्व व्यवहार च बुडेल. तस्मात् सत् हें चैतन्या हून व आनंदा हून भिन्न नाहीं. हीं तीन्ही परस्पर भिन्न नाहींत. आत्म्याचीं च तीनी मिळून स्वरूपें होत.

शंका—अहो, हीं तीनी मिळून एक आत्म्याचें च स्वरूप ह्मणाल तर मग सत, चित्, आनंद या तीन्ही शब्दांचा वेगळा प्रयोग कशाला? अर्थ भिन्न असल्या वांचून शब्दांचा भिन्न प्रयोग शास्त्रांत व लोकांत ही होत नाहीं.

उत्तर—यद्यपि या सतादि शब्दांचा लक्ष्यार्थभूत आत्मा एक च आहे, तथापि यांचे वाच्यार्थ आणि व्यावृत्त्यर्थ ह्मणजे निवृत्त करण्याचे अर्थ भिन्न भिन्न आहेत. या अभिप्रायें करून सत्, चित् व आनंद या शब्दांचा भिन्न प्रयोग जाणावा.

सतादि शब्दांचें त्रैविध्य, वाच्यार्थ व व्यावृत्त्यर्थ—सतादिशब्दांचे भिन्न भिन्न वाच्यार्थ ते कसे तें सांगतों. व्यावृ-

हारिक, प्रातिभासिक. व पारमार्थिक, या भेदें करून सत्, चित्, आनंद हे तीन ही तीन प्रकारचे आहेत. आकाशादिभूतें व्यवहारकालीं सत्य भासतात. या स्तव आकाशादिकांच्या ठायीं जें सत्यत्व तें व्यावहारिक होय रज्जुसर्पादिक प्रतीतिकालीं सत्य भासतात. या स्तव त्यांचे ठायीं जें सत्यत्व तें प्रातिभासिक होय. आत्मा जो तो अवस्थात्रयाचे ठायीं साक्षिस्वरूपें करून असतो. या स्तव आत्मरूपाचे ठायीं जें सत्यत्व तें पारमार्थिक होय. या प्रकारें घटादिविषयवृत्तिरूप ज्ञान हें व्यावहारिक, रज्जुसर्पादिविषयक अविद्यावृत्तिरूप ज्ञान हें प्रातिभासिक आणि आत्मस्वरूपभूत ज्ञान तें पारमार्थिक. या च प्रकारें जागृतींतला जो आनंद तो व्यावहारिक, स्वप्नांतला जो विषयानंद तो प्रातिभासिक आणि आत्मस्वरूपभूत जो आनंद तो पारमार्थिक. या प्रकारें व्यावहारिक व प्रातिभासिक, असे सत्, चित् व आनंद जे आहेत ते सत्, चित् व आनंद या शब्दांचे वाच्यार्थ होत. पारमार्थिक सच्चिदानंदस्वरूप आत्मा लक्ष्यार्थ होय. या वाच्यार्थभेदानें सच्चिदानंदशब्दांचा भेद जाणावा.

तसें च आत्मा सत् ह्मणतां च असत् नव्हे हें सुचवून सच्छब्दानें असताची निवृत्ति, आत्मा ज्ञानस्वरूप ह्मणतां च जडस्वरूप नव्हे हें सुचवून ज्ञानशब्दानें जडनिवृत्ति आणि आत्मा आनंदस्वरूप ह्मणतां च दुःखरूप नव्हे हें सुचवून

आनंदशब्दानें दुःखनिवृत्ति; या प्रकारें असत्, जड व दुःख या तिहीं हून आत्मा विलक्षण आहे. हें सुचविण्या विषयीं सत्, चित् आनंद ह्या तीन शब्दांचा वेगळा प्रयोग केला. तस्मात् सत्, चित्, आनंद हे तीन परस्परें अभिन्न होत्साते आत्म्याचें स्वरूप होत. या स्तव आत्मा निरवयव होय.

आत्मप्रतिबिम्ब- जीव.

शंका—आत्मा निरवयव जर आहे तर अंतःकरणादिकांत प्रतिबिम्बित कसा होईल? लोकांत तरी सावयव सूर्यादिकांचा जलादिकांचे ठायीं प्रतिबिम्ब पाहिला आहे. निरवयवाचा कोठें ही प्रतिबिम्ब पाहिला नाहीं.

समाधान—हा आकाश जो. तो निरवयव असतां ही जलांत प्रतिबिम्बित होतो. कसा तो सांगतों. गुडघ्या इतक्या जलांत पाहिल्यास बहुत खोल लांब वर पोकळ दिसतो. हा च जलांत आकाशाचा प्रतिबिम्ब होय. तस्मात् निरवयवाचा ही प्रतिबिम्ब पडतो. मग आत्म्याचा अंतःकरणांत प्रतिबिम्ब कां पडणार नाहीं?

शंका—अहो, आत्म्याचा प्रतिबिम्ब पडतो तर सर्वत्र आत्मस्वरूपभूत सत्, चित्, आनंद, या तिघांचा ही प्रतिबिंब पडावा. सात्विकवृत्तींत मात्र सत्, चित्, आनंद यांचा प्रतिबिंब पडतो. या स्तव ती सात्विकवृत्ति मात्र सद्रूप, चिद्रूप, आनंदरूप दिसत्ये. जी कांहीं राजसी तामसी वृत्ति ती

सद्रूप चिद्रूप भासत्ये. आनंदरूप कांहीं भासत नाहीं, हें कसें?-

उत्तर—जसी उष्णता व प्रकाश हीं दोन्ही अग्नीचीं स्वरूपें असून जलांत उष्णतेचा मात्र प्रवेश होऊन जल उष्ण दिसताहे. प्रकाशाचा प्रवेश होत नाहीं. या स्तव जल प्रकाशरूप दिसत नाहीं. तसें च राजस तामस वृत्ति मलिन असत्य, या स्तव सत् चित्, मात्र प्रतिबिंबित होताहे. आनंद प्रतिबिंबित होत नाहीं. जसें काष्ठांत उष्णता व प्रकाश या दोघांचा ही समावेश होतो. तसें सात्विकवृत्तींत सत्, चित् व आनंद या तिघांचा ही प्रवेश होतो. कारण सात्विकवृत्ति स्वच्छ आहे. तस्मात् आत्मा निरवयव असल्यास कांहीं एक दोष प्राप्त होत नाहीं.

शंका—आत्मा निर्विकार आहे. अहो बिम्बभूत आत्मा जीव जाहल्यास मग आत्मा विकारी जाहला. निर्विकार कसा ह्मणाल?

उत्तर—जसें लोहचुंबकाच्या सान्निध्यें करून लोह चलायमान होताहे. तसें आत्म्याचे सान्निध्यें करून संपूर्ण इंद्रियादिक आपल्या आपल्या व्यवहाराच्या ठायीं प्रवृत्त जाहले असतां आत्म्यानें च प्रवृत्त करविले असा भास होऊन जीवत्वाचा आरोप होतो. आत्मा स्वतः निर्विकार च आहे.

शंका—अहो, आत्मा स्वतः जर निर्विकार च आहे, तर

जन्ममरण, कृशत्व, स्थूलत्व, काणत्व, बधिरत्व, मूकत्व, क्षुधा, तृषा, निद्रा, इच्छा, काम, क्रोध कर्तृत्व, भोक्तृत्वादि नानाप्रकारचे विकार आत्म्याचे ठायीं कां भासतात?

उत्तर—अन्नमयादि जे अनात्मे आणि सच्चिदानंदस्वरूप जो आत्मा, या दोघांचा अविवेकें करून जो परस्पराध्यास त्या अध्यासा मुळें जन्ममरणादि अनात्म्याचे धर्म आत्म्याचे ठायीं, व सत्, चित् आनंदादि आत्म्याचे धर्म अनात्म्याचे ठायीं, असे परस्पर धर्म अरोपित होऊन आत्मा जो तो जन्ममरणादिविकारवान् भासतो. अन्नमयादि अनात्में जे ते सत्, चित्, आनंद, एतद्रूप भासतात.

अध्यासाचें स्वरूप—अहो, अध्यास ह्मणजे काय ह्मणाल तर सांगतों. अन्याचे ठायीं अन्याची बुद्धि होणें, हें अध्यासाचें स्वरूप होय. जसी शुक्तीच्या ठायीं रजतबुद्धि, रज्जूचे ठायीं सर्पबुद्धि, स्थाणूचे ठायीं पुरुषबुद्धि, आकाशाचे ठायीं नीलिमेची बुद्धि, अनात्म्याचे ठायीं आत्मबुद्धि, असी परस्पर, बुद्धि होणें याचें नांव अध्यास.

शंका—अहो, शुक्तीसीं, रजतासीं, परस्पर चाकचक्यरूप सादृश्य आहे. रज्जुसर्पासीं, परस्पर दीर्घत्वरूप सादृश्य आहे. स्थाणुपुरुषांचे ठायीं, उच्चत्वरूप सादृश्य आहे. आणि दूरत्व, मंदत्व, अंधकारादिरूप दोष आहेत. आणि शुक्तिरजतादिक इंद्रियांस गोचर ही आहेत. आ-

त्म्यास व अनात्म्यास सादृश्य नाहीं. आणि आत्म्याचा व अनात्म्याचा अध्यास होण्या विषयीं कांहीं एक दोष ही दिसत नाहीं. तसें च शुक्तिरजतादिकां प्रमाणें आत्मा इंद्रियांस गोचर ही नाहीं. मग आत्म्याचा व अनात्म्याचा परस्पराध्यास कसा होईल ?

उत्तर—सादृश्य असल्यास इंद्रियगोचर जो असेल त्याचे ठायीं अध्यास होतो. सादृश्य नसल्यास व इंद्रियगोचर नसल्यास अध्यास होत नाहीं, असा कांहीं नियम नाहीं. कसें तें सांगतों. आकाशासीं व नीलिमेसीं सादृश्य नसतां ही आणि आकाश इंद्रियांस गोचर नसतां ही आकाशाचे ठायीं नीलिमेचा अध्यास नील आकाश ह्मणून बालक करिताहेत, तसें आत्म्यासीं व अनात्म्यासीं सादृश्य नसतां ही आणि आत्मा इंद्रियांस गोचर नसतां ही परस्पराध्यास होईल.

शंका—शुक्तिरजतादिकांचे ठायीं दूरत्वादि दोष दिसतात. एथें कांहीं दोष दिसत नाहींत. मग आत्म्याचा व अनात्म्याचा अध्यास कसा ?

उत्तर—येथें ही अविद्यारूपी दोष आहे.

शंका—अहो, अध्यास होण्याविषयीं अधिष्ठानाचें सामान्यतः भान व विशेषतः अभान पाहिजे. जसें शुक्तीचें चाकचक्यें करून सामान्यतः भान व नीलपृष्ठत्रिकोणत्वें करून विशेषतः अभान आहे. या स्तव त्या शुक्तीचे ठायीं रजताचा अध्यास होतो. तसें इकडे सामान्यतः भान व विशे-

षतः अभान कसें ?

उत्तर—आत्मा ही अहंप्रत्ययाच्या विषयत्वें करून सर्वांस भासत असतां ही आनंदरूपें करून भासत नाहीं. अहंवृत्तीच्या विषयत्वें करून जें आत्म्याचें भान हें सामान्यतः भान होय. व आनंदरूपें करून जें अभान तें विशेषतः अभान होय. या प्रकारें आत्म्याचें ही सामान्यतः भान असतां विशेषतः भान नाहीं. या स्तव येथें ही अध्यासाचें लक्षण संभवत असतां मग अध्यास कां होणार नाहीं ?

शंका—अहो, अन्यत्र पाहिला जो सर्प त्याच्या संस्कारानें अन्यत्र रज्जूच्या ठायीं सर्पभ्रम होतो. तसें इकडे ही अनात्म्याचे ठायीं आत्म्याचा अध्यास होण्या विषयीं आत्मा अन्यत्र पाहिला पाहिजे. व आत्म्याचे ठायीं अनात्म्याचा अध्यास होण्या विषयीं, अनात्मा ही अन्यत्र पाहिला पाहिजे. तेव्हां अध्यास होईल. हें कसें ?

उत्तर—हा भ्रम जो तो अनादि आहे. तस्मात् पूर्वपूर्वाध्यासजन्यसंस्कार जो तो उत्तरोत्तराध्यासास कारण होय. तस्मात् आत्म्याचा अनात्म्याचे ठायीं अध्यास होण्या विषयीं पूर्वाध्यासजन्यसंस्कार, अविद्यारूप दोष, आणि अधिष्ठानाचें सामान्यतः ज्ञान असतां विशेषतः अज्ञान, अशी सर्व सामग्री असतांना मग अध्यास कां होणार नाहीं ?

शंका—अहो, तुह्मीं आत्म्याचे ठायीं अनात्म्याचा अध्यास, व अनात्म्याचे ठायीं आत्म्याचा अध्यास अस

परस्पराध्यासस्वीकार केल्यास जसें शुक्तीचे ठायीं रजतास मिथ्यात्व पाहिलें त्या प्रकारें परस्पराध्यस्त आत्म्यास व अनात्म्यास ही मिथ्यात्व प्राप्त होईल. दोघांस ही मिथ्यात्व प्राप्त जाहल्यास शून्यवाद च प्राप्त होईल.

उत्तर—आत्म्याचा स्वरूपाध्यास आणि अनात्म्याचे ठायीं आत्म्याचा संसर्गाध्यास असा परस्पराध्यासस्वीकार केला असतां, मग शून्यावाद कांहीं प्राप्त होत नाहीं. कसें तें सांगतों—आत्म्याचे ठायीं अनात्म्याचें स्वरूप अध्यस्त ह्मटल्यास आत्म्याचे ठायीं अनात्मस्वरूपास मिथ्यात्व आल्यास इष्टापत्ति च आहे. कां ह्मणाल तर सांगतों. आत्मा असंग या स्तव आत्म्याचे ठायीं वास्तविक अनात्म्याचें स्वरूप नाहीं ह्मणून. तसें च अनात्म्याचे ठायीं आत्म्याचा संसर्ग ह्मणजे संबंध अध्यस्त आहे. जसें स्फटिकाचे ठायीं जपाकुसुमाचा संबंध अध्यस्त. तस्मात् अनात्म्याचे ठायीं आत्मसंबंधास मिथ्यात्व आल्यास इष्ट च आहे. आत्मस्वरूप कांहीं मिथ्या होत नाहीं. या स्तव परस्पराध्यासस्वीकार केला तरी शून्यवाद प्राप्त होत नाहीं.

शंका—अहो, अविद्येच्या योगानें परस्पराध्यास होतों ह्मणतां. परंतु आत्मा जो तो ज्ञानस्वरूप आणि अविद्या जी ती, अज्ञानस्वरूप होय. ज्ञानाचा व अज्ञानाचा अंधकारप्रकाशवत् विरोध असतांना ज्ञानस्वरूप आत्म्याचे ठायीं अज्ञानस्वरूप अविद्या कशी राहील? व अविद्या न राहिल्या-

स मग तन्मूलक अध्यास जो तो कसा प्राप्त होईल?

उत्तर—जसा कांहीं मुख्यसूर्याचा व तृणाचा विरोध नाहीं, सूर्य प्रकाशरूप व तृण अप्रकाशरूप; पण तो च सूर्य उपनेत्रांत प्रतिबिंबित जाहला असतां त्या पासून अग्नि उत्पन्न होऊन मग तें तृण भस्म होताहे. तसें आत्मरूपभूत ज्ञान आणि अविद्या या दोघांचा परस्परें विरोध नाहीं. विरोध असल्यास अविद्येस कोण प्रकाश करील? पण तो च आत्मा विवेकरूपवृत्तींत प्रतिबिंबित होतां च त्या वृत्तिरूपज्ञानें करून मग अविद्या नष्ट होताहे. तस्मात् आत्मस्वरूपभूतज्ञानाचा व अविद्येचा विरोध नाहीं. वृत्तिरूपज्ञानाचा व अविद्येचा मात्र विरोध जाणावा.

शंका—अहो, सुषुप्तींत आत्म्याचे ठायीं कांहीं एक विकार नसतांना जागृतींत व स्वप्नांत नाना प्रकारचे जे विकार भासतात ते अविद्येनें आत्म्याचा व अनात्म्याचा परस्पर अध्यास होऊन अनात्म्याचे धर्म आत्म्याचे ठायीं भासतात ह्मणतां. परंतु अन्नमयादिअनात्म्यांत कोणते धर्म कोणाचे हें स्पष्ट सांगावें.

उत्तर—जन्म, मरण, कृशत्व, स्थूलत्व, बाल्य, तारुण्य, वृद्धत्व, जाति, कुल, गोत्र, नाम, वर्ण, आश्रम, हे अवघे स्थूलदेहाचे धर्म होत. काणत्व, बधिरत्व, मूकत्वादिक हे अवघे इंद्रियांचे धर्म होत, क्षुधा, तृषा, चलन, वलन, हे अवघे प्राणाचे धर्म होत. संकल्प, विकल्प, सुख, दुःख, इच्छा, द्वेषा.

दिक हे अवघे मनाचे धर्म होत. ज्ञातृत्व, कर्तृत्व, जागृतत्व, स्वप्न, सुषुप्त्यादिक हे अवघे बुद्धीचे धर्म होत. भोक्तृत्वादिक आनंदमयाचे धर्म होत. जडमूढता हे अवघे अविद्येचे धर्म होत. एतावता हे अवघे अनात्म्याचे धर्म आत्म्याचे ठायीं अध्यासा मुळें भासतात. जसें तप्त लोखंडाचे गोळ्याचे ठायीं अग्नीचें व गोळ्याचें परस्परें तादात्म्य ह्मणजे अभेद किंवा एकीभाव होऊन दाहकत्वादिक अग्नीचे धर्म, गोळ्याचे ठायीं, व गोलत्वादि गोलाचे धर्म अग्निचे ठायीं, भासतात, तसे अध्यासा मुळें परस्पर धर्म भासतात. आत्मा स्वतः निर्विकार आहे.

जाग्रदादि तीन अवस्था हे बुद्धीचे धर्म होत—शंका—अहो, जाग्रदादि अवस्थात्रय बुद्धीचे धर्म कसे ?

उत्तर—ज्या काळीं बुद्धि सुषुप्तींत लीन असत्ये त्या काळीं भोगप्रदप्रारब्धकर्मांतील कोणी एक कर्म स्वप्नावस्थेंत व जाग्रदवस्थेंत पुढें होत आहे. त्या कर्माच्या योगानें मग ती बुद्धि, चित्प्रतिबिम्बसहित होत्साती हृदयांतून नाडीद्वारा कंठप्रदेशीं येते. त्या काळीं स्वप्नावस्था प्राप्त होत्ये. मग ती च बुद्धि अंगुष्ठा पासून मस्तका पर्यंत स्थूलदेहास ज्या काळीं व्यापून राहत्ये त्या काळीं त्या अहंकाराच्या योगानें देह जो तो जड असतां ही चेतनरूप होत्साता गमनादिव्यवहार करतोहे. जावत्काल तें प्रारब्धकर्म जाग्रतींत भोग देणार आहे तावत्काल चिदाभासयुक्त अहंकार

देहास व्यापून असतो. चिदाभासयुक्त अहंकार देहास व्यापून असतो, तों पर्यंत जाग्रदवस्था जाणावी. मग तें जाग्रद्भोगप्रद कर्म सरतां च पुनः तो च अहंकार, देहास सोडितो. मग देह जो तो घटा सारखा जड होऊन पडतो. तो अहंकार हृदयांत जाऊन आपल्या कारणांत लीन होतो, त्या काळीं निद्रा लागते. ही सुषुप्ति अवस्था जाणावी. या प्रकारें अहंकाराची लयावस्था ती सुषुप्ति, अहंकाराचा अर्धा विकाश तें स्वप्न, अहंकाराचा सर्व विकाश ही जागृति. तस्मात् जाग्रत्, स्वप्न, सुषुप्ति अवस्था हे अहंकाराचे धर्म होत. अहंकार व बुद्धि एक च जाणावी. तस्मात् आत्मा निर्विकार जाणावा.

शंका—अहो, आत्मा जर केवल चेतनस्वरूपी आहे तर सुषुप्तींत मनादिक सर्वांचा लय जाहला असतां ही जडाचा अनुभव ह्मणजे मी जड होतसाता निद्रिस्त होतों हा कसा?

उत्तर—ती सुषुप्तींत अनुभूयमान जडता प्रकृतीचें स्वरूप होय. आत्म्याचें कांहीं स्वरूप नव्हे. तस्मात् सद्रूप, चिद्रूप, आनंदरूप, निरवयव, निर्विकार, अवस्थात्रयसाक्षी, आत्मा जो तो सिद्ध जाहला.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय

# आत्म्याच्या परिमाणा विषयीं वादींचीं मतें.

अणुपरिमाणवादी—पुनः वादी जे ते आत्म्याच्या परिमाणा विषयीं विवाद करितात. त्यांत अणुपरिमाणवादी ह्मणतात. आत्मा जो तो परमाणू एवढा आहे. परमाणु ह्मणजे घरांत गवाक्षद्वारा जो प्रकाश पडतो त्या प्रकाशांत बारिक बारिक जे रजःकण फिरतात त्यांतील एका रजःकणाचा जो साहवा भाग तो परमाणु होय. परमाणू एवढा आत्मा कां मानावा, ह्मणाल तर त्यास युक्ति ही ते सांगतात. बालाचे (केशाचे) अग्राचे शंभर भाग चिरावे. तो शंभरावा भाग जितका सूक्ष्म तितक्या सूक्ष्म नाडी आहेत. त्यांत ही आत्म्याचा प्रवेश आहे. आणि श्रुति ही अणुपरिमाणविशिष्ट च आत्मा आहे असें सांगत्ये. या स्तव अणुपरिमाणविशिष्ट च आत्मा.

मध्यमपरिमाणवादी—या प्रकारें अणुपरिमाणवादी ह्मणतां च मग मध्यमपरिमाणवादी दिगंबर ह्मणतात. परमाणू एवढा आत्मा मानिल्यास तो देहाच्या कोणी एका प्रदेशांत राहील. सर्व देहास कांहीं व्यापून राहणार नाहीं. तेव्हां अंगुष्ठप्रदेशीं आत्मा असल्यास तेथें च सुखदुःखाचें भान होईल दुसऱ्या स्थानीं चिमटा घेतल्यास सुखदुःखाचें भान होणार नाहीं. आणि गंगेत स्नान केल्यास जेथें

आत्मा आहे त्या स्थानीं मात्र शीतलतेचें भान होईल. एका कालीं च शीतलतेचें भान होणार नाहीं. स्नान करितां च एका कालीं सर्वांग शीतल जाहल्याचें भान होताहे. तस्मात् अणुपरिमाणविशिष्ट कांहीं आत्मा नाहीं. मध्यमपरिमाणविशिष्ट ह्मणजे जेवढा देह तेवढा आत्मा आहे.

यां प्रकारें मध्यमपरिमाणविशिष्ट आत्मा मानिल्यास श्रुतीस ही विरोध येत नाहीं. श्रुतींत अणुपरिमाणविशिष्टत्व आत्म्यास जें सांगितलें आहे तें उपाधिभूत सूक्ष्म नाड्यांच्या आंत ही आत्म्याचा प्रवेश आहे. या कारणा स्तव अणुपरिमाणविशिष्ट जाणावा. जसें घटमठादिउपाधीं मुळें आकाश जो तो घटा एवढा, मठा एवढा दिसतो. स्वरूपतः कांहीं आकाश घटा एवढा, व मठा एवढा नाहीं. तसा आत्मा ही, अणुपरिमाणविशिष्ट कांहीं नाहीं. मध्यमपरिमाणविशिष्ट आत्मा होय.

सांख्य वादी—या प्रकारें मध्यमपरिमाणविशिष्टत्व आत्म्यास सिद्ध करितां च मग सांख्यादि ह्मणतात. अहो, मध्यमपरिमाण ह्मणजे जेवढा देह तेवढा आत्मा जाहला. मग हा मनुष्यदेह साडे तीन हात. तेव्हां आत्मा ही साडे तीन हात जाहला. प्रारब्धानें हा देह पडल्या नंतर मुंगीचा देह अथवा हत्तीचा देह प्राप्त जाहला असतां मग मुंगीच्या देहांत साडे तीन हात आत्मा कसा मावेल? आणि हत्तीच्या अर्ध्या देहांत, आत्मा पुरेल, बाकी अर्धा देह आ-

त्म्या वांचून राहिल्यास अध्यां देहांत सुखदुःखाचें भान होणार नाहीं, हा दोष प्राप्त होतो. या स्तव आत्मा मध्यम-परिमाणविशिष्ट नाहीं. अर्थात महत्परिमाणविशिष्ट ह्मणजे व्यापक आत्मा होय.

अनेकजीवात्मवादी—या प्रकारें सांख्यादिकांनीं व्यापक आत्मा सिद्ध केल्या नंतर पुनः सांख्यादि अनेकजीवात्मवादी ह्मणतात. सर्व देहांत जीवात्मा एक मानिल्यास एकास दुःख अथवा सुख किंवा बंध अथवा मोक्ष प्राप्त जाहल्यास सर्वांस व्हावा. तो कांहीं होत नाहीं. या स्तव प्रतिशरीरीं आत्मा भिन्न भिन्न आहे. तस्मात् जीवात्मे अनेक आहेत.

शंका—अहो, उपाधि अनेक असल्यास उपाधीं करून युक्त, आत्म्यास अनेकत्व प्राप्त होईल. उपाधिभूत अविद्या तरी एक एकली. मग उपाधेयभूत आत्म्यास अनेकत्व कसें प्राप्त होईल?

उत्तर—श्रुतींत ही उपाधीस अनेकत्व ऐकिलें आहे. या स्तव उपाधिभूत आत्मा ही अनेक जाणावा.

शंका—ज्या श्रुतींत उपाधीस एकत्व ऐकिलें आहे त्या श्रुतीची काय वाट?

उत्तर—ज्या श्रुतींत उपाधीस एकत्व सांगितलें त्या पेक्षां ही उपाधीस अनेकत्व सांगणारी श्रुति प्रबल होय. प्रबल कां ह्मणाल तर अनेक जीव मानिल्यास बंधमोक्षांची व्यवस्था लागते. ही युक्ति या श्रुतीस अनुकूल आहे.

या स्तव ही श्रुति प्रबल. या श्रुतीनें त्या श्रुतीचा बाध करून अनेक जीव मानावे.

एकजीवात्मवादी—या प्रमाणें सांख्यादिकांनीं अनेक-जीवात्मवाद सिद्ध करितां च मग एकजीवात्मवादी वेदान्ती ह्मणतात, जीवात्मा प्रतिशरीरीं भिन्न नाहीं. एक च आहे. जसा आकाश सर्व घटांत स्वरूपतः एक च. घटादि उपाधींच्या भेदें करून मात्र भिन्न भिन्न भासतोहे. तसा आत्मा शरीरादिकांच्या भेदें करून भिन्न भिन्न दिसतोहे. स्वरूपतः सर्व शरीरांचे ठायीं एक च जाणावा.

शंका—आत्मा एक मानिल्यास मग एकास दुःख व एकास सुख, तसें च एकास बंध व एकास मोक्ष ही व्यवस्था कशी होईल?

उत्तर—यद्यपि आत्म्यास उपाधिभूत अविद्येचा अभेद असला तरी अविद्याकार्यभूत अंतःकरणाचा भेद आहे. त्या अंतःकरणाच्या भेदानें सुखदुःखाची व्यवस्था होईल.

शंका—अहो, जीवात्मा एक. तेव्हां अविद्या ही एक च जाहली. अविद्यानिवृत्तिरूप मोक्ष एकास प्राप्त जाहला असतां, सर्वांस मोक्ष प्राप्त होईल. कां जर ह्मणाल तर उपाधिभूत अविद्या एक च. एक च अविद्या निवृत्त जाहल्यास अर्थात सर्वांची अविद्या निवृत्त जाहली च. मग सर्वांस मोक्ष कां प्राप्त होणार नाहीं? होईल च

उत्तर—तर ही इष्टापत्ति च. इष्टापत्ति कशी ती सांगतों.

जसा स्वप्नद्रष्टा जो तो मुख्य जीव होय. अन्य स्वप्नदृश्य जीव जे ते त्याचे कल्पित होत. तसें एक मुख्य जीव. अन्य जे दृश्य जीव ते त्या मुख्य जीवाचे कल्पित होत- जसा तो स्वप्नद्रष्टा स्वप्ना पासून मुक्त जाहला असतां, स्वप्नस्थ जीव अवघे स्वप्ना पासून मुक्त होतात, तसा मुख्य जीव जो तो मुक्त जाहला असतां त्याच्या बुद्धीनें अवघे च मुक्त होतात. मुख्य जीव तो कोणता ह्मणाल तर आल्या बुद्धीनें आपण च मुख्य जीव. अन्य जीव आपले कल्पित होत. तस्मात् आपण मुक्त जाहलों असतां सर्व च मुक्त. आपण बद्ध तर सर्व च बद्ध जाणावे.

शंका—या प्रमाणें एकजीववादांत बंधमोक्षाची व्यवस्था होत असतां, मग अनेक जीव मानण्याचें प्रयोजन काय?

उत्तर—अहो, श्रुतींत उपाधिभूत अविद्येस अनेकत्व सांगितलें आहे, ह्मणाल तर दुसऱ्या श्रुतींत एकत्व सांगितलें आहे. त्या एकत्वश्रुती पेक्षां अनेकत्वप्रतिपादकश्रुति गौरवदोषें करून युक्त. या स्तव दुर्लभ होय. एकत्वश्रुति लाघवें करून युक्त. या स्तव प्रबल होय.

गौरवलाघव कसें तें सांगतों. अनेकत्वश्रुतीच्या अनुसारें करून माया अनेक मानिल्यास गौरव. एकत्वश्रुतीच्या अनुसारें करून माया एक मानिल्यास लाघव. मग त्या श्रुतींत अनेकत्व जें सांगितलें आहे तें माया अनेक, या अभिप्रायानें नाहीं. तंर मायाशक्ति अनेक, या अभिप्रा-

यें करून. तस्मात् एक जीव मानिल्यास कांहीं एक दोष प्राप्त होत नाहीं.

आणि कोणी अविद्याप्रतिबिम्ब जीव मानितात. कोणी एक अविद्यावच्छिन्न ह्मणजे अविद्यें करून परिच्छिन्न जीव मानितात. उभयपक्षीं ही दोष नाहीं. प्रतिबिम्बपक्षीं बाधसामानाधिकरण्यें करून ब्रह्मासीं ऐक्य व परिच्छि-

---

समान ह्मणजे एक. आणि अधिकरण ह्मणजे आश्रय. दोन अथवा अधिक धर्मांचें एक च अधिकरण ह्मणजे ( आश्रय ) असणें हें सामानाधिकरण्य होय. जसें "नीलोघटः" यांत नीलत्व आणि घटत्व हे दोन धर्म घटरूप एका च वस्तूवर राहतात. ह्मणून नीलत्व आणि घटत्व यांचें घटरूपवस्तूशीं सामानाधिकरण्य झालें.

जेव्हां वाक्यांत सामानाधिकरण्य करणारे दोन्ही धर्म कायम असतात, तेव्हां त्यास मुख्यसामानाधिकरण्य ह्मणतात. वरील उदाहरणांत दोन्ही धर्म कायन असल्यामुळें तें मुख्यसामाधिकारण्य झालें.

पण जेव्हां दोन्ही धर्म कायम नसतात, ह्मणजे दोहों पैकीं एको धर्माचा बाधें करून त्याग होतो, तेव्हां त्यास बाधासामानाधिकरण्य ह्मणतात. जसें-"स्थाणुरयं पुरुषः" ह्मणजे मंदान्धकारांत स्थाणु ह्मणजे ऱ्हस्वशाखांचा वृक्ष, अज्ञानें करून पुरुष भासला. पण त्याचें यथार्थ ज्ञान झाल्यावर हा च स्थाणु, पुरुष भासला होता असें समजलें. यांत पुरुषत्व आणि स्थाणुत्व हे

त्वपक्षीं मुख्यसामानाधिकरण्यें करून ब्रह्मासीं ऐक्य मानावें. तस्मात् सत्यस्वरूप, ज्ञानस्वरूप, आनंदस्वरूप, निरवयव,

---

दोन धर्म स्थाणुरूप वस्तूवर आहेत. ह्मणून पुरुषत्व आणि स्थाणुत्व या दोन्ही धर्मांचें स्थाणुवस्तूशीं सामानाधिकरण्य झालें. पण स्थाणुत्वाच्या यथार्थज्ञानें करून पुरुषत्वाचा 'बाध' झाला. ह्मणजे भ्रमें करून स्थाणूवर केलेला पुरुषाचा आरोप नष्ट झाला. या स्तव हें बाधासामानाधिकरण्य झालें. बाधासामाधिकरण्य व जहद्जहल्लक्षणा यांचें स्वरूप एक च आहे.

आतां प्रस्तुतविषयास ह्मणजे दार्ष्टान्तिकास हे दृष्टान्त लावून पाहूं. पण त्याच्या पूर्वीं दार्ष्टान्तिकाच्या स्वरूपाचें थोडें स्पष्टीकरण करूं. स्थूलदेह व लिंगदेह हे दोन्ही अविद्यामूलक आहेत. (परिभषा पहावी). या स्तव ते अविद्यारूप च आहेत. त्यां पैकीं सूक्ष्मदेहांत ह्मणजे लिंगदेहांत अर्थात् अविद्येंत, जलांत सूर्याचा प्रतिबिम्ब पडतो तसा, ब्रह्माचा जो प्रतिबिम्ब पडला, तो जीव असें कित्येकांचें मत आहे. आणि घटावच्छिन्न ह्मणजे घटानें मर्यादित जसा घटाकाश आहे, तसें अविद्यावच्छिन्न अर्थात् लिङ्गदेहावच्छिन्न ह्मणजे लिंगदेहानें मर्यादित ब्रह्म आहे, तो च जीव असें दुसऱ्या कित्येकांचें ह्मणणें आहे.

प्रथमपक्ष—ज्या प्रमाणें अज्ञानें करून स्थाणु, पुरुष भासला त्या प्रमाणें च अज्ञानें करून ब्रह्म, प्रतिबिम्ब (जीव) भासलें अंधकाराचा नाश झाल्यावर भासमान पुरुष नष्ट होऊन स्थाणु च प्रतीतीस येतो, तद्वत् अविद्येचा (अज्ञानाचा) नाश झाल्यावर

निर्विकार, अवस्थात्रयसाक्षी, अविद्योपधिक आत्मा एक, ऐसा त्वंपदार्थ सिद्ध जाहला.

# तत्पदार्थशोधन.

## तत्पदार्थशोधनाची आवश्यकता.

आतां तत्पदार्थशोधन सांगतों—

शंका—अहो, त्वंपदार्थशोधनें करून आत्मज्ञान जाहलें. त्या आत्मज्ञानें करून मोक्ष प्राप्त होईल. मग तत्पदार्थशोधनाचें काय प्रयोजन ?

---

भासमान प्रतिबिम्बाचा नाश होऊन ब्रह्म च प्रतीतीस येतें. आतां प्रतिबिम्ब व ब्रह्म या दोघांचा आश्रय ( अधिकरण ) एक ( समान ) असून प्रतिबिम्बाचा बाध झाला. ह्मणून प्रतिबिम्ब ( जीव ) आणि ब्रह्म यांचें बाधासामानाधिकरण्यें करून ब्रह्मवस्तूशीं ऐक्य झालें.

द्वितीयपक्ष—घटावच्छिन्न आकाशाप्रमाणें च अविद्यावच्छिन्न ब्रह्म आहे, ह्मणून विशेषणविशेष्यभाव होऊन नील आणि घट यांचें मुख्य सामानाधिकरण्यें करून घटवस्तूशीं जसें ऐक्य झालें, त्या प्रमाणें च अविद्यावच्छिन्न ( जीव ) आणि ब्रह्म यांचें ब्रह्मवस्तूशीं मुख्यसामानाधिकरण्यें करून ऐक्य झालें हें सिद्ध आहे.

उतर—तत्पदार्थशोधना वांचून महावाक्यप्रतिपाद्य जीवब्रह्मैक्यज्ञान होणार नाहीं. जीवब्रह्मैक्यज्ञाना वांचून जीवनिष्ठपरिच्छिन्नता, व ब्रह्मनिष्ठपरोक्षता दूर होऊन अविद्यानिवृत्तिरूप मोक्ष प्राप्त होणार नाहीं. या स्तव तत्पदार्थशोधन अवश्य पाहिजे. आणि त्वंपदार्थां विषयीं वादी जसे विवाद करितात त्या प्रकारें तत्पदार्थां विषयीं ही वादी विवाद करितात. या स्तव हीं तत्पदार्थशोधन अवश्य पाहिजे.

वादींची तत्पदार्थविषयक मतें—तत्पदार्थां विषयीं वादी विवाद कसे करितात तें सांगतों.

प्रथमतः योगी ह्मणतात. क्लेश, कर्म, विपाक, आणि त्यांचे संस्कार, यांहीं करून असंयुक्त आणि असंग, चैतन्यस्वरूप जो पुरुषविशेष तो ईश्वर होय. तार्किक ह्मणतात, असंगास नियंतृत्व संभवत नाहीं. या स्तव नित्य ज्ञान, नित्य इच्छा-नित्य प्रयत्न, हे गुण ज्याचे ठायीं आहेत, असा जो पुरुषविशेष तो ईश्वर होय. उपासकजन ह्मणतात, नित्य ज्ञानादिमानास ईश्वर मानिलें असतां निरंतर सृष्टि च होऊं लागेल. कां जर ह्मणाल तर ईश्वराची इच्छा नित्य. त्या इच्छेचा कधीं नाश नाहीं च. तस्मात् प्रलय कधीं व्हावयाचा नाहीं. या स्तव हिरण्यगर्भ जो लिंगदेहें करून युक्त तो ईश्वर मानावा. लिंगदेहें करून ईश्वर जाहला असतां हा जीव होईल. ईश्वर कसा ह्मणाल तर लिंगदेहें करून युक्त असला तरी यास कर्मादिकांचा अभाव आहे. या कारणा स्तव हा

ईश्वर होय. पुनः विश्वरूपाचे उपासक ह्मणतात. स्थूलदेहा वांचून लिंगदेह कोठें दृष्टीस पडत नाहीं. या स्तव ब्रह्माण्डरूपस्थूलदेहाभिमानी विराट जो तो ईश्वर होय. पुरुषसूक्ताच्या ठायीं विराटास ईश्वरत्व सांगितलें आहे. या स्तव विराट च ईश्वर. मग पुत्रार्थ ब्रह्मदेवाची आराधना करणारें ह्मणतात. सृष्टिकर्ता ब्रह्मदेव टाकून इतरास ईश्वर मानणें अयोग्य. तस्मात् तूं मूर्ख. ब्रह्मदेव च ईश्वर होय. मग भागवतजन ह्मणतात; विष्णूच्या नाभी पासून ब्रह्मदेव उत्पन्न जाहला आहे. तस्मात् ब्रह्मदेव ईश्वर कसा होईल? ब्रह्मदेवाचा जनक जो विष्णु तो ईश्वर होय. शैव ह्मणतात; शिवाचा अंत लावण्या विषयीं ब्रह्मदेव आणि विष्णु दोघे मिळून शिवाच्या जवळ ज्या काळीं अभिमान करूं लागले, त्या काळीं शिवानीं ब्रह्मदेवास मस्तकाचा अंत लावण्या विषयीं आज्ञा केली असतां तो मस्तकाचा अंत लावण्या विषयीं ब्रह्माण्ड भेदून वर गेला. तरी त्यास मस्तकाचा अंत लागला नाहीं. मग विष्णूस आज्ञा केली कीं, तुह्मीं माझ्या पदाचा अंत लावावा. मग तो विष्णु शिवाच्या पदाचा अंत लावण्या विषयीं पाताळातें भेदून पाताळाच्या ही खालें गेला. पण त्या विष्णूस शिवाच्या पदाचा अंत सुद्धां लागला नाहीं. मग विष्णु ईश्वर कसा होईल? शिव च ईश्वर होय. या प्रकारें शैवांनीं शिवास ईश्व-

रत्व स्थापन करितां च मग गाणपत्य ह्मणतात; त्रिपुरासुराचा जय करण्या विषयीं ज्या काळीं शिव गेले त्या काळीं प्रथमतः गणपतीची पूजा करून मग त्रिपुरासुराचा जय केला. तस्मात् गणपति च ईश्वर होय. या प्रकारें अंतर्यामीला आरंभ करून स्थावरपर्यंत ईश्वर मानणारे आहेत. लोकांत ही अश्वस्थ अर्क, लोकादिकांचे ठायीं कुलदैवत ही बुद्धि दिसताहे. अस्तु.

ईश्वराच्या यथार्थस्वरूपा विषयीं विचार. या प्रकारें आपण ईश्वरविषयकवादाचा विवाद दाखविला. आतां ईश्वराचे स्वरूपाचा यथार्थ निर्णय करावा, अशी ज्यास इच्छा असेल त्यानें ईश्वराचा निश्चय कसा करावा? असें ह्मणाल तर सांगतों. माया जगतास उपादानकारण. त्या मायेच्या द्वारानें मायोपाधिक जें ब्रह्मचैतन्य, जगतास उपादान व निमित्त उभयकारणरूप आणि सर्वज्ञ, सर्वशक्ति, सर्वनियंता, अंतर्यामी जो तो ईश्वर जाणावा. अन्य हे ब्रह्मादिकां पासून स्थावर पर्यंत अवघे अंतर्यामी जो ईश्वर त्यांचे च अवयव होत. असा निश्चय केल्यास मग कोणाला ही ईश्वर मानिल्यास विरुद्ध बुद्धि होणार नाहीं. तस्मात् मायोपाधिक ह्मणजे माये करून परिच्छिन्न अथवा मायाप्रतिबिम्बभूत जें जगत्कारण जें ब्रह्म तो ईश्वर होय.

शंका—अहो, एका ईश्वरास निमित्त व उपादान असें उभयकारणत्व कसें प्राप्त होईल? लोकांत तरी घटास

उपादान कारण मृत्तिका व निमित्तकारण कुलाल, असे वेगळे वेगळे पाहिले आहेत.

उत्तर—जसा ऊर्णनाभि आपल्या मुखांतून तंतु उत्पन्न करित असतो. त्या तंतूंच्या उत्पत्तीस जडांशद्वारा उपादान कारण व चेतनांशद्वारा निमित्तकारण, अशा उभयकार्यतंतूस उभयकारण ऊर्णनाभि च होय. तसें ब्रह्म ही मायाद्वारा उपादानकारण. व मायेंत पडला जो चैतन्यप्रतिबिंब तद्द्वारा निमित्तकारण. या प्रकारें उभयकारण ईश्वर होय.

शंका—अहो, जगत्कारणत्व परिणामवादी सांख्य त्रिगुणात्मक प्रधानास मानितात वें कसें?

उत्तर—ते सांख्य त्रिगुणात्मक प्रधान नित्य मानितात. आणि परिणामी मानितात. ते त्रिगुणात्मकप्रधान, पुरुषास ह्मणजे जीवास भोगापवर्ग देण्या विषयीं महत्तत्वादि जगदाकारें करून परिणामा प्रति पावत आहे, ह्मणून ह्मणतात. या स्तव त्यांनीं जगत्कारणत्व प्रधानास मानिलें आहे. परिणाम ह्मणजे विकार. जसें दधि हा दुग्धाचा परिणाम ह्मणजे विकार. तसें जगत् हा प्रधानाचा परिणाम ह्मणजे विकार.

तार्किकप्रक्रिया—आणि आरंभवादी तार्किक ह्मणतात, जगतास उपादानकारण परमाणु व निमित्तकारण ईश्वर होय. परमाणूस उपादानकारणत्व कसें तें सांगतों. ते तार्किक

सप्त पदार्थ मानितात. ते कोणते तें सांगतों—

सप्तपदार्थ—१ द्रव्य २ गुण ३ कर्म, ४ सामान्य, ५ विशेष, ६ समवाय, ७ अभाव. हे सप्त पदार्थ होत.

यांत द्रव्य नऊ प्रकारचें आहे तें सांगतों—

नऊ प्रकारचें द्रव्य—१ पृथ्वी, २ आप, ३ तेज, ४ वायु, ५ आकाश, ६ काल, ७ दिक्, ८ आत्मा, ९ मन हीं नऊ द्रव्यें होत.

गुण चोव्वीस आहेत—१ रूप, २ रस, ३ गंध, ४ स्पर्श, ५ संख्या, ६ परिमाण, ७ पृथक्त्व, ८ संयोग, ९ विभाग, १० परत्व, ११ अपरत्व, १२ गुरुत्व, १३ द्रवत्व, १४ स्नेह, १५ शब्द, १६ बुद्धि, १७ सुख, १८ दुःख, १९ इच्छा, २० द्वेष, २१ प्रयत्न २२ धर्म, २३ अधर्म, २४ संस्कार हे चोव्वीस गुण होत.

कर्माचे पांच प्रकार—१ उत्क्षेप, ह्मणजे वरतें उडविणें, २ अपक्षेप ह्मणजे खालतें टाकणें, ३ आकुंचन ह्मणजे संकोच करून घेणें, ४ प्रसारण ह्मणजे पसरणें, ५ गमन ह्मणजे जाणें, असें हें पांच प्रकारचें कर्म मानितात.

सामान्य ह्मणजे वृत्ति त्या दोन प्रकारच्या—१ पर ह्मणजे अधिकवृत्ति आणि २ अपर ह्मणजे न्यूनवृत्ति. विशेष ह्मणजे नित्यद्रव्यवृत्ति हा पृथिव्यादि चतुष्टयाचे परमाणु आणि आकाश, काल, दिक्, आत्मा, मन, या नित्य द्रव्यांतें एकत्र होऊं देणार जो पदार्थ तो विशेष होय. ते विशेष असंख्यात आहेत.

समवाय ह्मणजे संबंध. १ द्रव्यगुणाचा, २ जातिव्यक्तीचा, ३ क्रियाक्रियावानाचा आणि ४ अवयव अवयवींचा जो संबंध तो समवायसंबंध होय.

अभाव चार प्रकारचा. तो पूर्वीं च सांगितला आहे. त्या नऊ प्रकारच्या द्रव्यांत पृथ्वीचे परमाणु, जलाचे परमाणु, वायूचे परमाणु, तेजाचे परमाणु, असे चार भूतांचे परमाणु नित्य मानितात. आणि आकाश, काल, दिक्, आत्मा, मन, हीं पांच द्रव्यें ही नित्य मानितात. ही त्या तार्किकांची प्रक्रिया दाखविली.

जगाच्या उत्पत्ती विषयीं तार्किकांचें मत—ते परमाणू पासून जगताची उत्पत्ति कशी मानितात तो ही प्रकार सांगतों. जीवाच्या अदृष्टानें ईश्वरास सृष्टि करावी अशी इच्छा उत्पन्न जाहली. ती इच्छा उत्पन्न होतां च पृथ्वीचे परमाणु आणि जलादिकांचे परमाणु परस्परें भिन्न होते त्यांचा संयोग होऊन द्व्यणुक उत्पन्न जाहलें. द्व्यणुकाचा संयोग होऊन त्र्यणुक, त्र्यणुकाचा संयोग होऊन मग पुढें या च क्रमानें स्थूलपृथ्वी, स्थूलजल, स्थूलवायु, स्थूलअग्नि या प्रकारें संपूर्णसृष्टीचा आरंभ जाहला. तस्मात् परमाणु च जगतास कारण होत. असें आरंभवादी ह्मणतात.

कालवादी—कालवादी काळ च जगतास कारण मानितात.

स्वभाववादींचें मत व त्याचें खंडन—स्वभावादी स्वभाव

च जगत्कारणत्व मानितात. कसें तें सांगतों. वीर्या पासून देह उत्पन्न होणें हा वीर्याचा स्वभाव च होय. दुग्धा पासून दधि उत्पन्न होणें हा दुग्धाचा स्वभाव च. ज्या प्रकारें ज्या पासून जें उत्पन्न होताहे ते त्याचे स्वभाव च होत. या प्रकारें स्वभाववादी स्वभावास कारण मानितात.

शंका—अशीं अनेक कारणें असतांना ईश्वरास जगत्कारणत्व कसें मानावें.

उत्तर—वेदान्तविचारपूर्वकसृष्टि ऐकिली आहे. विचार करणें हा चेतनधर्म आहे. लोष्टवत् अचेतन त्रिगुणात्मकप्रधानास विचार करणें संभवत नाहीं. तेव्हां सृष्टीचें कर्तृत्व कसें संभवेल? आणि प्रधानास ते नित्य मानितात. हें ही अयोग्य. कसें तें सांगतों. त्रिगुणात्मक प्रधान मानितात. तेव्हां सत्व, रज, तम, हे तीन गुण प्रधानाचे अवयव जाहले. या स्तव प्रधान सावयव जाहलें. लोकांत सावयव घटादिक हे अनित्य पाहिले आहेत. प्रधान ही सावयव असून मग नित्य कसें होईल? तस्मात् प्रधानास नित्य मानणारे आणि जगत्कारण मानणारे जे सांख्य त्यांचें मत त्वंपदार्थशोधना वांचून अन्य अवघें वेदबाह्य जाणावें. तस्मात् मुमुक्षूंनीं त्यांच्या मताच्या ठायीं श्रद्धा करूं नये.

तार्किकमताचें खंडन—आणि आरंभवादी तार्किक जे ते परमाणूस जगत्कारणत्व मानितात, हें ही अयोग्य, कसें तें सांगतों. त्या तार्किकांस आपण पुसावें कीं, ते

परमाणु सावयव किंवा निरवयव ? ते परमाणु सावयव ह्मणतील तर घटवत् अनित्य जाहले प्रळयकाळीं त्यांचा ही नाश होईल, मग, जगताच्या उत्पत्तीच्या पूर्वीं ते राहतील कसे ? ते न राहिल्यास मग परमाणूंचा परस्पर संयोग होऊन जगताचा आरंभ कसा होईल ? अथवा ते परमाणु निरवयव ह्मणशील तर मग परस्पर संयोग होऊन सृष्टीचा आरंभ कसा होईल ? कां जर ह्मणाल तर लोकांत सावयवपदार्थांचा संयोग पाहिला आहे. निरवयवांचा संयोग पाहिला नाहीं. तस्मात् परमाणु सावयव ह्मटल्यास अथवा निरवयव ह्मटल्यास, उभयपक्षीं ही सृष्टीची सिद्धि, होत नाहीं मग परमाणूंस कारणत्व कसें प्राप्त होईल ?

आणि ते तार्किकजीवांच्या अदृष्टानें ईश्वरास इच्छा उत्पन्न, होऊन, मग ईश्वरेच्छेनें परस्पर परमाणूंचा संयोग होऊन सृष्टि होत्ये ह्मणतात, हें ही अयोग्य. कसें तें सांगतों. सृष्टि होऊन स्थूलदेह ज्या काळीं उत्पन्न होईल त्या काळीं जीव जो तो कर्म करील. तेव्हां अदृष्ट च नाहीं. मग अदृष्टानें ईश्वरास इच्छा कोठून उत्पन्न होणार ? आणि ते ईश्वरेच्छेस नित्य मानितात. मग ती ईश्वरेच्छा नित्य जाहल्यास जीवांच्या अदृष्टानें उत्पन्न कशी होईल? असे अनेक प्रकारचे दोष प्राप्त होतात. या स्तव तार्किकांचें मत ही असंगत आहे. व अवैदिक आहे. मुमुक्षूंनीं त्या तार्किकांच्या मताच्या ठायीं श्रद्धा करूं नये.

कालवादिमताचें खंडन—आणि कालवादी कालास कारण मानितात. त्यांस ही पुसावें कीं, काल सावयव किंवा निरवयव? सावयव ह्मणतील तर घटादिकां प्रमाणें अनित्यत्व प्राप्त जाहल्यास मग त्या पासून जगत् कसें उत्पन्न होईल? वेदान्तमतें ब्रह्म ही निरवयव. त्या पासून जगत् कसें उत्पन्न होईल? असें ह्मणतील तर ब्रह्मास मायाद्वारा जगत्कारणत्व वेदान्ती मानितात. साक्षात्कारणत्व कांहीं मानीत नाहींत. तसें कालास ही मायाद्वारा ह्मणाल तर मग कालवाद च बुडून ब्रह्मकारणवाद च प्राप्त होईल. या प्रकारें अनेक दोष प्राप्त होतात. या स्तव कालास जगत्कारण मानणारे हे ही अविवेकी होत.

स्वभाववादिमताचें खंडन—तसें च स्वभावा पासून जगताची उत्पत्ति मानणारे हे ही अयोग्य व अत्यंत मूढ जाणावे. ते वीर्या पासून देह उत्पन्न होणें हा वीर्याचा स्वभाव च होय ह्मणतात. परंतु त्यांस आपण पुसावें कीं, वंध्येचे ठायीं वीर्य पडलें असतां तेथें देह कां उत्पन्न होत नाहीं? आणि ज्या ज्या काळीं स्त्रीच्या उदरांत वीर्यपतन होत आहे त्या त्या काळीं देह कां उत्पन्न होत नाहीं? वीर्य कदापि व्यर्थ होऊं नये. पण वीर्य तर अनेक वार व्यर्थ होत आहे. या स्तव हा वीर्याचा स्वभाव नव्हे. तसें च घटाकारें करून उत्पन्न होणें हा मृत्तिकेचा स्वभाव च जर असता तर दंडचक्रांचें व कुलालाचें प्रयोजन काय?

तस्मात् मृत्तिकेचा ही हा स्वभाव नव्हे. तसें च दुग्धापासून दधि होणें हा जर दुग्धाचा स्वभाव आहे तर विरझण घालण्याचें प्रयोजन काय? विरझणा वांचून दधि उत्पन्न होत नाहीं. या स्तव हा दुग्धाचा स्वभाव नव्हे. तस्मात् मायाद्वारा सच्चिदानंदस्वरूप ब्रह्म च जगत्कारण होय. असें जगत्कारण, मायोपाधिक, सर्वज्ञत्वादिगुणविशिष्ट सत् चित्-आनंद स्वरूप ईश्वराख्य जें ब्रह्म तें तत्पदाचा अर्थ होय.

---

## असिपदशोधन.

या प्रकारें त्वंपदार्थ व तत्पदार्थ या दोनी पदांच्या अर्थातें सांगून आतां असिपदाच्या अर्थातें सांगतों. असिपद जें तें, त्वंपदाचा अर्थ अविद्योपाधिक, किंचिज्ज्ञत्वादिगुणविशिष्ट, सच्चिदानंदस्वरूप जीवात्मा व तत्पदाचा अर्थ मायोपाधिक, सर्वज्ञत्वादिगुणविशिष्ट, सच्चिदानंदस्वरूप जो ईश्वर या दोघांचें ऐक्यबोधन करित आहे.

---

### माया व अविद्या यांचें स्वरूप.

शंका—हे गुरो, त्वंपदार्थभूत जो जीवात्मा त्यासी अविद्योपाधि व तत्पदार्थभूत जो ईश्वर त्यासी माया उपाधि ह्मणून आपण सांगितलें. परंतु श्रुतींत तरी मायाशक्ति एक च ऐकिली आहे. माया वेगळी व अविद्या वेगळी जाहल्यास मग त्या श्रुतीस विरोध प्राप्त होईल. हें कसें?

उत्तर—प्रथम सृष्टीच्या पूर्वी ब्रह्मस्वरूपी जी मूलप्रकृति होती तिचे दोन भाग जाहले. एका भागांत सत्वगुण मलिन राहिला. तो भाग अविद्या होय. एका भागांत सत्वगुण शुद्ध राहिला. तो भाग माया होय. मलिनसत्वप्रधान अविद्यायोगानें जीवास किंचिज्ज्ञत्व आणि शुद्धसत्वप्रधानमायायोगानें ईश्वरास सर्वज्ञत्व प्राप्त होतें. या प्रकारें मूलप्रकृति एक च आहे. त्या च प्रकृतीचे माया व अविद्या असे दोन भाग आहेत. या स्तव श्रुतीसीं कांहीं विरोध प्राप्त होत नाहीं.

---

## वाच्यार्थ व लक्ष्यार्थ

शंका—अहो, असिपद जीवेश्वराचें ऐक्य सांगत आहे ह्मणतां. परंतु जीवेश्वरांचें ऐक्य कसें होईल? कां जर ह्मणाल तर जीव जो तो किंचिज्ज्ञ व ईश्वर जो तो सर्वज्ञ. तेव्हां किंचिज्ज्ञाचें व सर्वज्ञाचें ऐक्य कसें होईल? किंचिज्ज्ञ व सर्वज्ञ या दोनी धर्मांचा परस्पर विरोध आहे. या स्तव दोनी धर्म अंधकारप्रकाशवत् एकत्र राहणार नाहींत. तेव्हां जीवब्रह्मैक्यबोधनपर हें वाक्य कसें?

उत्तर—त्वंपदाचे दोन अर्थ. एक वाच्यार्थ, व एक लक्ष्यार्थ. अविद्योपाधिक, किंचिज्ज्ञत्वादिविशिष्ट, सच्चिदानंद-

स्वरूप, जीवात्मा हा त्वंपदवाच्यार्थ होय. अविद्यारहित, किंचिज्ज्ञत्वादिगुणरहित, शुद्ध, सच्चिदानंदस्वरूप, जीवात्मा हा त्वंपदाचा लक्ष्यार्थ होय. तसा च मायोपाधिक सर्वज्ञत्वादिविशिष्ट, सच्चिदानंदस्वरूप, ईश्वर हा तत्पदाचा वाच्यार्थ होय. मायारहित, शुद्ध, सच्चिदानंदस्वरूप, ब्रह्म जें तें तत्पदाचा लक्ष्यार्थ होय. यद्यपि तत्त्वपदांच्या वाच्यार्थांचा अभेद होण्या विषयीं विरोध आला तरी लक्ष्यार्थांचा अभेद होण्या विषयीं विरोध नाहीं. दोनी पदांचे लक्ष्यार्थ ही शुद्ध, सच्चिदानंदस्वरूप च आहेत. त्या दोनी लक्ष्यार्थांत किंचिन्मात्र वैलक्षण्य नाहीं. या स्तव तें महावाक्य लक्ष्यार्थातें घेऊन जीवब्रह्मांचें ऐक्य सांगत आहे. तस्मात् आपण ही सत्यस्वरूप, ज्ञानस्वरूप, आनंदस्वरूप. आणि तत्पदार्थभूत ब्रह्म ही सत्यस्वरूप, ज्ञानस्वरूप, आनंदस्वरूप आहे. दोघांचें स्वरूप एक. या स्तव तूं ब्रह्म च आहेस. हें च महावाक्याचें तात्पर्य. हा च महावाक्यानें बोध केला. हें प्रमाण मानून मी च ब्रह्म, केवल निराकारस्वरूप आहें. हें संपूर्ण किंचिज्ज्ञत्व, कर्तृत्व, भोक्तृत्व, सुखदुःखादिक अवघें माया व अविद्या यांच्या योगानें माझे ठायीं रज्जुसर्पवत् कल्पित आहे. असा निश्चय करावा. या विषयीं संदेह करूं नये.

## वाच्यार्थ व लक्ष्यार्थ ह्यांचें स्वरूप.

शंका—हे गुरो, आपण ह्मटलें कीं, वाच्यार्थांचा विरोध

असला तरी लक्ष्यार्थांचा अभेद होण्या विषयीं विरोध नाहीं. वाच्यार्थांचें काय स्वरूप व लक्ष्यार्थाचें काय स्वरूप हें स्पष्ट सांगावें.

उत्तर—ज्या पदाची ज्या अर्थाचे ठायीं व्युत्पत्तिबलें करून शक्ति असतीहे त्या पदाचा तो वाच्यार्थ जाणावा. जसें 'गंगायां घोषः' (गंगेवर गवळवाडा आहे) यांत गंगा या पदाची व्युत्पत्तिबलें करून प्रवाहाचे ठायीं शक्ति आहे. ह्मणून प्रवाह जो तो गंगापदाचा वाच्यार्थ होय. लक्षणे करून प्राप्त जो अर्थ तो लक्ष्यार्थ जाणावा. जसें गंगापदाशीं व घोषपदाशीं अन्वयाचा असंभव येतां च गंगापदें करून तीर लक्षिजेल. या स्तव तीर जें तें गंगापदाचा लक्ष्यार्थ होय. तसें एथें महावाक्याचे ठायीं ही किंचिज्ज्ञत्व आणि सर्वज्ज्ञत्व या दोन पदांचा परस्पर विरोध आहे. या स्तव किंचिज्ज्ञत्वादि गुणविशिष्ट जीव व सर्वज्ञत्वादि गुणविशिष्ट ईश्वर या दोघांचें ऐक्य होण्याचा असंभव आला. या हेतू स्तव लक्ष्यार्थाला घेऊन ऐक्य करण्या विषयीं लक्षणा करावी. लक्षणे वांचून महावाक्याचे ठायीं पदाचा अन्वय लागत नाहीं. या स्तव लक्षणा अवश्य पाहिजे

---

## त्रिविधलक्षणा.

लक्षणा ही शास्त्रांत तीन प्रकारची सांगितली आहे. जहल्लक्षणा, अजहल्लक्षणा, व तिसरी भागत्यागलक्षणा,

ह्मणजे जहदजहल्लक्षणा.

जेथें संपूर्ण स्वार्थाचा त्याग होऊन तत्संबंधी अर्थाचे ठायीं पदाची वृत्ति होते, तेथें जहल्लक्षणा जाणावी. जसें 'गंगायां घोषा वर्तते' या वाक्याच्या ठायीं, जहल्लक्षणास्वीकार केला आहे.

कसा तें सांगतों, गंगापदाचा वाच्यार्थ प्रवाह, घोषपदाचा अर्थ गवळ्याचीं घरें, आणि वर्तते ह्मणजे राहत आहेत. हे भिन्न भिन्न पदांचे अर्थ जाहले. आतां संपूर्ण वाक्याच्या अर्थातें सांगतों. गंगेच्या ठायीं ह्मणजे प्रवाहाचे ठायीं गवळ्यांचीं घरें आहेत. हा जो तो व्युत्पत्तिबलें करून वाक्याचा अर्थ जाहला. तेव्हां प्रत्यक्षप्रमाणाशीं विरोध आला. ज्या प्रवाहांत तृण सुद्धां राहत नाहीं तेथें घर कसें राहील? हा विरोध आला. या स्तव येथें जहल्लक्षणास्वीकार करणें प्राप्त. लक्षणे वांचून विरोध दूर होत च नाहीं. त्या जहल्लक्षणेनें गंगापदाचा वाच्यार्थ जो प्रवाह तो सोडून, गंगापदानें प्रवाहसंबंधी तीर लक्षित जावें. ह्मणजे गंगापदाचा, तीर हा लक्ष्यार्थ होतो. त्या काळीं गंगातीराचे ठायीं गवळ्याचीं घरें आहेत, असा वाक्यार्थ होतो. तसें येथें महावाक्याचे ठायीं जहल्लक्षणास्वीकार केल्यास त्वंपदाचा वाच्यार्थ किंचिज्ज्ञ, सच्चिदानंदस्वरूप, जो जीवात्मा तो व तत्पदाचा वाक्यार्थ सर्वज्ञ, सच्चिदानंदस्वरूप जो ईश्वर तो ह्या संपूर्ण वाच्यार्थाचा च त्याग होईल. मग असिपदें करून ऐक्य कोणाचें करावें?

या स्तव महावाक्याचे ठायीं जहल्लक्षणा संभवत नाहीं.

तसें च अजहल्लक्षणा ही संभवत नाहीं. अजहल्लक्षणेचें उदाहरण दाखवितों. 'शोणोधावति' शोण ह्मणजे तांबडा रंग; धावति ह्मणजे धावतो. हा वाक्याचा अर्थ जाहला. परंतु रंग ह्मणजे रूप. तांबड्या रूपास धावन संभवत नाहीं. या स्तव वाक्यार्थाशीं व प्रत्यक्षादिप्रमाणांशीं विरोध प्राप्त होऊन शोणपदाशीं व धावतिपदाशीं अन्वय अप्राप्त होऊन, वाक्यार्थ च राहिला. या मुळें 'शोणोधावति' या वाक्याचे ठायीं अजहल्लक्षणा स्वीकारणें प्राप्त. अजहल्लक्षणेचें लक्षण सांगतों. ज्या पदाचा जो वाच्यार्थ त्याचा त्याग न करून वाच्यार्थविशिष्ट अर्थाचे ठायीं त्या पदाची वृत्ति करणें ही अजहल्लक्षणा होय. जसें 'शोणोधावति' या वाक्याचें ठायीं शोणगुणास धावन संभवत नाहीं. या स्तव शोणगुणविशिष्ट अश्व ह्मणजे तांबड्या रंगाचा घोडा, त्याच्या ठायीं लक्षणा करून तांबड्या रंगाचा अश्व धावतो, असा वाक्यार्थ केल्यास मग प्रत्यक्षादिप्रमाणास कांहीं विरोध होत नाहीं. तसें महावाक्याचे ठायीं, अजहल्लक्षणास्वीकार केल्यास तत्त्वंपदांचा वाच्यार्थ च सुटणार नाहीं. त्या काळीं किंचिज्ज्ञत्व व सर्वज्ञत्व यांचा विरोध कायम राहिला. तेव्हां आसपदें करून ऐक्य कसें होईल? या स्तव महावाक्याचे ठायीं अजहल्लक्षणा ही उपयोगी नाहीं.

तस्मात् महावाक्याचे ठायीं भागत्यागलक्षणा ह्मणजे

जहदजहल्लक्षणास्वीकार करावा. भागत्यागलक्षणेचें स्वरूप व उदाहरण ही दाखवितों. ज्या ज्या पदाचा जो जो वाच्यार्थ, त्यांत ऐक्य होण्या विषयीं जो विरुद्ध अंश असेल तो अंश सोडून अविरुद्ध अंशातें घेऊन दोनी पदार्थांचें ऐक्य करणें. याचें नांव भागत्यागलक्षणा. याचें उदाहरण. 'सोऽयं देवदत्तः' हें वाक्य कसें तें सांगतों. या वाक्यांत 'सः अयं' अशीं दोन पदें आहेत. 'सः' या पदाचा अर्थ तो. व अयं या पदाचा अर्थ हा. आतां दोनीं पदें मिळून जो अर्थ तो सांगतों. त्या देशांत, त्या काळांत, त्या वयांत, त्या आश्रमांत, पाहिला जो तो च या देशांत, या कालांत, या वयांत व या आश्रमांत, हा देवदत्त पाहिला. असा दोनी पदार्थांचा ऐक्यबोध होतो. त्यास येथें भागत्यागलक्षणे वांचून ऐक्य कसें होईल? कां जर ह्मणाल तर तो देश, तो काळ, तें वय, तो आश्रम, हे वेगळे. व हा देश, हा काळ, हें वय, व हा आश्रम, हे वेगळे. ती व्यक्ति व ही व्यक्ति मात्र एक. ते कालादिक व हे कालादिक घेऊन व्यक्तींचें ऐक्य केल्यास विरोध येतो. या स्तव भागत्यागलक्षणे करून ऐक्य होण्या विषयीं विरुद्ध जे कालादिक, ते टाकून अविरुद्ध जी व्यक्ति, ती 'सोऽयं' या दोनी पदें करून घेऊन ऐक्य केल्यास मग विरोध न येतां तो च हा देवदत्त, असा बोध होतो.

तसें च या महावाक्याचे ठायीं किंचिज्ज्ञत्वादिक, आणि

सर्वज्ञत्वादिक हे धर्म घेऊन जीवब्रह्मांचें ऐक्य करूं गेल्यास विरोध प्राप्त होतो. या स्तव अविद्येच्या योगानें, जीवाचे ठायीं प्राप्त जाहलेले किंचिज्ज्ञत्वादिक, व मायेच्या योगानें ईश्वराचे ठायीं, प्राप्त जाहलेले सर्वज्ञत्वादिक हे दोनी आगंतुक धर्म टाकून, जे कांहीं दोघांचे ठायीं स्वाभाविक धर्म, सद्रूपता. चिद्रूपता व आनंदरूपता, ते घेऊन असिपदें करून ऐक्य केल्यास मग कांहीं एक विरोध होत नाहीं.

ब्रह्मज्ञान—या च अभिप्रायें करून महावाक्य जें तें तूं च ब्रह्म आहेस, असा उपदेश करीत आहे. तस्मात् आपण ही, सच्चिदानंदस्वरूप, ब्रह्म मी च असा निश्चय करावा. या विषयीं साक्षात् महावाक्य प्रमाण असतांना तत्पदार्थरूप ब्रह्म ही सच्चिदानंदस्वरूप आणि त्वंपदार्थस्वरूप, आत्मा ही सच्चिदानंदस्वरूप. या प्रकारें दोघांचें एक च स्वरूप असतांना, आणि 'मी च ब्रह्म' असा विद्वानांचे ठायीं निश्चयात्मक अनुभव दिसत असतांना, मग व्यर्थ आपल्या बुद्धीनें नाना प्रकारचे कुतर्क घेऊन 'मी ब्रह्म' असा निश्चय करणार नाहींत, ते केवळ पशु च जाणावे. तस्मात् महावाक्या वर विश्वास ठेवून मी च ब्रह्म असा निश्चय करावा. 'मी ब्रह्म' अशी निश्चयात्मक वृत्ति च ब्रह्मज्ञान होय. हें च ज्ञान जन्ममरणा पासून मुक्त होण्या विषयीं कारण आहे. या च ज्ञानें करून, जनक, याज्ञवल्क्य, व्यास, वसिष्ठ, पराशर, शुक, वामदेव, कपिल, संवर्त्तकादिक, जीवन्मुक्त होत्साते देहपातानंतर

विदेहमुक्तीतें प्राप्त होऊन जन्ममरणात्मकसंसारा पासून मुक्त जाहले.

तस्मात् सर्व साधनें ज्ञाना पर्यंत आहेतें. ज्ञान प्राप्त जाहल्यास, मग कांहीं एक कर्तृत्व नाहीं. तस्मात् 'मी ब्रह्म' असें निश्चयात्मक ज्ञान संपादन करावया विषयीं अलक्ष्य करूं नये.

# भाग ३ रा.

## उपसंहार.

### द्विविधभ्रम.

शंका—हे गुरो, मी सच्चिदानंदस्वरूप ब्रह्म च जर आहें, तर माझे ठायीं कर्तृत्व, भोक्तृत्व, सुख, दुःख, जन्ममरणादिक विकार जे ते कां भासतात?

समाधान—हे शिष्य, जसे रज्जूचे ज्ञानानें रज्जूचे ठायीं सर्पादिक कल्पित, तसें तुझ्या स्वरूपाचें जें अज्ञान, तद्रूप जी माया, त्या मायें करून निर्विकारब्रह्मस्वरूप जो तूं, त्या तुझे ठायीं अवघे विकार कल्पित आहेत. वास्तविक तूं निर्विकारब्रह्मस्वरूप च आहेस.

शंका—हे गुरो, जसें रज्जूचें ज्ञान जाहलें असतां, रज्जूचे ठायीं कल्पित जे सर्पादिक ते नाहींतसे होतात. पुनः दिसत नाहींत. तसें अधिष्ठानभूत 'ब्रह्म मी च' असें ज्ञान जाहलें असतां, हे संपूर्ण कर्तृत्वादिक विकार माझे ठायीं नाहींतसे व्हावे पुनः दृष्टी पडूं नयेत. ते कां पडतात?

समाधान—हे शिष्य, भ्रम दोन प्रकारचा. एक सोपाधिक भ्रम. आणि एक निरुपाधिक भ्रम. रज्जूच्या ठायीं जो सर्पभ्रम तो निरुपाधिक होय. या स्तव अधिष्ठानभूतरज्जुज्ञानें करून, तो सर्प नाहींसा होतो. आणि स्फटिकाचे ठायीं जो रक्तिमेचा भ्रम, तो सोपाधिक भ्रम होय. जावत्काल स्फटिकाचे सन्निध जपाकुसुम आहे, तावत्काल स्फटिकाचे ठायीं, लाली भासत्ये. स्फटिक जो तो श्वेत आहे, असें ज्ञान जाहलें तरी जपाकुसुम जवळ असल्यास, लाली भासल्या वांचून राहणार नाहीं. लालीच्या ठायीं मिथ्यात्वबुद्धि मात्र होईल. तसें आत्म्याचे ठायीं जो कर्तृत्वादिकाचा भ्रम हा निरुपाधिक भ्रम नव्हे. कोणता ह्मणाल तर हा सोपाधिक भ्रम होय. येथें उपाधि कोणता ह्मणाल तर अंतःकरणादि उपाधि जावत्काल आहेत, तावत्काल प्रत्यगात्मस्वरूप 'ब्रह्म च मी' असें ज्ञान जाहलें तरी, तें कर्तृत्व, भोक्तृत्व, सुख, दुःखादिक विकार आत्म्याचे ठायीं भासतील च. परंतु त्याचे ठायीं मिथ्यात्वबुद्धि होईल. प्रपंचा वर मिथ्यात्वबुद्धि होणें हें च मोक्षाचें कारण. प्रपं-

चार्चे भान न होणें हें कांहीं मोक्षाचें कारण नाहीं. सुषुप्तींत प्रपंचाचा भास च होत नाहीं. ह्मणून मोक्ष प्राप्त होतो कीं काय? तस्मात् मिथ्यात्वबुद्धि च मोक्षास कारण होय.

शंका—हे गुरो, जावत्काल अंतःकरणादि उपाधि आहेत, तावत्काल, आत्म्याचे ठायीं कर्तृत्वादिक भ्रम दूर होत नाहींत ह्मणून सांगितलें. परंतु संपूर्ण प्रपंचास अविद्या उपादानकारण आहे. 'मी च ब्रह्म' असें ज्ञान जाहलें असतां, त्या ज्ञानें करून ती अविद्या दूर जाहली असतां, मग त्या अविद्येचीं कार्यें अंतःकरणादिक कशीं राहतील?

समाधान—जसा रज्जू वरील सर्पभ्रम तो गेला असतां ही, त्या पासून उत्पन्न जाहला जो कंप तो कांहीं एक जात नाहीं. कांहीं काळ पर्यंत तो कंप राहतो. तसें आत्मज्ञानें करून उपादानकारणरूप अविद्या निवृत्त जाहली तरी अविद्येचें कार्य अंतःकरणादिक कांहीं काळपर्यंत राहत आहे.

---

## प्रारब्धाची मर्यादा.

शंका—अंतःकरणादिक तरी कोठ पर्यंत राहत आहे?

समाधान—जावत्काळ प्रारब्ध तावत्काल राहताहे.

शंका—प्रारब्ध तरी किती दिवसांनीं सरेल?

समाधान—हा कांहीं नियम नाहीं. जे कोणी सृष्टीचे अधिकारी, वसिष्ठादिक पुरुष आहेत, त्यांचें दीर्घ, लंबायमान प्रारब्ध आहे. जे कोणी साधारण जीव आहेत, त्यांचें प्रारब्ध देहपाता नंतर नष्ट होताहे. या स्तव त्यांस देहपाता नंतर पुनर्जन्म न प्राप्त होत्साता, विदेहमुक्ति प्राप्त होतीहे. जे अधिकारी पुरुष, त्यांचें प्रारब्ध लंबायमान. या स्तव त्यांस कांहीं प्रसंगा मुळें मध्यें मध्यें भीष्मविदुरादिकां प्रामाणें, जन्म प्राप्त होताहे. मध्यें मध्यें जन्म जाहलें तरी त्यांस पूर्वजन्माची स्मृति असते. या स्तव ते जातिस्मर ह्मणवितात. जे जातिस्मर असतात त्यांचें मागल्या जन्माचें व या जन्माचें एक प्रारब्ध जाणावें. मग त्यांचें तें लंयबामान प्रारब्ध संपल्या नंतर अधिकारी पुरुषाचा ही देहपात होतो. मग त्यांस विदेहमुक्ति प्राप्त होत्ये. तस्मात् जावत्काळ प्रारब्धकर्म आहे, तात्काळ हा विक्षेप दिसतो. अज्ञानाचे ठायीं दोन शक्ति आहेत. एक विक्षेपशक्ति व एक आवरणशक्ति. 'मी ब्रह्म' असें ज्ञान होतां च ती आवरणशक्ति जी ती त्या प्रारब्धाचा क्षय होई पर्यंत राहत्ये.

शंका—हे गुरो, ज्ञानें करून संपूर्ण कर्म भस्म होताहे. असें शास्त्रांत ऐकिलें आहे. या स्तव जसें संचित व क्रियमाण कर्म भस्म होताहे, तसें प्रारब्धकर्म ज्ञानें करून भस्म कां होत नाहीं?

समाधान—भाविजन्ममरणादिकांचें निवर्तक ज्ञान होय.

व भाविजन्मादिकांचें संपादक संचितक्रियमाणकर्म होय. या स्तव ज्ञानाचा व संचितक्रियमाणकर्मांचा विरोध आहे. तसें प्रारब्ध कांहीं भाविजन्मादिकांचें संपादक नाहीं. या च जन्मीं भोग करून नष्ट होणार. या स्तव प्रारब्धाचा व ज्ञानाचा, विरोध नाहीं. मग तें ज्ञान प्रारब्धाचें नाशक कसें होईल? आणि ज्या प्रारब्धा पासून ज्ञान उत्पन्न जाहलें, तें त्या प्रारब्धाचा नाश करील तर उपजीव्यविरोध प्राप्त होईल. तस्मात् ज्ञानाचा व प्रारब्धाचा विरोध नाहीं. जेथें विरोध असतो तेथें च नाश्यनाशकभाव प्राप्त होतो. आणि प्रारब्ध, भोगें करून नष्ट होणार. या स्तव मुमूर्षुवत् तें नाशोन्मुख च आहे. त्यास ज्ञानानें नष्ट केलें असतां ज्ञानाचा काय पुरुषार्थ? जसें लोकांत ही जो मरणोन्मुख पडला आहे, त्याचा शस्त्रानें वध केला असतां, त्यास मूर्ख ह्मणतात. कोणी पुरुषार्थी ह्मणत नाहींत. तसें ज्ञानास ही मूर्खत्व प्राप्त होईल. या स्तव ज्ञानानें प्रारब्धाची उपेक्षा केली. तस्मात् ज्ञानानें प्रारब्ध नष्ट होत नाहीं. आणि ज्ञानानें प्रारब्ध नष्ट जाहल्यास त्या च काळीं प्रारब्धजन्य देह ही पडेल. पडल्यास ज्ञानी च कोणी राहणार नाहीं. मग उपदेशपरंपरा च बुडेल. ज्ञाना नंतर प्रारब्ध राहत आहे. ह्मणून ही अज्ञानाची दृष्टि स्वीकारून देह आहे ह्मणावयाचें. ज्ञानाचे दृष्टीनें देह च नाहीं. मग प्रारब्ध व तज्जन्य सुखादिक कोठून राहणार?

---

## ज्ञानी मनुष्याचे व्यावहारिकवर्तनाचा प्रकार.

शंका—हे गुरो, ज्ञान्याचे दृष्टीनें देहादिक च नाहींत. मग ज्ञानी भिक्षाटन उपदेशादि व्यापार कसा करील? जनकवसिष्ठादिकांचे ठायीं राज्यपालन उपदेशादि व्यापार दिसताहेत, हें कसें?

समाधान—ते ज्ञानी आपल्या बुद्धीनें कांहीं करित नाहींत.

शंका—प्रत्यक्ष दृष्टी पडत असतां, नाहीं करीत कसें ह्मणावें?

समाधान—हे शिष्य, तुला ज्ञान्याचे ठायीं जे व्यापार दृष्टीस पडतात, ते ज्ञानी मनुष्याचे आत्म्याचे ठायीं दृष्टीस पडतात, किंवा ज्ञान्याच्या अहंकारादिसंघाताच्या ठायीं दृष्टीस पडतात? आत्म्याच्या ठायीं ह्मणशील तर सुषुप्तींत आत्मा सुषुप्तिसाक्षित्वें करून असतांना ही तेथें व्यवहार कां दृष्टीस पडत नाहीं? अहंकारादिसंघाताच्या ठायीं ह्मणशील, तर ज्ञानी जो तो आपणाला आत्मरूप मानितोहे? किंवा संघातरूप मानितोहे? आत्मरूप मानिताहे ह्मणशील तर आत्म्याचे ठायीं व्यापार च नाहींत. मग आत्मरूपज्ञान्याचे ठायीं व्यापार कोठून दृष्टीस पडतील? ज्ञानी जो, तो संघातरूप च आपणास मानितोहे ह्मणशील, तर संघातरूप च

जो आपणाला मानील तो ज्ञानी च नव्हे. मग तेथें व्यापार दृष्टीस पडल्यास कांहीं एक बाध नाहीं.

शंका—हे गुरो, सर्वांच्या आत्म्याच्या ठायीं व्यापार दृष्टीस पडत नाहींत. तर मग सर्वांस च ज्ञानी कां नाहीं ह्मणत?

समाधान—सर्वांस 'मी संघात नाहीं. साक्षात् प्रत्यगात्म रूप ब्रह्म च आहें' हा निश्चय कोठें आहे? ज्यास 'ब्रह्म च मी' असा निश्चय असेल तो च ज्ञानी ह्मणवितो. ज्यास असा निश्चय नाहीं तो ब्रह्मरूप असतां ही अज्ञानी ह्मणवितो. तस्मात् ब्रह्मस्वरूप जे ज्ञानी ते आपल्या बुद्धीनें कांहीं करीत नाहींत. लोक मात्र त्यांच्या स्वरूपातें न जाणून नौकास्थ पुरुष जसे तीरस्थवृक्षांचे ठायीं नौकागतचंचल-तेचा आरोप करीत आहेत, त्या प्रकारें कर्तृत्व, भोक्तृत्वा-दिकांचा ज्ञान्यावर आरोप करीत आहेत.

शंका—दृष्टान्ता मध्यें नौकेंत बसले जे पुरुष त्यास नौका चालत असतांना वृक्ष चालतात, असा भास होतो. तसें इकडे दार्ष्टान्ता मध्यें किंनिष्ठ कर्तृत्वादिव्यापारांतें को-णाचे ठायीं कोण पाहतात?

समाधान—ज्ञान्याचा जो संघात तन्निष्ठकर्तृत्वादिक जें त्यातें, आत्मस्वरूपातें न जाणून आत्मस्वरूपज्ञान्याचे ठायीं आरोप करून अज्ञानी जन जे ते ज्ञान्यानें च संपूर्ण व्यापार केले असें ह्मणतात. तस्मात् लोकदृष्ट्या ज्ञान्यांचे ठायीं

कर्तृत्वादिक आहेत. ज्ञानी आपल्या बुद्धीनें कांहीं एक करीत नाहीं. यास दृष्टान्त. जसें दुर्वास, श्रीकृष्णादिक हे लोकदृष्ट्या भोजनादि व्यापार करीत असतां ही ते आपल्या दृष्टीनें, कांहीं एक करीत नाहींत, त्यांला कर्तृत्वादिकांचा अभिमान जर असता तर गोपिकांस यमुनापार करून देण्या विषयीं 'आह्मी भोजन करून अभोक्ते आणि नाना प्रकारचें शुभाशुभ कर्म करून ही अकर्ते, जर असलों तर तुह्मांस यमुना मार्ग देईल, ह्मणून शपथ करून गोपींस त्यांनीं सांगितलें तें तसें सांगितलें नसतें. तस्मात् ते ज्ञानी आपल्या बुद्धीनें कांहीं करीत नाहींत. गीतेंत ही भगवंतांनीं 'नायं हंतिनहन्यते' ( भ०गी०॥२।१९ ) या श्लोकाचे ठायीं, ज्ञान्याचे ठायीं अकर्तृत्वादिक च दाखविलें आहे.

शंका—हे गुरो, अज्ञान्या प्रमाणें ज्ञानी जर व्यापारें करील तर मग ज्ञानी व अज्ञानी यांत वैलक्षण्य काय ?

समा०—ज्या बाईचा पुत्र नष्ट जाहला ती बाई व तिची शेजारीण दोघी रोदन करित असतात. दोघींचें रोदन लोकांत सारखें च दिसत असतां ही जसें त्या रोदनांत वैलक्षण्य आहे, तसें ज्ञानी व अज्ञानी या दोघांचें व्यवहारांत ही वैलक्षण्य आहे. कोणतें ह्मणशील तर जसें मुख्य बाईचें रोदन अंतःकरणा पासून आणि शेजारीणबाईचें रोदन तें वर वर. तसें अज्ञानाचा व्यवहार तो अध्यासपूर्वक आणि ज्ञान्याचा व्यवहार तो अध्यासरहित. हें च वैलक्षण्य जाणावें.

शंका—हे गुरो, अज्ञान्या प्रमाणें ज्ञान्याला ही त्या व्यवहारें करून विक्षेप होईल च. मग विक्षेप जाहल्यास ज्ञान होऊन तरी काय फल?

समाधान—हा देह पडल्या वर पुढें जन्ममरणादिक विक्षेप प्राप्त होणार, त्यांची निवृत्ति होणें, व पुनः जन्म च न प्राप्त होणें, हें च ज्ञानाचें फळ होय.

शंका—हे गुरो, तर देहपाता नंतर त्यांस ज्ञानी ह्मणूं नये. कां जर ह्मणाल तर, जसें, अज्ञान्याला क्षुधातृषादि विक्षेप होतात, त्या प्रकारें त्या ज्ञान्याला ही क्षुधातृषादि विक्षेप होतात. मग या जन्मीं त्यांस ज्ञान होऊन अधिक तें काय?

समा०—अज्ञानी जे, ते देहेंद्रियादिसंघातानें कांहीं एक शुभाशुभ कर्म केलें असतां, अविवेकानें त्या संघाताच्या ठायीं तादात्म्यबुद्धी करून आह्मीं च हें कर्म केलें, आह्मीं च हें कर्म केलें, असें आपणास कर्माचें कर्तृत्व मानून घेतात व त्याचें जन्ममरणादि फल भोगितात. ज्ञानी जो तो त्या देहेंद्रियादिसंघातानें, शुभाशुभ कर्म केलें असतां, मीं कांहीं एक करीत नाहीं, केवल दीपवत् साक्षी, प्रकाशक मात्र आहें; या संपूर्ण कर्मांचा देहेंद्रियादिसंघात कर्ता आहे, असें मानितोहे. या स्तव तो जन्ममरणादिरूपकर्मफळातें ही भोगीत नाहीं. गीतेंत ही भगवंतांनीं 'पश्यन्शृण्वन्' (भ० गी० ॥ ५।८॥) या श्लोकाचे ठायीं हा प्रकार सांगितला आहे.

शंका—हे गुरो, हा ज्ञान्याचा अभिप्राय व हा अज्ञान्याचा अभिप्राय हें अविवेकी लोकांस कांहीं कळत नाहीं. तस्मात् ते अविवेकी जन जे ते अज्ञान्या प्रमाणें ज्ञान्याचा स्नानपानादि व्यवहार पाहून निंदा करितील. त्या निंदे करून ज्ञान्यास वारंवार विक्षेप होईल. या स्तव ज्ञान्यानें व्यवहार टाकून पाषाणा सारखी जडवृत्ति धारण करावी. तसें ते कां करीत नाहींत?

समा०—यास दृष्टान्त. जसें फाल्गुनमासीं बाल जे ते स्त्रियांस पाहून नाना प्रकारची वल्गना करितात. त्यांत जी कोणी साध्वी पतिव्रता स्त्री, तिच्या स्वरूपातें न जाणून ते बालक तिला लक्षून वल्गना करितात. त्या बालांच्या वल्गने करून तिच्या पातिव्रत्याची हानि ही नाहीं. आणि हे बालक मूर्ख अविवेकी आहेत असें समजून तीस विक्षेप ही होत नाहीं. त्या बालकां वर राग ही करीत नाहीं. व द्वेष हो करीत नाहीं. उदासीन असते. आणि त्या बालकांच्या भीती स्तव पतिशुश्रूषार्थ जलाहरणादि जो व्यापार त्या व्यापारातें टाकीत ही नाहीं. तसें लोकनिंदे करून ज्ञान्याचा मोक्ष ही बुडत नाहीं. हे अज्ञानी, मूढ आहेत असें समजून ज्ञान्याला विक्षेप ही होत नाहीं. आणि त्या लोकनिंदेच्या भीती स्तव ज्ञानी जडवृत्ति ही धारण करित नाहीं. लोकनिंदेची ज्यास भीति आहे व स्तुतीची ज्यांस अपेक्षा आहे, तो देहात्मवादी जाणावा.

शंका—हे गुरो, ज्ञानी, लोकनिंदेच्या भीती स्तव जडवृत्ति धारण न करो, परंतु आपल्या अंतःकरणांत विक्षेप न होण्या विषयीं, व सुख प्राप्त होण्या विषयीं ज्ञान्यानें सर्वकाळ समाधि करावी, ती कां करींत नाहीं ?

समाधान—यावज्जीव सर्वकाळ समाधि होणें हें ब्रह्मादिकांस ही घडत नाहीं. तेव्हां साधारण जीवांची कथा काय ?

शंका—अस्तु. यावज्जीव सर्वकाळ न घडो, तथापि मध्यें मध्यें दिवसांत दोन चार सहा घटिका तरी त्यानें समाधीचा अभ्यास ठेवावा. तो कां ठेवींत नाहीं ?

समाधान—जावत्काल अंतःकरण समाधींत आहे, तावत्काल मात्र विक्षेप नाहीं, सुख आहे. समाधी पासून उत्थित होतां च पुनः पूर्ववत् क्षुधादिरूप विक्षेप होईल च. मग समाधि करून तरी काय ?

शंका—हे गुरो, समाधिकालीं विक्षेप नाहीं. उत्थित कालीं विक्षेप. तेव्हां मध्यें मध्यें विक्षेपाची विरलता होऊन अल्प विक्षेप होतील. व या करितां समाधि करावा, हें बरें.

समाधान—ज्यास विक्षेप सहन होत नाहीं त्यानें यथेच्छ समाधि करावा. त्यांत आमचा आग्रह नाहीं. परंतु ज्यास समाधि करण्याची इच्छा आहे त्यास दृढ ज्ञान च नाहीं. यावत्काल कर्तृत्वबुद्धि तावत्काल दृढ ज्ञान च नाहीं, हा शास्त्राचा सिद्धान्त आहे.

शंका—दृढ ज्ञानाचें काय स्वरूप ?

समाधान—जसा मनुष्यास मी स्त्री, मी पुरुष, मी अमुक, हा दृढ निश्चय आहे, तसा स्वगतादिभेदशून्य, देशकालवस्तुपरिच्छेदशून्य जें ब्रह्म तें ब्रह्म मी च असा जो निश्चय होणें, पुनः मी ब्रह्म आहें किंवा नाहीं असा संशय न उत्पन्न होणें हें दृढ ज्ञान होय.

## ब्रह्म स्वगतादिभेदत्रयरहित आहे.

शंका—हे गुरो, ब्रह्म स्वगतादिभेदशून्य, देशकालवस्तुपरिच्छेदशून्य तें कसें ?

समाधान—हे शिष्य, जसे पदार्थमात्राचे ठायीं स्वगत, सजातीय, आणि विजातीय, असे तीन तीन भेद आहेत; तसे ब्रह्माचे ठायीं स्वगतादिभेदत्रय नाहीं. पदार्थमात्रीं स्वगतादिभेदत्रय कसें तें सांगतों. एका वृक्षाचे ठायीं तीनी भेद दाखवितों. त्याज वरून सर्वत्र दृश्यमात्राचे ठायीं भेदत्रय जाणावें. वृक्षाचे पत्र, पुष्प, फल, शाखादिक जे अवयव, त्यांचा परस्परें जो भेद ह्मणजे जेथें पत्र आहे तेथें पुष्प नाहीं, जेथें पुष्प आहे तेथें फल नाहीं, फल तेथें शाखा नाहीं, शाखा तेथें फल नाहीं, असा जो वृक्षाच्या अवयवांचा भेद तो वृक्षाचे ठायीं स्वगतभेद जाणावा. आतां सजातीय भेद सांगतों. हा एक आम्रवृक्ष, आणि एतत्सजातीय

दुसरा जो आम्रवृक्ष त्यां मध्यें, त्या वृक्षाचा भेद या वृक्षा वर, आणि या वृक्षाचा भेद त्या वृक्षा वर, असा परस्पर वृक्षांचे ठायीं सजातीय भेद जाणावा. विजातीयभेद सांगतों. वृक्षा हून शिला भिन्न. त्या शिले वर शिलात्वजाति व वृक्षा वर वृक्षत्वजाति या प्रकारें दोघांची जाति वेगवेगळी असतांना जो शिलेचा भेद वृक्षा वर व वृक्षाचा भेद शिले वर हा विजातीय भेद जाणावा. जसें स्वगतादिभेदत्रय वृक्षा वर, आहे, असें च दृश्यमात्राचे ठायीं स्वगतादिभेदत्रय जाणावें.

हें स्वगतादिभेदत्रय ब्रह्मस्वरूपीं कां नाहीं हें ही सांगतों. जसा वृक्ष सावयव तसें ब्रह्म जर सावयव असतें तर स्वगत भेद प्राप्त होता. ब्रह्म निरवयव आहे. या स्तव ब्रह्माचे ठायीं स्वगतभेद नाहीं. जसा हा वृक्ष वेगळा, तो वृक्ष वेगळा; तसीं दोन ब्रह्में जर असतीं तर त्या ब्रह्माचा या ब्रह्मा वर व या ब्रह्माचा त्या ब्रह्मा वर भेद प्राप्त होऊन सजातीयभेद प्राप्त होता. पण ब्रह्म तर एक च आहे.

शंका—हे गुरो, ब्रह्म तर चेतनस्वरूप आहे. व तीं दोन दिसतात. एक आत्मचेतन आणि एक ब्रह्मचेतन. असे दोन चेतन असतांना मग परस्पर भेद प्राप्त होऊन ब्रह्माचे ठायीं सजातीय भेद कां प्राप्त होणार नाहीं?

समा०—इतका उपदेश, जीवचैतन्य वेगळें, व ब्रह्मचैतन्य वेगळें, ही भेदबुद्धि दूर होण्या विषयीं केला असतां ही, पुनः जीवब्रह्मविषयकभेदबुद्धि तुला उत्पन्न होतये. हें

मला मोठें आश्चर्य वाटत आहे. जसें संपूर्ण रामायण ऐकून रामाची सीता कोण? हें जसें विचारणें उपहासास्पद त्या च प्रमाणें हा तुझा प्रश्न उपहासाला कारण जाहला.

प्र०—हे गुरो, मी कांहीं तसा न जाणून प्रश्न करीत नाहीं. जीवब्रह्मांचा भेद नाहीं, अभेद आहे, हें जाणून ही पुनः ज्ञानदार्ढ्यार्थ प्रश्न करितों हें.

उत्तर—हे शिष्य, जीवब्रह्मांचा उपाधिद्वारा भेद असतां ही स्वरूपतः भेद नाहीं. जसें, घटाकाशाचा, व महदाकाशाचा, घटा मुळें भेद असतांना ही स्वरूपतः भेद नाहीं. आणि आत्मचैतन्य भिन्न जाहल्यास ब्रह्मास परिच्छिन्नता प्राप्त होऊन अनित्यत्व प्राप्त होईल. या स्तव ही आत्म्या हून ब्रह्मचैतन्य भिन्न नाहीं. आत्मा ब्रह्मा हून भिन्न जाहल्यास देहाच्या आंत मात्र आत्मा आहे, बाहेर नाहीं असें होईल. व असें जाहल्यास देहाचे आंत उत्पन्न होणारे कामक्रोधादिक त्यांचें मात्र भान होईल. बाहेर जे घटादि पदार्थ त्यांचें भान होणार नाहीं. आपणास तर आंतल्या वृत्त्यादिकांचें व बाहेरील घटपटादि सर्व पदार्थांचें भान आहे. या कारणा स्तव आंत व बाहेर ज्ञानस्वरूपें करून सर्वांत राहून सर्वांस भासवितों. या कारणा स्तव आपण व्यापक आहों. ह्मणून ब्रह्म च आहों. तस्मात् ब्रह्म एक च. या हेतू स्तव ब्रह्माचे ठायीं सजातीयभेद प्राप्त होत नाहीं.

शंका—हे गुरो, आत्मा व ब्रह्म एक च. या कारणा स्तव सजातीय भेद प्राप्त न होवो, परंतु ब्रह्म हें द्रष्टृ व जगत्

दृश्य या प्रकारें ब्रह्म हून वेगळें विजातीय ब्रह्म असतांना मग ब्रह्माचे ठायीं विजातीयभेद कां नाहीं प्राप्त होणार?

समा०—ब्रह्म जें तें सद्रूप. त्या, हून भिन्न जें जगत् तें असत्. असत् ह्मणजे मिथ्या. तें मुळीं च नाहीं. त्याचा भेद ब्रह्मा वर कोठून प्राप्त होणार?

शंका—हे गुरो, जगत् असत् जर असतें तर दिसतें कां?

समा०—अरे, गारोड्यानें उत्पन्न केलेले पदार्थ दिसतील. ह्मणून ते काय सिद्ध होतील? तसें दिसलें ह्मणून जगत् काय सत्य मानावें?

शंका—ते पदार्थ गारोड्याच्या मंत्रानें भासतात. तसें हें जगत् कशानें भासतें?

समा०—हे शिष्य, हें जगत् परमात्म्याचे मायेनें भासत आहे.

शंका—हे गुरो, गारोड्याचा मंत्र तर गारोड्याचे मनांत असतो. तशी परमात्म्याची माया कोठें असते.

समाधान—हे शिष्य, परमात्म्याची माया परमात्म्याचे ठायीं च असते.

शंका—हे गुरो, परमात्म्याचे ठायीं माया असल्यास मग परमात्मा वेगळा व माया वेगळी झाली. या स्तव पुनः परमात्म्याचे ठायीं विजातीयभेद प्राप्त जाहला. हें कसें?

समाधान—हे शिष्य, ती माया परब्रह्मा हून वेगळी होईल तर असद्रूप होईल. जी असद्रूप ती मिथ्या. मग

तिचा भेद ब्रह्मा वर कोठून होईल? बरें, ती माया परमात्म्या हून भिन्न नाहीं ह्मणशील तर परमात्मरूप च जाली. मग माया च नाहीं. तिचा भेद ब्रह्मा वर कोठून प्राप्त होणार?

शंका—हे गुरो, माया ब्रह्मा हून अभिन्न ह्मटल्यास ब्रह्मरूप च जाहली. तेव्हां माया सद्रूप नाहीं. व असद्रूप ही नाहीं. तर मायेचें स्वरूप तरी कसें आहे?

समाधान—हे शिष्य, अर्थात् सद्रूप ह्मणण्या विषयीं किंवा असद्रूप ह्मणण्या विषयीं अयोग्य जेव्हां जाहली तेव्हां सदसद्विलक्षणे, अनिर्वचनीय माया जाहली. अनिर्वचनीय ह्मणंजे आहे किंवा नाहीं, ह्मणण्या विषयीं ज्या काळीं अयोग्य, त्या काळीं त्या मायेच्या योगानें ब्रह्माचे ठायीं विजातीयभेद कोठून प्राप्त होणार?

---

## जगत्कारण व मायास्वरूप.

शंका—हे गुरो, माया जर अनिर्वचनीय असती तर त्या माये पासून हें जगत् कसें उत्पन्न होतें?

समा०—हे शिष्य, जगत् उत्पन्न जाहलें ह्मणून माया अनिर्वचनीय असी समजली. जगत् न उत्पन्न जाहल्यास मायेची च सिद्धि होणार नाहीं. कशी तें सांगतों. या जगताचें कारण जें तें आत्म्या सारखें सत्य ह्मणावें तर कारणास मग सत्यत्व कसें राहील? कां जर ह्मणाल तर जें सत्य तें

निर्विकार असताहे. जगत्कारण तरी जगदाकारें करून विकारातें पावताहे. जें विकारी तें नाशवंत दिसताहे. मग तें जगत्कारण विकारी असून सत्य कसें होईल? अथवा वंध्यापुत्रवत् तें जगत्कारण मिथ्या ह्मणावें तर मग त्या पासून जगत् कसें. उत्पन्न होईल? या स्तव तें जगत्कारण मिथ्या ह्मणतां येत नाहीं. आणि सत्य ही ह्मणतां येत नाहीं. तस्मात् तें जगत्कारण सत्य किंवा मिथ्या यां हून विलक्षण आहे. अर्थात् तें जगत्कारण अनिर्वचनीय सिद्ध जाहलें.

शंका—हे गुरो, ब्रह्म ही शब्दादिप्रमाणांस अविषय, या स्तव तें ही अनिर्वचनीय आहे. मग त्या ब्रह्मास ही जगत्कारणत्व प्राप्त होऊन, विकारित्व प्राप्त होऊन, अनित्यत्व प्राप्त होईल किंवा नाहीं?

समा०—हे शिष्य, माया जगत्कारण अनिर्वचनीय असतां ही प्रमाणजन्यविचारें करून बाधित होत्ये. ब्रह्म जें तें अनिर्वचनीय असून ही प्रमाणजन्यविचारें करून बाधित होत नाहीं या स्तव ब्रह्म कांहीं. जगत्कारण नव्हे.

शंका—हे गुरो, जगताच्या पूर्वीं सच्चिदानंदस्वरूप एक ब्रह्म मात्र आहे. असें श्रुतींत ऐकिलें आहे ब्रह्म जगत्कारण नाहीं. ह्मणतां तर मग जगत्कारण कोण होईल? कारणा वांचून तर कार्य उत्पन्न होत नाहीं. तस्मात् कारण कोणी एक कल्पिलें पाहिजे कीं नको?

समाधान—अशी कल्पना करावी कीं ब्रह्म निरवयव आणि निर्विकार आहे. या स्तव ब्रह्मास कारणत्व संभवत नाहीं. तेव्हां जसी अग्नीच्या ठायीं स्फोटादिरूपकार्यातें उत्पन्न करणारी दाहकशक्ति आहे, तसी जगतातें उत्पन्न करणारी ब्रह्माचे ठायीं ही कोणी एक शक्ति आहे, अशी कल्पना करावी. ती शक्ति अग्नीचे दाहकशक्ती प्रमाणें अनिर्वचनीय आहे. अग्नीची शक्ति अनिर्वचनीय कशीं तीं सांगतों. „ दाहकशक्ति अग्नी हून भिन्न ह्मणावी तर अग्नीला टाकून अन्यत्र दिसत नाहीं. अग्निस्वरूप च ह्मणावी तर प्रत्यक्ष अंगारादिस्वरूप अग्नि असतां ही शक्तीला प्रतिबंध करणाऱ्या मणिमंत्रादि ओषधींचा संयोग जाहला असतां मग खुशाल अग्नी वर चाललें तरी पाय भाजत नाहीं. पुनः मणिमंत्रादि प्रतिबंधक दूर केल्यास पाय भाजतात. या स्तव ती शक्ति अग्नी हून भिन्न नाहीं. तस्मात् ती अग्नीची दाहक शक्ति अग्नी हून भिन्न किंवा अभिन्न ह्मणण्या विषयीं अयोग्य. ह्मणून अनिर्वचनीय जाणावी. तशी ब्रह्माची मायानामक शक्ति ही ब्रह्मा हून भिन्न किंवा अभिन्न ह्मणण्या विषयीं अयोग्य. या स्तव ती अनिर्वचनीय जाणावी. अनिर्वचनीय आहे या स्तव त्या शक्तीस माया हें नाम व अविद्या हें नाम प्राप्त जाहलें. माया कां ह्मणावी ह्मणाल तर ‘ मया प्रमया यातीति माया ’ ह्मणजे प्रमाणजन्यज्ञानें करून नष्ट होत्ये ह्मणून माया ह्मणावी. कालत्रयीं नाहीं च ह्मणून अविद्या ह्मणावी. तस्मात् जगदु-

त्पत्ती करून ब्रह्मस्वरूपाचे ठायीं अनिर्वचनीय मायाशक्ति कल्पिजेली. तेव्हां या कल्पितमायेच्या योगानें, अथवा माये पासून उत्पन्न जाहलेल्या मायिक जगताच्या योगानें ब्रह्माचे ठायीं विजातीय भेद कोठून प्राप्त होणार? तस्मात् ब्रह्म स्वगतसजातीयविजातीयभेदरहित हें सिद्ध जाहलें.

## दिग्देशकालें करून ब्रह्म अपरिच्छिन्न आहे.

तसें च देशें करून, कालें करून, व वस्तू करून ही परिच्छिन्न नाहीं. ब्रह्मा हून अन्य जें कांहीं दृश्यमात्र तें देशकालवस्तू करून परिच्छिन्न आहे. कसें तें सांगतों. इंद्र जो तो स्वर्गांत आहे. पातालांत नाहीं. ह्मटल्यास तो इंद्र स्वर्गें करून परिच्छिन्न जाहला. एका ब्रह्मदेवाच्या दिवसांत च चवदा ×मनु व चवदा इंद्र होतात. त्यांत विद्यमानकालीं वैवस्वतमनु आहे. हा मनु स्वायंभुवमन्वंतरांत नव्हता. तेव्हां हा मनु या कालें करून परिच्छिन्न जाहला. तसा च हा इंद्र या कालें करून परिच्छिन्न जाणावा. तसा च हा

---

× १ स्वायंभुव. २ स्वारोचिष. ३ उत्तम. ४ तामस. ५ रैवत. ६ चाक्षुष. ७ वैवस्वत. ८ सावर्णि. ९ दक्षसावर्णि. १० ब्रह्मसावर्णि. ११ धर्मसावर्णि. १२ रुद्रसावर्णि. १३ देवसावर्णि. १४ इन्द्रसावर्णि.

इंद्र वें हा मनु अग्निसूर्यादिकां पासून वेगळा. या कारणा स्तव वस्तू करून परिच्छिन्न जाहला. या च प्रकारें संपूर्ण पदार्थमात्र देशें करून, कालें करून व वस्तू करून परिच्छिन्न आहेत. ब्रह्म मात्र देशादिकें करून परिच्छिन्न नाहीं. कां जर ह्मणाल तर, देशादिक अवघे माये करून ब्रह्माचे ठायीं कल्पित आहेत. या स्तव ब्रह्म सर्व देशांत व्यापून आहे. ह्मणून देशें करून परिच्छिन्न नाहीं. सर्वांचें अधिष्ठान ब्रह्म आहे. या स्तव सर्व कालीं आहे. ह्मणून कालें करून परिच्छिन्न नाहीं. कल्पितपदार्थांचें अधिष्ठानभूत ब्रह्मस्वरूप च आहे. या स्तव वस्तू करून ही परिच्छिन्न नाहीं. तस्मात् देशकालवस्तुपरिच्छेदशून्य ब्रह्म सिद्ध जाहलें.

शंका—हे गुरो, ब्रह्म सर्व देशांत, सर्व कालांत, व सर्व वस्तूंत व्यापून आहे ह्मणतां. तर तें ब्रह्म जगतांत कोणत्या रूपें करून व्यापून आहे? व जगताचें आणि मायेचें स्वरूप तें कोणतें? हें सांगावें.

समा०—पदार्थमात्राचे ठायीं अस्तित्व, भातित्व व प्रियत्व हें ब्रह्माचें स्वरूप; नास्तित्व, नभातित्व, आणि अप्रियत्व हें मायेचें स्वरूप; आणि नाम, रूप, क्रिया, हें जगत्स्वरूप. आतां एका पदार्थाचे ठायीं हें स्पष्ट दाखवितों. त्याज वरून सर्वत्र जाणावें. ‘घटोऽस्ति’ ह्मणजे घट आहे. ‘घटोभाति’ ह्मणजे घट भासतोहे. ‘घटः प्रियः’, ह्मणजे घट प्रिय आहे. असें घटाचे ठायीं अस्तित्व, भा-

स्तित्व आणि प्रियत्वं हें च ब्रह्म जाणावें. आणि 'घटो नास्ति' ह्मणजे घट नाहीं, 'घटो न भाति' ह्मणजे घट भासत नाहीं आणि 'घटो न प्रियः' ह्मणजे घट कांहीं प्रिय नाहीं; या प्रमाणें नास्तित्व, नभातित्व, व अप्रियत्व जें घटाचे ठायीं भासताहे तें असत्, जड, व दुःख भासताहे. हें मायेचें स्वरूप जाणावें. आणि घट हें घटाचें नाम, वर्तुलत्वादि हें रूप ह्मणजे आकार, व जलाहरण ही क्रिया; हें घटाचें स्वरूप. या नामरूपक्रियेस घट ह्मणावें. हें च जगत्स्वरूप होय. तस्मात् पदार्थमात्राचे ठायीं अस्तित्व, भातित्व, आणि प्रियत्व, हें ब्रह्म होय. नास्तित्व, नभातित्व, आणि अप्रियत्व ही माया होय. व नाम, रूप, आणि क्रिया हें जगत् होय.

त्यांत अस्तित्व, भातित्व, आणि प्रियत्व हें मुंगी पासून ब्रह्मदेवा पर्यंत एक च आहे. यास दृष्टान्त. जसा हलवाई साखरेचीं उंच नीच अनेक चित्रें करितो. पण त्या संपूर्ण चित्रांत साखर एक च आहे. त्या साखरेच्या गोडीनें चित्र गोड आहे. व त्या साखरेच्या शुभ्रतेनें चित्र शुभ्र आहे. त्या चित्रांतील साखर काढिली असतां मग चित्र च नाहीं. तस्मात् तें चित्र अवघें साखरे मध्यें कल्पित जाणावें. तसें च पदार्थमात्रीं अनुस्यूत अस्तिभातिप्रियस्वरूप जें ब्रह्म त्या ब्रह्माच्या अस्तित्वानें पदार्थ आहेत असे वाटतात. ब्रह्माच्या भातित्वानें पदार्थ अवघे स्फुरतात. व ब्रह्माच्या प्रियत्वानें, आनंदरूप ह्मणजे प्रिय दिसतात. तें

अस्तिभातिप्रियरूप ब्रह्म वेगळें केलें असतां पदार्थमात्रास नास्तित्व, नभातित्व आणि अप्रियत्व प्राप्त होताहे. तस्मात् ब्रह्म सर्वांचें अधिष्ठान, सर्वांस सत्यत्व देणारें, भासविणारें आणि आनंद करणारें आहे. तस्मात् या पदार्थमात्रांत सच्चिदानंदस्वरूप ब्रह्म च सार आहे. अन्य दृश्य अवघें असार व मिथ्या जाणावें. व हें दृश्यमात्र ब्रह्माचे ठायीं कल्पित जाणावें. स्वप्नवत् हें दृश्य अनिर्वचनीय जाणावें.

## स्वप्ना मध्यें भासमानजगताचें स्वरूप.

शंका—हे गुरो, स्वप्न अनिर्वचनीय कसें?

समा०—स्वप्नांत भासणारे जे कांहीं गजतुरगादिक आणि अवंतिकेंत शयन करून स्वप्नांत जें कांहीं, काशीरामेश्वरादिक, पाहिलें हें सत्य किंवा मिथ्या? आणि बाहेरले गजादिक स्वप्नांत भासतात किंवा देहांत च उत्पन्न होऊन भासतात? बाहेरले पदार्थ भासतात ह्मणावें, तर स्वप्न नाडी मध्यें भासताहे. तेव्हां बालाग्रा प्रमाणें सूक्ष्म नाडींत गजतुरगादिक पदार्थ मावतील कसे? आणि एकमुहूर्तमात्र पुरुष निद्रित असतो. त्या मुहूर्तमात्रांत सहा महिन्यांचे वाटे वरचा रामेश्वर आणि काशी त्यां प्रति एका मुहूर्तांत जाऊन पाहून, पुनः माघारा येतो कसा? आणि काशीमार्गांत ते चोर पाठी मागें लागले असतां हा देह कांपतो कां? तस्मात् बाहेरले पदार्थ कांहीं स्वप्नांत दिसत नाहींत. नाडीच्या

आंत उत्पन्न होतात ह्मणावे तर आंत मध्यें उत्पन्न होण्याची सामग्री नसतांना असे मोठे मोठे पदार्थ कसे उत्पन्न होतील? तस्मात् स्वप्नांत पदार्थ नसतांना केवळ स्वप्नद्रष्ट्याच्या अविद्येनें भासताहेत. या स्तव स्वप्नपदार्थ मायिक होत. आणि स्वप्नांतले पदार्थ सत्य ह्मणावे तर जागृतींत भासत नाहींत. मिथ्या ह्मणावे तर स्वप्नांत भासतात. या स्तव अनिर्वचनीय जाणावे.

---

## जागृतींत दृश्यमान जगताचें स्वरूप.

तसें च जागृतींतले पदार्थ स्वप्नांत नसतात. आणि जागृतींत पुनः भासतात. तस्मात् हें दृश्यमात्र ही स्वप्नवत् मिथ्या होय. जसें मरुभूमीच्या ठायीं मृगजलाचा भ्रम, व रज्जू वर सर्पाचा भ्रम, तसा, सच्चिदानंदब्रह्मस्वरूपीं संपूर्ण जगत् भ्रमानें भासताहे. विचार केल्यास एक ब्रह्म च आहे. काळत्रयीं जगत् उत्पन्न जाहलें च नाहीं.

---

## भ्रम कोणास होतो?

शंका—हे गुरो, हा अवघा भ्रम आहे ह्मणतां. परंतु भ्रम तरी कोणास जाहला? हें सांगावें.

समा०—हे शिष्य, तूं जो प्रश्न करितोस हा भ्रमातें पाहून

करितोस किंवा न पाहून? न पाहून ह्मणशील तर तूं भ्रमातें पाहिलें-च नाहीं. मग प्रश्न काय करितोस? भ्रमातें पाहून ह्मणशील तर आपल्या हून अन्यत्र भ्रमातें पाहिलें किंवा आपल्या ठायीं? आपल्या हून अन्यत्र ह्मणशील तर तूं तरी सद्रूप. तुझ्या हून अन्य तें असत्. अर्थात्. तें मुळीं च नाहीं. तेथें भ्रम कसा पाहशील? मी आपल्या ठायीं भ्रम पाहिला ह्मणशील, तर भ्रमातें पाहणारा तूं कोण आहेस? मी मला जाणत नाहीं ह्मणशील, तर तुला तुझ्या स्वरूपाचें ज्ञान नाहीं. मग तर तूं अज्ञानी आहेस. तस्मात् अज्ञानी जो तूं त्या तुला आपल्या ठायीं कर्तृत्वभोक्तृत्वादि भ्रम दिसताहे. तेव्हां अज्ञान्यास भ्रम जाहला. हें अर्थात सिद्ध होताहे.

---

# भ्रमनिरसन.

शंका—हे गुरो, माझ्या ठायीं माझ्या स्वरूपाचें अज्ञान तरी कसें राहिलें?

समा०—हे शिष्य, तुझ्या स्वरूपाचे ठायीं अज्ञान राहण्या विषयीं विरोध काय तो सांग. विरोध भासल्या वांचून माझ्या ठायीं अज्ञान कसें राहील ही शंका च उत्पन्न होणार नाहीं. तुला शंका उत्पन्न होतीहे, या स्तव विरोध भासताहे. विरोध भासणें हें आपले अज्ञानाचें स्वरूप

समजल्या वांचून होणार नाहीं. तस्मात् तुला आपल्या स्वरूपाचें ज्ञान आहे असें वाटताहे.

शंका—हे गुरो, मी कोण हें मला समजत नाहीं. हें जें माझ्या स्वरूपाचें अज्ञान तें मला असतांना, तुला तुझ्या स्वरूपाचें ज्ञान आहे असें आपण कां ह्मणतां?

गुरु—हे शिष्य, तुला तुझ्या स्वरूपाचें अज्ञान भासताहे किंवा नाहीं भासत?

शिष्य—हे गुरो, अज्ञान नाहीं भासत कसें ह्मणावें? अज्ञान तर मला भासताहे.

गु०—हे शिष्य, अज्ञानाचा भासक तूं घटवत् जडस्वरूप आहेस किंवा ज्ञानस्वरूप आहेस?

शि०—हे गुरो, मी घटवत् जड असतों तर अज्ञानातें जाणतों कसा? मी तर अज्ञानातें जाणतों. या स्तव मी ज्ञानस्वरूप आहें.

गु०—हें तुझें स्वरूपभूत जें ज्ञान तें सविकार आहे किंवा निर्विकार आहे?

शि०—हे गुरो, सुषुप्तींत अज्ञानातें जाणणारें जें ज्ञान तें माझें स्वरूप होय सुषुप्तीचें साक्षिभूत जें ज्ञान त्या ज्ञानाचे ठायीं तरी कर्तृत्वभोक्तृत्वसुखदुःखादिक कांहीं विकार दिसत नाहींत. या स्तव तें ज्ञान निर्विकार च होय.

गु०—हे शिष्य, मी निर्विकारज्ञानस्वरूप आहें, हें तुला समजलें किंवा नाहीं?

शि०—हे गुरो, मी निर्विकारज्ञानस्वरूप हें मला समजलें.

परंतु मी ब्रह्म कसा, हें मला स्पष्ट समजलें नाहीं.

गु०—हे शिष्य, ज्ञानस्वरूप तूं, देहाचे आंत जे कामक्रोधादिक त्यांला च जाणताहेस किंवा बाहेरले जे घटपटादिक त्यांतें ही जाणतोहेस?

शि०—हे गुरो, मी देहाच्या आंत कामक्रोधादिक व देहाचे बाहेर घटपटादिक दृश्यमात्र सर्व जाणतों कसें जाणतों ह्मणाल तर कामक्रोधादिकांतें प्रत्यक्ष साक्षित्वें करून व देहघटपटादिकांतें चक्षुरादिइंद्रियरूपप्रत्यक्षप्रमाणद्वारा, कोणी एका पदार्थांतें अनुमानद्वारा, कोणा एका पदार्थातें शब्दप्रमाणद्वारा, कोणा एकातें उपमानद्वारा, असें षड्विध प्रमाण, अर्थापत्ति व अनुपलब्धी सहित एतद्वारा संपूर्ण दृश्यमात्रातें जाणतों.

गु०—हे शिष्य, तूं देहाच्या आंत जर असतास, व बाहेर नसतास, तर बाहेरल्या पदार्थांतें कसा जाणतास? ज्या अर्थी तूं ज्ञानस्वरूपें करून बाहेरल्या पदार्थांत राहून बाहेरल्या दृश्यमात्रातें षड्विधद्वारा जाणतोहेस, तस्मात् तूं व्यापक जाहलास. मग तूं ब्रह्म कसा नव्हेस?

शि०—हे गुरो, निर्विकारज्ञानस्वरूप ब्रह्म च मी. हा मला यथार्थ निश्चय जाहला.

गु०—हे शिष्य, आतां तुझें 'मी कोण आहें' हें अज्ञान गेलें किंवा नाहीं?

शि०—हे गुरो, आपल्या कृपेनें अज्ञान कोणी कडे गेलें हें दिसत च नाहीं.

गु०—हे शिष्य, मी देह, मी पुरुष, मी स्त्री, मी नपुंसक, मला च जन्ममरण, मी कर्ता, मी भोक्ता, मी ब्राह्मणक्षत्रियादिजातिमान्, मी सुखी, मी दुःखी, असे अनेक प्रकारचे विकार आपल्या ठायीं पाहत होतास, ते आतां आपल्या ठायीं पाहतोस किंवा नाहीं ?

शि०—हे गुरो, आतां माझ्या स्वरूपाचे ठायीं तर कांहीं एक विकार मला दिसत नाहीं. मी केवळ अकर्ता, अभोक्ता, सच्चिदानंदस्वरूप परमात्मा च आहें. मला जन्ममरणादिक कांहीं एक विकर नाहींत. हा दृढ निश्चय जाहला. आतां मी कोण हा भ्रम राहिला नाहीं. परंतु हे गुरो, मी ब्रह्म असें निश्चयात्मक ज्ञान होतां च अज्ञान नष्ट जाहलें असतां ही, अज्ञाना पासून उत्पन्न जाहले जे लिंगदेह व स्थूलदेह, आणि घटपटादि दृश्य पदार्थ ते कां भासतात ? हा मला संशय येतो.

गु०—हे शिष्य, तुला दृश्य पदार्थ भासले तरी सत्य भासतात किंवा मिथ्या भासतात ?

शि०—हे गुरो, सत्य ह्मणावे तरी क्षणांत नाहींतसे होतात. मिथ्या ह्मणावे तर दिसतात. तस्मात् हे पदार्थ अवघे अनिर्वचनीय वाटतात.

गु०—हे शिष्य, अनिर्वचनीय जेवढे पदार्थ ते सत्य किंवा मिथ्या ?

शि०—हे गुरो, सत्य किंवा मिथ्या ह्मणण्या विषयीं

अयोग्य ते च अनिर्वचनीय. मग आपण हे पदार्थ सत्य किंवा मिथ्या हें काय पुसतां?

गु०—हे शिष्य, दृश्यपदार्थांस मायिक ह्मणावें.

शि०—हे गुरो, मी च ब्रह्म असें ज्ञान होतां च त्या च काळीं अज्ञानस्वरूपी माया नष्ट जाहली. पुनः मायेचें कार्य जगत् कां दिसताहे हा च मला वारंवार संशय उत्पन्न होताहे.

गु०—हे शिष्य, ज्या काळीं अज्ञान नष्ट जाहलें त्या च काळीं अज्ञानाचें कार्य नष्ट जाहलें आहे. परंतु अनेक सृष्टींच्या ठायीं अनेक कल्पित अज्ञानावस्थेंत जगत् सत्य असें भासत होतें. आतां तें जगत, ज्ञानानें अज्ञान नष्ट होऊन नाहींसें जाहलें तरी त्या पूर्वींच्या अभ्यासा मुळें जगत् आहे असा भास होतो. यास दृष्टान्त सांगतों. कोणी एका स्थळीं महान् संग्राम होऊन तो संग्राम समाप्त जाहला असतां ही, दोन चार दिवस संग्राम होतो असा, आणि मारा मारा, हाणा हाणा, छिंधि छिंधि, भिंधि भिंधि, असा शब्द जाहल्याचे परी भास होतो. तसा च जगत् नसतांना जगताचा भास होतो.

शि०—हे गुरो, त्या संग्रामाचा भास दोन चार दिवस राहतो. हा जगताचा आभास तरी वर्षोवर्ष राहतोहे हें कसें?

गु०—हे शिष्य, आठ दहा दिवस संग्राम जाहलेला त्याचा आभास दोन चार दिवस असतो. हा जगताचा

अनुभव तर अनादिकाला पासून. तेव्हां याचा आभास कांहीं एक वर्षं असल्यास तुला आश्चर्य कां वाटतें ?

शि०—हे गुरो, हा जगताचा आभास तरी कोठ पर्यंत राहील ?

गु०—हे शिष्य, हा जगतांतला आभास तर चित्रांतल्या व्याघ्रा प्रमाणें असद्रूप असताना, मग तुला दुःखरूप कां वाटताहे ?

शि०—हे गुरो, मी तर असंग, सच्चिदानंदस्वरूप. मला दुःख कोठून होणार ? पण आपण जें सांगतां त्याला अनुसरून मी बोलतों. या जगदाभासाची अवधि कोठ पर्यंत ह्मणून ?

गु०—हे शिष्य, जों पर्यंत प्रारब्धकर्मांचा क्षय जाहला नाहीं, तों पर्यंत जगताचा आभास राहील. प्रारब्धकर्मांचा नाश होतां च व या देहाचें पतन होतां च मग लिंगदेहाचा घटस्फोट होऊन आत्मचैतन्य सर्वत्र राहताहे. त्या काळीं जगताचा भास ही राहत नाहीं. अद्वितीय ब्रह्म च राहताहे.

---

## भ्रमनिरासानंतर शिष्यानें केलेली सद्गुरूची प्रार्थना.

या प्रमाणें सद्गुरूनें श्रुतियुक्तिप्रमाणें करून शिष्यातें बो-

ध करितां च मग शिष्य जो तो निःसंदेह होत्साता कृतकृत्य होऊन सद्गुरूची प्रार्थना करितोहे. हे सद्गुरो, हे दयाळो, हे दीनानाथ, हे दीनबंधो, हे करुणानिधे, आज मी आपल्या कृपे करून कृतार्थ जाहलों. मी अद्वितीयब्रह्मस्वरूप च आहें. आतां कांहीं एक मला कर्तव्यता राहिली नाहीं. सर्वत्र मी च व्यापून राहिलों आहें हे गुरो, ज्या ब्रह्मादिकांची ईश्वरत्वबुद्धीनें पूर्वी मी आराधना करित होतों ते ब्रह्मादिक अवघे माझ्या ठायीं भिंती वरील चित्रां सारखे कल्पित भासतात. माझ्या सत्ते वांचून ब्रह्मादिकांस भिन्न सत्ता नाहीं. या स्तव सर्व मी च आहें. माझ्या वांचून भिन्न पदार्थ च नाहीं. हा माझा दृढ निश्चय झाला. व्यर्थ आज पर्यंत आपल्या स्वरूपास विसरून अनेकप्रकारचें दुःख अनुभविलें. हे गुरो, आपण मला सर्वदुःखां पासून मुक्त करून सच्चिदानंदस्वरूपब्रह्म च केलें. हे गुरो, तुमच्या उपकाराला उत्तीर्ण होण्या विषयीं द्वितीय पदार्थ च नाहीं. अवघे आपण च आहां. मला ही आपणा सारखें अद्वितीयब्रह्मस्वरूप केलें. आतां गुरुशिष्यभाव राहिला च नाहीं. परंतु ज्ञान जाहलें तरी गुरुसन्निध व ईश्वरा सन्निध नम्रीभाव ठेवावा. कदापि तेथें अभक्ति करूं नये. तेथें अभक्ति केल्यास कृतघ्नत्व प्राप्त होताहे. या प्रकारें शास्त्र सांगत आहे. त्या शास्त्रातें अनुसरून. अथवा मी तर विधिनिषेधातीत आहें या स्तव विधिकिंकरता मला नसतां ही लोकसंग्रहार्थें, अथवा गुरुशिष्यपरंपरा पुढें चालविण्या

विषयीं व्यवहारदृष्टीतें स्वीकारून आपल्या चरणकमलांस शतशः कोटिशः नमस्कार करितों. हे गुरो, धन्य तुह्मी. मी ही धन्य आहें. अध्यात्मशास्त्र ही धन्य. हें ब्रह्मज्ञान ही धन्य. अवघें च आज मला धन्य भासत आहे. या प्रकारें प्रार्थना करून सद्गुरू प्रति शिष्य जो तो साष्टांग नमस्कार करिता जाहला.

सद्गुरूचें शिष्यास प्रतिवचन—मग गुरु ह्मणतात. हे शिष्य, धन्य तुझें प्रारब्ध. तूं ही धन्य. तुझी माता धन्य. तुझा पिता धन्य. कां जर ह्मणशील तर ब्रह्मादिकांस ही दुर्लभ जें ज्ञान तें ज्ञान तुजला आज प्राप्त जाहलें. या स्तव तूं परम धन्य धन्य आहेस. ज्या कुळांत ब्रह्मवेत्ता होतो त्या कुळाचा उद्धार होतो, असें शास्त्रांत ऐकिलें आहे. तस्मात् तूं धन्य. ज्ञानसंपादन करून आपण ही मुक्त जाहलास. आपल्या कुळास ही मुक्त केलें. या स्तव तूं परम धन्य आहेस.

ब्रह्मविद्येचा प्रभाव—हे शिष्य, या च ज्ञानाचे प्रभावें करून ब्रह्मा-विष्णु-महेश्वर जे ते जगताच्या उत्पत्तिस्थितिनाशांतें करित होत्साते ही, आणि दुष्टांचा संहार व साधूचें पालन असें नाना प्रकारचें कर्म करित असतां ही केवळ अलिप्त होऊन नित्यमुक्त ह्मणवितात. या च ज्ञानाचे प्रभावें करून इंद्र, यम, अग्नि आदि करून आपआपल्या अधिकाराचे ठायीं राहत होत्साते अधिकारानुरूप शिक्षादंडनपालनादिरूप कर्म करीत होत्साते ही त्या कर्मीं करून अलिप्त होत्साते जीवन्मुक्त अग-

वितात. हे शिष्य, हें च ज्ञान साक्षात् नारायणादिकांनीं ब्रह्मदेवास, ब्रह्मदेवांनीं वसिष्ठास, वसिष्ठांनीं शक्तीस, शक्तीनें पराशरास, पराशरांनीं व्यासास, व्यासांनीं शुकास, शुकांनीं गौडपादाचार्यास, गौडपादाचार्यांनीं गोविंदपादाचार्यास, गोविंदपादाचार्यांनीं शंकराचार्यास, शंकराचार्यांनीं पादपद्माचार्य, हस्तामलकाचार्य, त्रोटकाचार्य व सुरेश्वराचार्य या शिष्यांस सांगितलें. तें च ज्ञान त्या सवधां पासून आपआपल्या गुरुमुखद्वारा या कालीं प्राप्त होतें जाहलें. तसें च युगान्तरीं हें च ज्ञान सूर्या पासून याज्ञवल्क्यास, याज्ञवल्क्या पासून जनकास, व याज्ञवल्क्याची स्त्री मैत्रेयी तीस ही प्राप्त जाहलें. आणि हें ज्ञान यमा पासून नचिकेतास, ब्रह्मदेवा पासून इंद्रास, इंद्रा पासून प्रतर्दनास, तसें च उद्दालका पासून श्वेतकेतूस, वरुणा पासून भृगूस, सनत्कुमारां पासून वामदेवास, अजातशत्रुराजा पासून बालाकी ब्राह्मणास, दध्यङ्अथर्व्या पासून अश्विनीकुमारांस; या प्रमाणें अनेकशिष्यांस हें च प्राप्त जाहलें. तसें च भगवद्गीतेंत ही भगवान श्रीकृष्णानें अर्जुना प्रति हें च ज्ञान सांगिलें. वसिष्ठांनीं रामा प्रत, रामचंद्रानें लक्ष्मणा प्रत हें च ज्ञान सांगितलें आहे.

या च ज्ञानें करून दत्तात्रेय, संवर्त्तक, कपिलमहामुनि आदि करून जीवन्मुक्त होत्साते वर्त्तताहेत. तस्मात्, हें ज्ञान तुज कारणें प्राप्त जाहलें, या कारणा स्तव तूं धन्य आहेस.

---

१ शक्ति हा वसिष्ठाचा पुत्र व शक्तीचा पुत्र पराशर.

## ब्रह्मनिष्ठ पुरुषांच्या कथा, संप्रदाय, वगैरे.

या प्रकारें गुरु शिष्यास अनुमोदन करितां च शिष्य ही आनंदा प्रति पावत होत्साता कांहीं एक इतिहास, ज्ञानाचा संप्रदाय, आणि माहात्म्य कळण्या विषयीं, पुसतो. हे गुरो, आपण पूर्वीं इंद्रप्रतर्दनाख्यायिका आणि अजातशत्रुबालाकीची आख्यायिका, तसें च ब्रह्मदेवांनीं विरोचनास सांगितलेलें ज्ञान ही आख्यायिका सांगितली. परंतु सूर्ययाज्ञवल्क्य व जनकमैत्रेयी, यांची कथा, दध्यङ्अथर्वा व अश्विनीकुमार यांचा संवाद, उद्दालकश्वेतकेतुसंवाद, वरुणभृगुसंवाद आणि सनत्कुमारनारदसंवाद हे इतिहास सांगितले नाहींत. या स्तव या ब्रह्मवेत्त्यांचे इतिहास संक्षेपें करून श्रवण करावे अशी इच्छा आहे. आपण कृपा करून सांगावे. अशी शिष्य प्रार्थना करितां च मग सद्गुरु सांगते जाहले.

---

## याज्ञवल्क्याची कथा.

हे शिष्य, श्रीवेदव्यासाचा वैशंपायननामक ऋषि शिष्य होता. त्या वैशंपायना जवळ अनेक विद्यार्थी विद्याभ्यास

करित होते. त्या विद्यार्थ्यांत याज्ञवल्क्यनामक एक विद्यार्थी वैशंपायनाचा शिष्य होता. असें असतांना कोणे एका प्रसंगा स्तव संपूर्ण ऋशींनीं संकेत केला कीं, सर्वऋशीं- नीं मेरुपर्वताच्या ठायीं एकत्र व्हावें. जो ऋषि येणार नाहीं त्यास ब्रह्महत्या घडेल. असा संकेत करून सर्वऋशीं- स पत्रें पाठविलीं. त्यांत वैशंपायनास ही पत्र आलें. वैशं- पायनाचा जाण्याचा विचार होता. परंतु कांहीं एका कारणा स्तव जाणें जाहलें नाहीं. तेव्हां त्यास ब्रह्महत्ये- चा दोष प्राप्त जाहला. त्या दोषाच्या निवृत्तीस प्रायश्चित करण्याचा विचार करूं लागला. त्या काळीं याज्ञवल्क्यानें प्रार्थना केली.

हे गुरो, आपण वृद्ध आहां. आपल्यानें प्रायश्चित्त होणार नाहीं. या स्तव या दोषाचे निवृती विषयीं मला आज्ञा करावी. मी प्रायश्चित्त करीन. तदनंतर गुरु कोपायमान होऊन ह्मणूं लागले. तुला मी सर्व कार्यांत समर्थ आहें असा अभिमान आहे. तुला अवघे तुच्छ भास- तात. तूं असा अभिमानी आहेस, तर माझ्या जवळ अधीत केलेला संपूर्ण वेद टाकून दे. असें ह्मणतां च याज्ञवल्क्य ही अल्पवयस्क होता, या मुळें त्यानें तत्काळ वमन करून वेद टाकिला. मग ते पृथ्वी वर वमनद्वारा अग्नीच्या अंगारां सारिखे वेद पडले जाहले. त्या कालीं वैशंपायनानें सर्व शिष्यांस आज्ञा केली कीं, तुह्मीं रूपान्तरें करून या अंगार- रूप वेदांतें ग्रहण करा. तदनंतर त्या शिष्यांनीं तित्तिरि-

पक्ष्यांचें रूप धारण करून त्या वेदांतें ते ग्रहण करिते जाहले. ती तैत्तिरीय शाखा होय.

तदनंतर याज्ञवल्क्य वेदरहित होत्साता सूर्या जवळ जाऊन सूर्याची प्रार्थना करून त्यानें अपूर्व यजुर्वेद संपादित केला. आणि इतर वेद ही तो संपादित करिता जाहला. आणि त्यानें ब्रह्मविद्या ही संपादित केली. तदनंतर सूर्यानीं त्यास वरदान दिलें कीं, तुला मी जी विद्या सांगितली, या विद्येची जो निंदा करील त्याचा मी शिरश्छेद करीन. तदनंतर याज्ञवल्क्यानें पुनः प्रार्थना केली कीं, हे गुरो, वादविवाद होणें हा विद्येचा स्वभाव च आहे. या स्तव असा आपण वर देऊं नये. तदनंतर सूर्यानें वराचा संकोच केला कीं, मी शंभर अपराध सहन करीन. नंतर त्याचा शिरच्छेद करीन.

असें ह्मणतां च याज्ञवल्क्य ही आग्रहातें टाकून पुनः मृत्युलोकीं येऊन संपूर्ण वेद विद्यार्थ्यांस पढवूं लागले. त्या काळीं याज्ञवल्क्याची जगतांत थोर ख्याति जाहली. आणि कितिएक असूये मुळें द्वेषपूर्वक निंदा करूं लागले.

तदनंतर याज्ञवल्क्याची ख्याति ऐकून जनकराजास इच्छा उत्पन्न जाहली कीं, याज्ञवल्क्या पासून ब्रह्मविद्या ऐकावी. या स्तव राजानें यज्ञाचें मिष करून संपूर्ण ब्राह्मणांस व याज्ञवल्क्यास येण्या विषयीं पत्र पाठविलें. मग त्या पत्रा वरून आश्वलायनादि संपूर्ण ऋषि आणि याज्ञवल्क्य ही येते जाहले. त्या काळीं संपूर्ण ऋषींचा समाज आप-

ले यज्ञांत प्राप्त जाहला, असें पाहून कोणे एके दिवशीं त्या संपूर्णऋषींचा परस्पर विवाद करवून ब्रह्मवार्ता ऐकावी, या हेतू स्तव राजानें एक युक्ति काढिली. ती कोणती ह्मणाल तर सांगतों. त्या राजानें सहस्र गाई सुवर्णालंकारादिकें करून अलंकृत ऐशा आणून ब्राह्मणांचे सभेंत उभ्या करून संपूर्ण ब्राह्मणांस राजा प्रार्थना करिता जाहला कीं, हे ब्राह्मण हो, तुमच्या मध्यें जो ब्रह्मवेत्ता असेल, त्या ब्रह्मवेत्त्यानें या गाई न्याव्या. असें राजानें ह्मणतां च त्या कालीं संपूर्ण ब्राह्मण खालीं पाहूं लागले. परंतु कोणी ही गाई घेईतना. त्या काळीं याज्ञवल्क्यानें मनांत विचार केला कीं, या गाईचा स्वीकार न केल्यास ब्राह्मणांत ब्रह्मनिष्ठ कोणी च नाहीं असें होईल. या स्तव गाईचा स्वीकार अवश्य करावा. असा विचार करून मग आपला सामवेदाध्यायी विद्यार्थी होता, त्यास गाई नेण्या विषयीं याज्ञवल्क्यानें आज्ञा केली.

तदनंतर याज्ञवल्क्यानें गाई घेतां च, मग संपूर्ण ऋषि कोपाविष्ट होऊन ह्मणूं लागले. अरे याज्ञवल्क्या, तूं महान् अविवेकी आहेस. तुला विद्येचा फार अभिमान आहे. येथें आश्वलायनप्रभृति महान् ऋषि असतांना सर्वांचा अनादर करून मी च ब्रह्मवेत्ता, व अवघे अज्ञानी, अशा अभिमानानें त्वां गाई घेतल्या. तस्मात् जर तूं ब्रह्मवेत्ता आहेस आणि आह्मां सर्वां पेक्षां सर्वज्ञ आहेस, तर आह्मी जे जे प्रश्न करूं त्या प्रश्नांचें उत्तर देऊन आमचें समाधान त्वां करावें. नाहीं

तर या गाई घेऊं नयेत. त्या काळीं पुनः याज्ञवल्क्य ह्मणतात. हे ब्राह्मण हो, मी ब्रह्मवेत्ता आहें असें कांहीं लोकांस सांगत नाहीं. मी सर्वज्ञ आहें, असा हीं अभिमान दाखवीत नाहीं. राजानें ब्राह्मणांस गाई दिल्या. मला ही गाईची इच्छा होती. या कारणा स्तव म्यां गाईचा स्वीकार केला. तुह्मांस ही इच्छा असल्यास राजा समर्थ आहे. तुह्मी मागा. तुह्मांस तो देईल. व्यर्थ कां कोप करितां? असें ह्मणतां च त्या काळीं संपूर्ण ब्राह्मण मिळून एका क्रमानें याज्ञवल्क्यास अनेक प्रकारचे प्रश्न करूं लागले. त्या काळीं याज्ञवल्क्यानें ही त्या त्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन सर्वांचें तो समाधान करिता जाहला. कोणत्या ऋषीनें कोणता प्रश्न केला व त्याचें याज्ञवल्क्यानें समाधान कसें केलें, हा प्रकार लिहिल्यास ग्रंथविस्तार होईल. या हेतू स्तव तो विस्तार लिहिला नाहीं. अस्तु.

तदनंतर गार्गीनामक एक ब्राह्मणाची कन्या होती. ती जन्मा पासून कुमारी च असून नग्न दिगंबर राहत होती. महान ब्रह्मवेत्ती होती. बुद्धिमत्तेनें सरस्वती पेक्षां ही अधिक होती. अशी ती गार्गी याज्ञवल्क्या प्रति प्रश्न करिती जाहली. त्या प्रश्नाचें उत्तर ही याज्ञवल्क्यानें देऊन तिचें तो समाधान करिता जाहला. तदनंतर गार्गी तुष्णीम् बसती जाहली. पुनः अन्य ब्राह्मणांनीं प्रश्न केले. त्यांचें ही समाधान याज्ञवल्क्य करिता जाहला. तदनंतर पुनः गार्गी प्रश्न करण्या विषयीं उद्युक्त होऊन सर्व ब्राह्मणां पुढें

आपल्या प्रश्नांची प्रशंसा करिती जाहली. हे ब्राह्मण हो, आतां मी याज्ञवल्क्यास दोन प्रश्न करितें. हे माझे प्रश्न काशीराजाचे बाणां प्रमाणें अमोघ आहेत. या माझे प्रश्नांचें जर हा याज्ञवल्क्य उत्तर देईल तर हा ब्रह्मवेत्ता खचीत जाणावा. मग यासी कोणीं प्रश्न करून खवा नये. अशी प्रशंसा करून मग त्या गार्गीनें दोन प्रश्न केले. त्या प्रश्नांचें समाधान याज्ञवल्क्यानें करितां च मग ती गार्गी याज्ञवल्क्यास नमस्कार करून सर्वांस सांगिती जाहली. हा याज्ञवल्क्य महान् समर्थ आहे. याशीं कोणीं द्वेषबुद्धीनें वर्तूं नये. सर्वांनीं याज्ञवल्क्याची प्रार्थना करावी. यासी आतां कोणी प्रश्न करूं नये.

या प्रकारें गार्गीनें सांगितल्या नंतर मग दग्धशाकल्यनामक ब्राह्मण जो तो परम कोपिष्ठ होऊन, तो कर्मकाण्डी होता या हेतू स्तव ब्रह्मवेत्त्याचे स्तुतीतें सहन न करीत होत्साता गार्गीची व याज्ञवल्क्याची निंदा करण्या विषयीं प्रवृत्त होता जाहला. अहो, ही गार्गी सटवी जन्माची मला ठाऊक आहे. ही जन्मा पासून नागवी फिरत आहे. व गोसावी, संन्यासी व याज्ञवल्क्या सारिखे सोधे हिला फार आवडतात. त्या संन्याशादिकां मध्यें च ही आठ ही प्रहर राहती. हे. आह्मां सारखे जे शिष्ट स्नानसंध्याशीळ त्यांसीं भाषण ही करीत नाहीं. तस्मात् ही सोधी आहे, व हा याज्ञल्क्य ही सोधा आहे. दोघीं सोधीं मिळून, संकेत करून एकमेकांची स्तुति करून ब्रह्मवेत्ते होतात. हा याज्ञवल्क्य आ-

मच्या पुढील पोर. हा च ब्रह्मवेत्ता कसा जाहला? आश्वलायनप्रभृति वृद्ध वृद्ध हे ब्रह्मवेत्ते कां नव्हेत? अशी नाना प्रकारची वल्गना करून मग याज्ञवल्क्या प्रति शाकल्य जो तो बोलताहे. हे याज्ञवल्क्य, मी तुज कारणें प्रश्न करतोंहें. या प्रश्नांचीं उत्तरें न देशील तर तूं निर्जलदेशांत प्रेत होशील. असें ह्मणून तो याज्ञवल्क्यास प्रश्न करिता जाहला. तेव्हां त्या च काळीं त्याचे प्रश्नांचीं उत्तरें देऊन याज्ञवल्क्य ह्मणाला, हे शाकल्य, तूं व्यर्थ कां माझी निंदा करितोहेस? मला सूर्याचें वरप्रदान आहे कीं; जो या विद्येची निंदा करील त्याचा मी शिरश्छेद करीन. तस्मात हे शाकल्य, तूं माझी निंदा करूं नको. व्यर्थ तुझा नाश होईल.

या प्रमाणें याज्ञवल्क्यानें सांगितलें असतां ही, पुनः तो शाकल्य निंदा करूं लागला. मग त्याचे शंभर अपराध जेव्हां जाहले त्या काळीं ती मंडलाभिमानिनी सूर्यदेवता क्षोभायमान होऊन याज्ञवल्क्याचे जिव्हाग्रीं येऊन बसती जाहली. त्या काळीं तो याज्ञवल्क्य पराधीन होऊन शाकल्या प्रति ह्मणूं लागला. हे शाकल्य, हे शाकल्य, तुझ्या अनेक प्रश्नांचें मी समाधान केलें. आतां तुला मी एक प्रश्न करितोंहें. या प्रश्नाचें उत्तर जर न देशील तर तुझा मस्तक तुटून खालीं पडेल. असें ह्मणून मग शाकल्या प्रोत ह्मणतो. हे शाकल्या, उपनिदांत प्रतिपादित केलेला पुरुष तो कोणता? तुला मी पुसतों हें तूं सांग. असा प्रश्न

करितां च तो मूर्ख अज्ञानी होता, या मुळें त्यास कांहीं त्या प्रश्नाचें-उत्तर देतां आलें नाहीं. तेव्हां शाकल्याचा मस्तक शरीरा पासून गळून खालें पडता जाहला. मस्तक खालें पडतां च त्या काळीं ब्राह्मणसभेंत महान् हाहाकार होता जाहला. सर्व ब्राह्मण ह्मणूं लागले, या शाकल्यानें ब्रह्मवेत्त्याची निंदा केली. त्याचें फल यास शीघ्र च प्राप्त जाहलें. अहो, हा शाकल्य परमबुद्धिमान्, विद्वान् व गुणवान् होता. परंतु थोरांची निंदा करणें हा जो दुर्गुण तेणें करून याच्या सर्व गुणांची माती जाहली अस्तु. ईश्वरेच्छा. जें होणार त्यास उपाय नाहीं. असें ह्मणून सर्व ब्राह्मण आपआपल्या मनांत खिन्न होते जाहले.

तदनंतर त्या शाकल्याचे शिष्य जे होते त्यांनीं त्या शाकल्याचे देहास संस्कार करून त्याच्या अस्थि गंगेंत नेऊन टाकाव्या या बुद्धीनें ते घेऊन चालले होते. त्या काळीं मार्गांत चोरांनीं त्या अस्थींची गाठोडी पाहून हीं द्रव्याची गाठोडी असें मानून चोर लुटिते जाहले. मग चोरांनीं गाठोडी सोडून पाहिल्या नंतर त्या अस्थि दृष्टी पडल्या जाहल्या. तदनंतर त्या अस्थींतें पाहून चोर ही आपल्या मनांत खिन्न होऊन त्या अस्थि ते अरण्यांत फेकिते जाहले. तस्मात् ब्रह्मवेत्त्याचा द्वेष केला. या मुळें त्या शाकल्याच्या अस्थि सुद्धां गंगेंत पडल्या नाहींत. या करितां ब्रह्मवेत्त्याचा केव्हां ही द्वेष करूं नये. ब्रह्मवेत्ता

साक्षात् ईश्वर होय. गीतेंत भगवंतांनीं ज्ञान्यास[1] आपला आत्माच मानिला आहे.

मग इकडे जनकराजा प्रति याज्ञवल्क्यानें ब्रह्मविद्येचा उपदेश केला. तदनंतर जनक ही याज्ञवल्क्यनामक गुरु प्रति दक्षिणार्थ संपूर्ण राज्य अर्पण करिता जाहला. तेव्हां याज्ञवल्क्यानें सांगितलें, हे राजन्, संपूर्ण राज्य ही माझें च आहे. तूं ही माझा शिष्य आहेस माझ्या करून च तूं या राज्याचें पालन कर. असें सांगून तदनंतर याज्ञवल्क्य आपल्या आश्रमा प्रति गमन करिता जाहला. मग राजानें सर्व ब्राह्मणांची संभावना करितां च ब्राह्मण ही आपापल्या आश्रमा प्रति गमन करिते जाहले.

नंतर याज्ञवल्क्य कांहीं दिवस आपल्या आश्रमांत राहून पुनः विचार करिता जाहला कीं, आपण राजास जें ब्रह्मज्ञान सांगितलें तें ज्ञान राजास दृढ जाहलें किंवा नाहीं, अथवा ज्ञानाची विस्मृति जाहली याची परीक्षा करावी. असा विचार करून मग तो याज्ञवल्क्य पुनः जनकाच्या समीप प्राप्त जाहला. जनकराजा, याज्ञवल्क्य पुनः आला असें श्रवण करून सन्मुख येऊन सत्कारपूर्वक त्यास आपल्या आश्रमास नेऊन सिंहासना वर बसवून त्याची यथाविधि पूजा करून मग प्रार्थना करिता जाहला. हे गुरो, आपल्या दर्शनमात्रें करून मी कृतार्थ जाहलों. आतां

१ ज्ञानीत्वात्मैव मे मतम् ॥ श्रीभ० गी० ॥ ७।१८ ॥

पुढें काय कर्तव्य त्या विषयीं आपल्या शिष्यास आज्ञा करावी." या प्रकारें राजानें प्रार्थना करितां च मग याज्ञवल्क्य पुसतात. हे राजा जनका, तुज कारणें जो ब्रह्मविद्योपदेश पूर्वी केला होता, तेणें करून तुझ्या मनांत मी च ब्रह्म असा यथार्थ निश्चय जाहला किंवा नाहीं ? मग जनकानें पुनः प्रार्थना केली. हे गुरो, आपण ब्रह्मविद्योपदेश केला. परंतु तो उपदेश मनांत यथार्थ भरला नाहीं. पुनः तो ब्रह्मविद्योपदेश ज्ञानदाढ्यार्थ करावा. ह्मणून राजानें प्रार्थना करितां च पुनः याज्ञवल्क्य नाना प्रकारच्या युक्तिप्रयुक्तींनें ज्ञानोपदेश करून पुनः कृतार्थ होत्साता आपल्या आश्रमा प्रति गमन करिता जाहला.

या नंतर कांहीं एक दिवस आश्रमांत वास करून यथाविधि गृहस्थाश्रमातें संपादून पुत्रपौत्रादि जाहल्या नंतर मग कोणी एके दिवशीं मैत्रेयीनामक ज्येष्ठपत्नी व कात्यायनीनामक कनिष्ठपत्नी या दोघींस ही आपल्या समीप बोलावून एकान्तांत विचार करिता जाहला. हे प्रियांनो, आज पर्यंत तुह्मां सह वर्तमान यथाविधि गृहस्थाश्रम संपादित केला. पुत्रपौत्रादिक ही दोघींच्या ठायीं उत्पन्न केले. आतां आमचा चतुर्थाश्रमस्वीकार करण्याचा काल आहे. द्रव्य ही पुष्कळ आहे. या द्रव्याचा विभाग करून दोघींस ही देतों. तुह्मीं द्रव्य घेऊन आनंदानें आश्रमांत मुलां लेंकरां सहित असावें. मज कारणें चतुर्थाश्रम घेण्याची आज्ञा व्हावी.

असें ह्मणतां च त्या कालीं ज्येष्ठपत्नी जी ती प्रार्थना

करिती जाहली. हे स्वामिन् , या नाशवंत द्रव्यास घेऊन काय कर्तव्य आहे? आपण ज्या अविनाशी वस्तूतें जाणून कृतकृत्य जाहलेत ती अविनाशी वस्तु मज कारणें सांगावी. मग आपण चतुर्थाश्रम स्वीकारावा. माझी आपण कांहीं एक चिंता करूं नये. ज्या परमेश्वरानें नऊ महिने मातेच्या उदरांत रक्षण केलें तो च परमेश्वर विद्यमानकाळीं व पुढें ही या देहाचें संरक्षण करील. या प्रकारें मैत्रेयीनें प्रार्थना करितां च मग याज्ञवल्क्य परम संतुष्ट होऊन मैत्रेयी प्रति उपदेश करिता जाहला. हे मैत्रेयि, हें संपूर्ण स्त्रीपुत्रादिरूप दृश्यमात्र जें तें अशाश्वत आणि मिथ्याभूत आहे. एक द्रष्टा आत्मा मात्र सत्य व अविनाशी आहे. या स्तव आत्मा सद्रूप आहे. आत्मा सर्वांस जाणतो. या स्तव आत्मा चिद्रूप ह्मणजे ज्ञानस्वरूप जाणावा. संपूर्ण स्त्रीपुत्रादिकांचे ठायीं आपली प्रीति आहे ती आपल्या करितां च. पुत्रा करितां पुत्र प्रिय नाहीं. आपल्या करितां च पुत्र प्रिय. वित्ता करितां वित्त प्रिय नाहीं. आपल्या करितां वित्त प्रिय. असे संपूर्ण पदार्थमात्र आपल्या करितां प्रिय. या स्तव आत्मा परम प्रेमास्पद आहे. ह्मणून आत्मा आनंदरूप जाणावा. ब्रह्म ही शास्त्रांत सत्यस्वरूप, ज्ञानस्वरूप, व आनंदस्वरूप, ऐकिलें आहे. आत्मा ही सत्यस्वरूप, ज्ञानस्वरूप, व आनंदस्वरूप, आहे. ब्रह्माचें व आत्म्याचें लक्षण एक च. या स्तव तूं ब्रह्म च आहेस.

अशा नाना प्रकारच्या युक्तिप्रयुक्तीनें उपदेश करितां च

त्या च काळीं मैत्रेयी कृतार्थ होऊन मुलें लेंकरें कात्यायनी-च्या स्वाधीन करून ती कात्यायनी प्रत ह्मणाली, हे कात्यायनि, या माझ्या मुलांचा अभिमान तुला च आहे. सर्व-प्रकारें यांच्या रक्षणा विषयीं तूं च माता आहेस. आतां लोभ ठेवावा. असें प्रेमयुक्त भाषण करून मैत्रेयी घरांतून निघून विरक्त होत्साती व जीवन्मुक्त होत्साती पृथ्वीच्या ठायीं ब्रह्मचर्यादि धर्म करून युक्त होत्साती यथेच्छ संचार करिती जाहली. तदनंतर कात्यायनीचें समाधान करून याज्ञवल्क्य ही चतुर्थाश्रम स्वीकारून पृथिवीच्या ठायीं यथे-च्छ गमन करूं लागले. मग इकडे कात्यायनी परम दुःखि-त होत्साती मुलें लेंकरां सहित असती जाहली.

आतां हा इतिहास सांगण्याचें प्रयोजन काय ह्मणाल, तर सांगतों. लोकांत अविवेकी जन ह्मणतात कीं, या ज्ञा-न्यानें कांहीं एक भाषण करूं नये. कोणीं चिमटा घेतल्या-स ही हूं ह्मणूं नये. आंलट, तिलट कांहीं एक समजूं नये. वादविवाद करूं नये. उगाच धोंड्या सारखें जड होऊन पडावें. असे नाना प्रकारचे लोक नाना प्रकारें वल्गना करितात. त्यांस जनकयाज्ञवल्क्यांचा दृष्टान्त देऊन समा-धान करावया विषयीं इतिहास सांगितला. आतां उद्दालक-श्वेतकेतूचा संवाद सांगतों.

# उद्दालक व श्वेतकेतु याची कथा.

उद्दालकनामक कोणी एक ऋषि होता, त्याचा श्वेतकेतुनामक एक पुत्र होता. तो मातापित्यांचा फार लाडका होता. या स्तव त्यानें सर्व काळ मुलांत फिरत असावें. असें असतांना त्या मुलास सात आठ वर्षे जाहलीं. उपनयनाचा काळ ही अतिक्रान्त जाहला. असें पाहून मग तो उद्दालक मनांत विचार करिता जाहला कीं, हा मूल परम अनिवार व लाडका आहे. माझ्या शिक्षेंत कांहीं राहणार नाहीं. या स्तव यास दुसऱ्या ब्राह्मणा कडे उपनयनास पाठवावें. असा विचार करून मग तो उद्दालक पुत्रास आज्ञा करिता जाहला. हे पुत्र, तुझ्या उपनयनाचा काळ प्राप्त जाहला. तस्मात् तूं कोणी एका समर्थ ब्राह्मणा कडे जाऊन त्याची प्रार्थना करून उपनयनादिसंस्कारातें संपादित करीत होत्साता गुरुकुलीं वास करून सर्वविद्यासंपादन करून पुनः माझ्या आश्रमा प्रति येऊन माझ्या सेवेंत तत्पर असावें. या प्रकारें सांगतां च मग तो बालक पित्याची आज्ञा घेऊन कोणी एक समर्थ ब्राह्मण पाहून त्यास शरण जाऊन प्रार्थना करिता जाहला. हे स्वामिन्, मी उद्दालकाचा पुत्र आहें. माझें गोत्र अमुक आहे. माझे प्रवर अमुक आहेत. मी उपनयनार्थ आपल्या समीप आलों आहें. आपण माझें उपनयन करून मजला

वेदाध्ययन करवावें. अशी प्रार्थना करितां च मग त्या ब्राह्मणानें श्वेतकेतूचें उपनयन करून तो त्याला संपूर्ण साङ्ग वेदाध्ययन सांगता जाहला.

तदनंतर तो श्वेतकेतु सर्वविद्ये करून संपन्न होत्साता पुनः पितृगृहाचे ठायीं येता जाहला. पितृगृहा प्रत येऊन पित्यास पाहून मनांत विचार करिता जाहला कीं, माझा पिता जर विद्वान् असता तर मला दुसऱ्या ब्राह्मणा कडे गुरु करण्या विषयीं कां पाठविता? तस्मात् माझा पिता मूर्ख आहे. मी तर विद्वान् आहें. यास नमस्कार काय करावा? असा अभिमान करून पित्यास नमस्कार न करितां उच्चस्थानीं बसता जाहला. त्या कालीं ही संपूर्ण पुत्राची चेष्टा पाहून पित्यास मनांत आश्चर्य वाटतें जाहलें. या मुलास विद्वत्तेचा मोठा अभिमान जाहला आहे. या स्तव मला नमस्कार न करितां उच्चस्थानीं जाऊन बसला आहे. याचा अभिमान ब्रह्मविद्ये वांचून दूर होणार नाहीं. या स्तव यास ब्रह्मविद्या सांगून अभिमान दूर करावा. या अभिप्रायें करून उद्दालक श्वेतकेतूस पुसतो. हे श्वेतकेतो, जसें लोहाचें ज्ञान जाहलें असतां संपूर्ण जितके लोहाचे विकार आहेत त्या सर्वांचे ज्ञान होताहे, तसें एका ब्रह्माचें ज्ञान जाहलें असतां संपूर्ण जगताचें ज्ञान होताहे. तें ब्रह्मज्ञान तूं आपल्या गुरू पासून संपादित केलें काय? ह्मणून तुला एवढा गर्व जाहला आहे? असें ह्मणतां च त्या श्वेतकेतूस परमाश्चर्य वाटून एक पदार्थ

जाणिला असतां सर्व पदार्थ ज्ञात होतील कसे? असा संशय करीत होत्साता मग अभिमानातें टाकून आपल्या पित्या प्रत शरण जाता जाहला. हे तात, तें ब्रह्म जें तें कोणतें? ज्या ब्रह्मज्ञानें करून सर्वपदार्थमात्राचें ज्ञान होणार? त्या ब्रह्माचें लक्षण काय? या प्रकारें श्वेतकेतूनें पुसतां च मग उद्दालक श्वेतकेतूस नववार महावाक्याचा उपदेश करिता जाहला. उपदेश केल्या नंतर मग श्वेतकेतु जीवन्मुक्तदशेतें पावून जन्ममरणात्मकसंसारा पासून मुक्त जाहला.

हा श्वेतकेतूचा इतिहास सांगण्याचें कारण कीं, वारंवार वेदान्ताच्या श्रवणाची आवृत्ति करावी. आणि ब्रह्मविद्ये वांचून इतरवृत्तीनें कदापि कृतार्थ होणार नाहीं. तस्मात् ब्रह्मविद्या संपादित करावी.

---

## वरुणाचा पुत्र भृगु ह्याची गोष्ट.

ऐसा च भृगूनें वरुणनामक पित्यास प्रश्न केला होता कीं, हे तात, मजला ब्रह्मोपदेश करा. तदनंतर पित्यानें त्या भृगूस सांगितलें कीं, हे वत्स, जें जगताचें कारण तेंच ब्रह्म होय. असें सांगतां च मग भृगूनें अन्नमयकोशा पासून आनंदमय कोशा पर्यंत विचार केला. त्या पंचकोशांचे ठायीं अनित्यत्व, सावयवत्व, दृश्यत्वादिदोषांतें पाहून हें

काहीं जगत्कारण ब्रह्म नव्हे असा निश्च करून मग बिंबभूत जो आनंद, त्या पासून जगताची उत्पत्ति स्थिति होऊन लय ही तेथें च दिसतात. तस्मात् आनंदरूप आत्म्याचे ठायीं जगत्कारणत्व दिसताहे. या स्तव आनंदरूप आत्मा च ब्रह्म होत. असा विचार करून मी च ब्रह्म असा निश्चय करिता जाहला.

## नारदाचा इतिहास.

आतां नारदाचा इतिहास सांगतों. नारदनामक देवर्षि जो होता तो सर्वविद्यासंपन्न होता. परंतु परम शोकें करून रात्रंदिवस व्याप्त होता. या स्तव तो नारद जो तो सनत्कुमारां प्रति शरण जाऊन प्रार्थना करिता जाहला. हे स्वामिन्, मी नारद आहें. परम विद्वान् आहें. परंतु शोकें करून व्याप्त आहें. शोका पासून मला आपण मुक्त करावें. आपण दयालु आहां. या प्रकारें नारदानें प्रार्थना करितां च मग सनत्कुमार सांगतात. हे नारद, भूमा ह्मणजे व्यापक जो आत्मा त्या आत्म्याचे ठायीं सुख आहे. हे जे काहीं देहादिक परिच्छिन्न पदार्थ यांच्या ठायीं सुख नाहीं. या स्तव तूं देहादि परिच्छिन्न पदार्थां वरील आत्मत्वाभिमान टाकून सच्चिदानंदस्वरूप ब्रह्म मी च आहें. असा निश्चय कर. मग तूं सर्व शोका पासून मुक्त होऊन ब्रह्मानंदातें प्राप्त

होईल. या प्रकारें नाना युक्तिप्रयुक्तीनें उपदेश करितां च तो देवर्षि नारद, परिच्छिन्न पदार्थां वरील आत्मत्वबुद्धि टाकून सच्चिदानंदस्वरूप ब्रह्म च मी असा निश्चय करिता झाला. त्या दिवसा पासून सर्व शोका पासून मुक्त होत्साता आनंदरूप त्रिलोकांत यथेच्छ संचार करिताहे.

तस्मात् ब्रह्मज्ञाना वांचून शोकनिवृत्ति होत नाहीं. हें या इतिहासानें सूचविलें. या स्तव ब्रह्मज्ञानसंपादन करावें.

## दध्यङ्अथर्व्याचा इतिहास.

अतां दध्यङ्अथर्व्याचा इतिहास सांगतों. दध्यङ्अथर्वा या नांवाचा कोणी एक महान् समर्थ, सर्वविद्येंत पारंगत आणि शमदमादिसाधनें करून युक्त असून ज्यास करतलामलकवत् ब्रह्मपरोक्षज्ञान असा ब्राह्मण असता जाहला. मग तो ब्राह्मण कोणी एका स्थळीं आश्रम निर्मित करून त्या आश्रमांत वास करित होत्साता जे जे विद्यार्थी येतील त्यांस ज्या ज्या विद्येची अभिलिप्सा असेल त्या त्या विद्येचें अध्यापन करीत असे.

कोणी एके दिवशीं त्याच्या आश्रमास देवेंद्र जो तो प्राप्त जाहला. त्या काळीं त्या देवेंद्रास पाहून मग दध्यङ्-

अथवा ब्राह्मण, जो तो अर्घ्यपाद्यादिक घेऊन सत्कारपूर्वक आसनावर बसवून प्रार्थना करिता जाहला. हे देवेंद्र, तूं साक्षात् त्रैलोक्याचा अधिपति आहेस. मी ब्राह्मण आहें. तुझा सत्कार काय करावा? असें ह्मणतां च मग देवेंद्र ह्मणतो. हे ब्राह्मणा, तूं साक्षात् विद्येचा निधि आहेस. तस्मात् संपूर्ण विद्येंत जी उत्कृष्ट विद्या असेल ती मज कारणें कृपा करून सांग. ह्मणजे हा च सत्कार जाणावा.

मग तो ब्राह्मण आपल्या मनांत विचार करिता जाहला कीं, सर्व विद्येंत उत्कृष्ट विद्या सांगावी अशी या देवेंद्राची प्रार्थना. परंतु उत्कृष्ट विद्या तरी ब्रह्मविद्या, असें शास्त्रांत ऐकिलें आहे. आणि विद्वज्जनास अनुभव ही असा च आहे. ती ब्रह्मविद्या अधिकारा वांचून भलत्यास सांगूं नये अशी श्रुति आहे. श्रुतींत ब्रह्मविद्येनें ब्रह्मवेत्त्याची प्रार्थना केली आहे ती सांगतों. ब्रह्मविद्या ह्मणत्ये. हे ब्रह्मवेत्त्या, तूं साक्षात् माझा पिता आहेस. जसा पिता जो तो विचारपूर्वक आपल्या कन्येस अर्पण करितो, तशी मी तुझी कन्या आहें, तूं ही विचारपूर्वक मला अर्पण करशील तर मी संतोषातें पावून आशीर्वचन देईन. तेणें करून तुझ्या शिष्यपरंपरेची वृद्धि होऊन तुझी परम ख्याति होईल. नाहीं तर माझ्या शापानें तुला विक्षेप होईल. शिष्यपरंपरेची वृद्धि होणार नाहीं. व तुझी ख्याति ही होणार नाहीं. अशी ब्रह्मविद्येची प्रार्थना आहे. या स्तव यास ब्रह्मविद्या सांगावी किंवा न सांगावी? जर ब्रह्मविद्या सां